सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर रविवार, दि. १४ सप्टेंबर २०२५ ⏮ वर्ष - तिसरे ⏮ अंक १६१ ⏮ पाने : ८ ⏮ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

### मराठा समाजासाठी कोणते आरक्षण कायम ठेवणार?, हायकोर्टाचा सवाल

मुंबई, १३ सप्टेंबर – मराठा समाजाला देण्यात आलेल्या १० टक्के आरक्षणावर मुंबई उच्च न्यायालयात आज (१३ सप्टेंबर) सुनावणी पार पडली. न्यायमूर्ती रवींद्र घुगे, न्यायमूर्ती एन जे जमादार आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठासमोर आरक्षणाच्या समर्थनार्थ तसेच विरोधात दाखल झालेल्या याचिकांवर दिवसभर युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. आता पुढील सुनावणी ४ ऑक्टोबरला होणार आहे. मराठा समाजाला आता दोन आरक्षण आहेत. त्यामुळे राज्य सरकारने कोणते आरक्षण कायम ठेवायचे याचा निर्णय घेतला आहे का? अशी विचारणा न्या. रवींद्र घुगे यांनी यावेळी केली. दरम्यान सरकारच्या वतीने महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी सांगितले की, राज्यात २८ टक्के मराठा समाज आहे. यातील २५ टक्के समाज हा गरीब आहे.

### बारव व ऐतिहासिक विहिरींचे फेर सर्वेक्षण करणार : शेलार

मुंबई : ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या असणाऱ्या महाराष्ट्रातील बारव व विहिरींचे जिल्हा निहाय सर्वेक्षण करण्यात येणार असल्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ड आशिष शेलार यांनी आज जाहीर केले. आज सांस्कृतिक विभागातर्फे तज्ज्ञांसोबत सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी बैठक घेऊन बारव संवर्धन, संरक्षण याबाबत आढावा घेतला. याबाबत सविस्तर माहिती देताना त्यांनी सांगितले की, प्राथमिक माहिती जी समोर आली आहे त्यामध्ये राज्यात ऐतिहासिक वारसा असलेल्या आणि पुराणकाळापासून ज्यांच्या नोंदी सापडतात अशा ३,000 च्या वर बारव आहेत.

### पाकिस्तानशी लागेबांधे असलेल्या दोघांना अटक

नागपूर, १३ सप्टेंबर : पाकिस्तानशी लागेबांधे असल्यावरून नागपूर पोलिसांच्या दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) जिल्ह्यातील कामठी येथून आज, शनिवारी पहाटे २ संशयितांना ताब्यात घेतले आहे. हे दोघेही सोशल मिडीच्याच्या माध्यमातून पाकिस्तानशी जोडल्याची टीप एटीएसला मिळाली होती. त्याआधारे ही कारवाई करण्यात आलीय. एटीएसच्या ताब्यातील दोन्ही संशयित कामठीच्या इमलीबाग परिसरात वास्तव्याला असून मागील बऱ्याच काळापासून ते सोशल माध्यमांवर सक्रिय होते. सोशल माध्यमांतून ते दोन्ही संशयित पाकिस्तानातील काही लोकांच्या संपर्कात होते. त्याची गोपनीय माहिती एटीएसला मिळाली. त्यानंतर दोघांना ताब्यात घेण्यात आले. त्यांना चौकशीसाठी एटीएसच्या नागपूर कार्यालयात नेण्यात आले. यापैकी एक जण कामठी येथील सर्वाज जुन्या उर्दू विद्यालयात नोकरीला असल्याची माहिती पुढे आली आहे. यापूर्वी ऑपरेशन सिंदूरच्या वेळी नागपूरच्या कपिल नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एक महिला कारगिलमधून एलओसी ओलांडून पाकिस्तानमध्ये गेली होती.

# केंद्र सरकार मणिपूरच्या लोकांसोबत खंबीरपणे उभे

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मणिपूरमधील लोकांना आश्वासन, केले शांततेचे आवाहन

चुराचंदपूर: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज मणिपूरमधील लोकांना आश्वासन दिले की, 'मी आणि माझे सरकार तुमच्यासोबत आहोत' आणि शांततेचे आवाहन करत म्हणाले की, धैर्य आणि सामर्थ्याची भूमी पुन्हा एकदा आशेची भूमी बनली पाहिजे.

राज्यातील लोकांना, विशेषत: डोंगराळ जिल्ह्यांतील आदिवासी लोकांना संबोधित करताना ते म्हणाले की, अलीकडील हिंसाचारामुळे जीवनावर खोलवर परिणाम झाला असला तरी, आशा मणिपूरच्या दारावर दस्तक देत आहे. विस्थापित कुटुंबांना मदत शिबिरांमध्ये भेटल्यानंतर, पंतप्रधान म्हणाले की, केंद्र सरकार मणिपूरच्या लोकांसोबत खंबीरपणे उभे आहे. मी सर्व संस्थांना शांततेच्या मार्गावर चालण्याचे आणि त्यांच्या मुलांचे भविष्य सुनिश्चित करण्याचे आवाहन करतो. मी वचन देतो, मी तुमच्यासोबत आहे. भारत सरकार तुमच्यासोबत आहे, असे ते म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज मणिपूरचा दौरा केला. यावेळी त्यांनी राज्यातील जनतेला शांती राखण्याचे आवाहन केले आणि भारत सरकार त्यांच्यासोबत खंबीरपणे उभे असल्याचे आश्वासन दिले. चुराचंदपूरमध्ये मदत शिबिरांना भेट दिल्यानंतर ते म्हणाले की,



हिंसक घटनांनी लोकांच्या जीवनावर परिणाम झाला असला तरी, आशेचे किरण पुन्हा दिसू लागले आहेत. मोदींनी शांततेच्या मार्गावर चालून मुलांचे भविष्य सुरक्षित करण्याची विनंती केली.

विकासाचे विशेष पॅकेज आणि महत्त्वाकांक्षी प्रकल्प

पंतप्रधानांनी मणिपूरला पुन्हा उभारी देण्यासाठी ३००० कोटींचे विशेष पॅकेज जाहीर केले, ज्यात विस्थापित कुटुंबांसाठी ५०० कोटी समाविष्ट आहेत. त्यांनी राज्यातील पायाभूत सुविधांच्या विकासावर भर दिला. गेल्या १० वर्षांत मणिपूरमध्ये कनेक्टिव्हिटी, आरोग्य आणि शिक्षणात मोठी गुंतवणूक झाली आहे. रस्ते आणि रेल्वे: ३७०० कोटी राष्ट्रीय महामार्गांवर खर्च झाले आहेत, तर ८७०० कोटींच्या कामाला सुरुवात झाली आहे. रेल्वे कनेक्टिव्हिटीमध्ये २२००० कोटींची गुंतवणूक झाली आहे.

विमानतळ: इम्फाळ विमानतळाचे ४०० कोटी खर्चून नूतनीकरण करण्यात आले आहे.

आरोग्य: चुराचंदपूरमध्ये नवीन वैद्यकीय महाविद्यालय सुरू झाले असून, ५ डोंगराळ जिल्ह्यांमध्ये आरोग्य सुविधा सुधारल्या जात आहेत.

घरे आणि पाणी: ६०,००० नवीन घरे आणि १ लाखाहून अधिक कुटुंबांना मोफत वीज मिळाली आहे. 'हर घर जल' योजनेअंतर्गत ३.५ लाख घरांना पिण्याचे पाणी मिळत आहे.

मोदींनी ७३०० कोटींपेक्षा जास्त किमतीच्या १९ प्रकल्पांची पायाभरणी केली.

ईशान्य भारताला जोडणारे नवे रेल्वे मार्ग

पंतप्रधान मोदींनी मिझोरममध्ये बैराबी–सैरंग रेल्वे लाईनचे उद्घाटन केले. यामुळे ऐझॉल रेल्वेने जोडले गेलेले ईशान्य भारतातील काही मोजक्या राज्यांपैकी एक बनले आहे. ही ५१.३८ किलोमीटरची रेल्वे लाईन ८०७१ कोटी खर्चून बांधली गेली आहे. या रेल्वेमुळे दिल्ली, कोलकाता आणि गुवाहाटीशी थेट संपर्क साधता येईल.

पंतप्रधानांनी मिझोरममधील दक्षिण सीमावर्ती गाव हमांगबुचुआह भारतीय रेल्वे नेटवर्कशी जोडण्याची घोषणा केली, ज्यामुळे भारत आणि म्यानमारमधील संबंध अधिक दृढ होतील. या दौऱ्यात त्यांनी एकूण ९००० कोटींचे अनेक प्रकल्प सुरू केले.

# साई मंदिरातील प्रसाद, दर्शन, सुरक्षा आता एआयच्या नियंत्रणात

## स्मार्ट सुरक्षा प्रणालीमुळे अपप्रवृत्तीला बसणार आळा




शिर्डी : श्री साईबाबा संस्थानात भाविकांच्या सुरक्षेसह दर्शन व्यवस्थापन अधिक सुकर करण्यासाठी अत्याधुनिक कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित 'पीपल काउंटिंग प्रणाली' कार्यान्वित करण्यात आली आहे. प्रिस्मा एआय या कंपनीच्या देणगीतून उपलब्ध झालेल्या या यंत्रणेचा शुभारंभ संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर आणि प्रिस्मा एआयचे अध्यक्ष डॉ. श्रीराम अय्यर यांच्या हस्ते करण्यात आला.

या वेळी संस्थानचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी भीमराज दराडे, प्रशासकीय अधिकारी संदीपकुमार भोसले, कार्यकारी अभियंता भिकन दाभाडे, संरक्षण अधिकारी रोहिदास माळी, सिसिटीव्ही विभाग प्रमुख राहुल गलांडे यांच्यासह प्रिस्मा एआयचे वरिष्ठ अधिकारी अमिताभ रॉय चौधरी उपस्थित होते.

साईबाबा मंदिर व परिसरातील सुरक्षा अधिक बळकट करण्यासाठी, तसेच दर्शन व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी आता कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित पीपल काउंटिंग प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे.

मंदिरात 'पीपल काउंटिंग प्रणाली' सुरू

सध्या ही एआय आधारित पीपल काउंटिंग प्रणाली साईबाबा मंदिराच्या गेट क्रमांक १,६,७ व्हीआयपी गेट, सिटीझन गेट, गावकरी गेट, दिव्यांग गेट, मुखदर्शन गेट आणि नवीन दर्शन रांग येथे कार्यान्वित करण्यात आली आहे. पुढील काळात पालखी रोडसह पोलीस स्टेशनच्या अखत्यारीतील कॅमेरेही या यंत्रणेशी जोडले जाणार आहेत. उत्सवकाळात शिर्डीत भाविकांची मोठी गर्दी होते. अशावेळी भाविकांच्या वस्तू हरवल्यास किंवा एखाद्या भाविकाला चक्कर येऊन पडल्यास ही प्रणाली संस्थानाला तत्काळ अलर्ट देईल. त्यामुळे भाविकांच्या अडचणींवर लगेच उपाययोजना होणार आहे.

मंदिरातील भाविकांची अचूक नोंद होणार

एआय आधारित पीपल काउंटिंग प्रणालीमुळे साई मंदिर परिसरातील प्रमुख प्रवेशद्वारांवरून येणाऱ्या भाविकांची अचूक नोंद होणार आहे. तसंच दर्शनानंतर मुखदर्शन आऊट आणि बुंदी प्रसाद आऊट येथेही भाविकांच्या बाहेर जाण्याचे मोजमाप होणार आहे. त्यामुळे दररोजच्या भाविकसंख्येची शास्त्रशुद्ध आकडेवारी संस्थानाकडे उपलब्ध राहणार आहे.

# 'आदिवासींच्या जीवनात ३ वर्षांत आमुलाग्र परिवर्तन घडेल'

यवतमाळ : आदिवासी समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केंद्र शासनाने महत्वाच्या योजना हाती घेतल्या असून, त्यासाठी देशात १ लक्ष कोटी रू. निधी उपलब्ध करून दिला आहे. महाराष्ट्रातही आदिवासी समाजासाठी घरे, रस्ते, वीज, पाणी, वसतिगृह व रोजगार अशा सुविधांसाठी योजना–उपक्रम राबविण्यात येत असून, पुढील ३ वर्षांत आदिवासींच्या जीवनात आमुलाग्र परिवर्तन घडेल, असा विश्वास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

आदिवासी समाजासाठी ५४ हजार कुटुंबांना घरे, नळांद्वारे पाणी, उपचारासाठी दवाखाने, वसतिगृह अशा अनेक सुविधा वेगाने पूर्ण करण्याचे नियोजन आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आदिवासी विकासासाठी ज्या योजना व उपक्रम आणले, तशी भरीव कामगिरी त्यापूर्वी झालेली नाही. आदी कर्मयोगी योजनेतून जिल्ह्यातील ३६६ गावांची निवड झाली आहे. योजनेतून राज्यातील ३० लाख युवकांना प्रशिक्षित करण्यात येणार आहे. त्यातून स्थानिक नेतृत्वाचा विकास होणार आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

शासनाने अनुकंपा तत्वावरील सेवाप्रवेशाचे प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी कालबद्ध



कार्यक्रम हाती घेतला. त्यात पंधरा हजार युवकांना अनुकंपातून नियुक्ती देण्यात येणार आहे. सुमारे ३५ मे. वॅट सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाल्याने शेतीला १२ तास दिवसा वीज मिळत आहे. शेतकऱ्यांना दिवसा दहा तास मोफत वीज देण्याचेही नियोजन आहे. यवतमाळ जिल्ह्यातील नागरिकांसाठी आवश्यक सुविधांच्या अनुषंगाने निधीची कमतरता पडू देणार नाही. पावसाने जिल्ह्यात शेती, घरे, पशुधन यांचे नुकसान झाले. त्याची भरपाईही लवकरात लवकर अदा केली जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली.

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते यवतमाळमध्ये ३३५ कोटी रु.च्या विविध विकास कामांचे लोकार्पण भूमिपूजन तसेच उपक्रमांचा शुभारंभ झाला. त्यात आदिवासी विकास विभागाच्या पाच वसतिगृहे व इतर कामे मिळून ५१ कोटी रुपये किंमतीच्या कामांचा समावेश आहे. तसेच बांधकाम विभागाची ६७ कोटींची कामे मुख्यमंत्री सौर ऊर्जा वाहिनी योजनेत ११ सौर ऊर्जा प्रकल्प व इतर कामांसाठी १५८ कोटी व इतर विविध विभागांच्या ५९ कोटी रुपयांच्या कामांचा समावेश आहे.

जिल्हा प्रशासनातर्फे मिशन कॉम्पिटिटिव्ह एक्सलन्स रोड मेंटेनन्स डिजीटल प्लॅटफॉर्म ई–मित्र चॅटबॉट मिशन उभारी समग्र डॅशबोर्ड प्रोजेक्ट सॅन्ड मॅप शासन आपल्या मोबाईलवर सी. आर. एफ. न्ड वार रुप डॅशबोर्ड यासह इतर विविध नाविण्यपूर्ण उपक्रमांचा शुभारंभ मुख्यमंत्र्यांनी केला. यातील ई–मित्र चॅटबॉटद्वारे ३४ योजनांची माहिती केवळ २ क्लिकवर नागरिकांना उपलब्ध होणार आहे. 'उभारी' पद्वारे गेल्या पाच वर्षातील ७७० आत्महत्याग्रस्त कुटुंबांचा ऑनलाईन सर्वे करण्यात आला. या कुटुंबांना विविध योजनांचा लाभ देण्यासाठी उभारी हे प उपयुक्त ठरणार आहे. जिल्हा डॅश बोर्डच्या माध्यमातून विविध शासकीय योजनांचा रिअल टाइम आढावा आणि मॉनिटरिंग करणे सोपे होणार असून कमी कालावधीत योजना नागरिकांपर्यंत पोहोचविण्यास मदत होणार आहे.

धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानाअंतर्गत अनुसूचित जमातीच्या सर्वांगीण विकासासाठी १७ विभागांच्या २५ योजना–उपक्रमांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. त्याला जोडून आदि कर्मयोगी अभियान हे विकेंद्रित आदिवासी नेतृत्व व आदर्श प्रशासन निर्माण करण्यासाठीची चळवळ आहे. जिल्ह्यातील ३६६ गावांचा त्यात समावेश असून, आदिवासी बांधवांना त्याचा लाभ होईल. प्रधानमंत्री किसान सन्मान व नमो शेतकरी महासन्मान निधी योजना जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येत असून दोन लाख ९४ हजार शेतकऱ्यांना योजनेचा लाभ दिला जात आहे. जिल्ह्यात अनुकंपा तत्वावर २७ उमेदवारांना सेवेत घेण्यात आले. त्यातील ४ उमेदवारांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रतिनिधिक स्वरूपात प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

# पुण्यातील दर्ग्याखाली बोगदा! हिंदू संघटनांनी केला मंदिर असल्याचा दावा

पुणे: पुण्यातील मंचर येथील दर्ग्याच्या दुरुस्तीदरम्यान भिंत कोसळली, त्याखाली मंदिरासारखी रचना आढळल्याने वाद निर्माण झाला आहे. त्यांपैकी काही हिंदू गटांनी दावा केला आहे की दर्ग्याखाली मंदिर होते. त्यामुळे हा वाद आणखीन वाढण्याची शक्यता आहे. दरम्यान, तणाव टाळण्यासाठी सदर ठिकाणी पोलिस तैनात करण्यात आले आहेत.

पुण्यातील आंबेगाव तालुक्यातील मंचर येथे मोठा वाद निर्माण झाला आहे. येथील चावडी चौकातील एका स्थानिक दर्ग्यात दुरुस्तीचे काम सुरू असताना शुक्रवारी दुपारी २.३० वाजता दर्ग्याची भिंत कोसळली. ज्यात भिंतीच्या आत बोगद्यासारखी रचना आढळून आली. तसेच, तेथे मंदिर असल्याचे दिसून आले. यामुळे परिसरात एकच गोंधळ निर्माण झाला.

या घटनेनंतर, त्या ठिकाणी खोदकाम करण्यावरून हिंदू आणि मुस्लिम गटांमध्ये वाद सुरू झाला, ज्यामुळे तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. हिंदू गटांनी बोगद्याची सखोल चौकशी करून सत्य बाहेर काढण्याची मागणी केली आहे, असा दावा केला आहे की



त्याखाली मंदिर असू शकते, तर मुस्लिम संघटनांनी दर्ग्याला झालेल्या नुकसानीबद्दल संताप व्यक्त केला आहे आणि ही घटना दुर्दैवी असल्याचे म्हटले आहे.

ग्रामीण पोलिस अतिरिक्त अधीक्षक रमेश चोपडे यांनी वृत्तसंस्थेला याविषयी माहिती देताना सांगितले की, सध्या परिस्थिती नियंत्रणात आहे आणि कोणत्याही संशयास्पद हालचाली रोखण्यासाठी मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. घटनास्थळी स्थानिकांचा प्रवेश प्रतिबंधित करण्यात आला आहे आणि सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. तसेच त्यांनी पुढे सांगितले की, दर्ग्याच्या नूतनीकरणादरम्यान सुमारे ६ फूट खोलीची लाकडी रचना, जी बोगद्यासारखी दिसत होती, ती सापडली. ही घटना उघडकीस आल्यानंतर, दोन्ही समुदायांनी त्यांचे हक्क सांगण्यास सुरुवात केली. सध्या, हे प्रकरण चौकशीत आहे आणि समर्पित विभागाकडे पाठवण्यात आले आहे,

दर्ग्याच्या पुनर्बांधकामावर प्रश्न उपस्थित

या दर्ग्याच्या दुरुस्तीसाठी स्थानिक नगर परिषदेने सुमारे ६० लाख रुपये मंजूर केले होते. मात्र या बांधकामासाठी सर्व अधिकृत परवानग्या घेतल्या गेल्या होत्या का, यावरही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. दरम्यान, या घटनेनंतर, तणाव वाढू नये म्हणून मंचर शहरात मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. नंतर अधिकाऱ्यांनी सांगितले की न्यायालयाचा आदेश येईपर्यंत पुढील बांधकाम होणार नाही.

शांतता राखण्यासाठी बैठका

सदर ठिकाणी अराजकता किंवा धर्मावरून वाद होऊ नये, तसेच शांतता राखण्यासाठी हिंदू आणि मुस्लिम समुदायाच्या नेत्यांसोबत बैठका घेण्यात येत आहेत. मुस्लिम समुदायाने न्यायालयाच्या निर्णयाचे पालन करण्याची तयारी दर्शविली आहे, तर हिंदू गटांनी दर्ग्याच्या दुरुस्तीचे काम थांबवण्यासाठी न्यायालयात जाणार असल्याचा निर्धार केला आहे.

# हिंगोलीत गोरक्षकावर समाजकंटकांचा चाकूने प्राणघातक हल्ला





तभा वृत्तसेवा
हिंगोली, १३ सप्टेंबर

शहरातील पोलिस पेट्रोलपंप व उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालयाच्याजवळ एका २७ वर्षीय गोरक्षकावर समाजकंटकांनी पाठलाग करीत चाकूने प्राणघातक हल्ला केला असून ही संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेर्यात कैद झाली आहे. गोरक्षकाने हल्लेखोरांच्या तावडीतून सुटून पोलिस पेट्रोलपंपात घुसल्यामुळे त्याचा जीव वाचला आहे. याप्रकरणी पोलिसांनी तीन जणांना ताब्यात घेतले असून यामध्ये एका माजी नगरसेवकाचा नातेवाईकही सहभागी आहे.

येथील इंदिरा गांधी चौकात गोरक्षक कृष्णा गोविंद जगताप वय २७ हे काही कामानिमित्त आले असता त्यांच्यामागून आलेल्या दुचाकीवरील समाजकंटकांनी अचानक त्यांच्यावर चाकूने प्राणघातक हल्ला केला. कृष्णाने प्रसंगावधान राखून त्यांचा प्रतिकार करीत उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालयाजवळ असलेल्या पोलिस पेट्रोलपंपापर्यंत पळ काढला. परंतु हल्लेखोरांनी त्यांचा पाठलाग करीत पेट्रोल पंपासमोर त्यांच्यावर चाकूने पुन्हा हल्ला केला.

तिथेही कृष्णाने प्रतिकार करीत पोलिस पेट्रोलपंपात घुसल्यामुळे हल्लेखोर तिथून फरार झाले. दिवसाढवळ्या दुपारी ही घटना घडली. पोलिसांनी तत्काळ कृष्णाला जखमी अवस्थेत येथील लक्ष्मी लाईफ केअर हॉस्पीटलमध्ये दाखल केले असून त्यांच्या पाठीवर तसेच शरीरावर चाकूचे वार आहेत. याप्रकरणाची गंभीर दखल घेत पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, उपविभागीय पोलिस अधिकारी तसेच पोलिस निरीक्षक संदीप मोदे यांनी सीसीटीव्हीच्या माध्यमातून तीन जणांना ताब्यात घेतले असून यामध्ये एका माजी नगरसेवकाच्या नातेवाईकाचा समावेश आहे.

### ईपीएफओ सदस्यांसाठी आता बँकेसारख्या सुविधा

मुंबई : देशातील कोट्यवधी ईपीएफओ सदस्यांसाठी आनंदवार्ता आहे. गेल्या काही महिन्यांपासून या सदस्यांना पीएफचा पैसा आणि पेन्शन एटीएमच्या माध्यमातून काढता येते. इतकेच काय सदस्यांना युपीआय प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून ही रक्कम काढता येईल अशा चर्चा सुरू झाल्या आहेत. जून–जुलै महिन्यात ही सुविधा सुरू करण्याची चर्चा सुरू होती. पण सेवा सुरू झाली नाही. पण आता या बैठकीत यावर तोडगा निघण्याची शक्यता आहे. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेचे (ईपीएफओ) देशभरात लाखो सदस्य आहेत. सेंट्रल बोर्ड ऑफ ट्रस्टीजची (सीबीटी) महत्त्वपूर्ण बैठक १०–११ ऑक्टोबर रोजी होत आहे.

# महाराष्ट्रातील १७ जिल्ह्यांना मुसळधार पावसाचा इशारा

मुंबई: गणपती विसर्जनानंतर अनेक दिवस दडी मारून बसलेला मान्सून महाराष्ट्रात पुन्हा परतण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दिनांक १६ ते १८ सप्टेंबर दरम्यान महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये पुन्हा मुसळधार पाऊस कोसळणार आहे. यापूर्वी ऑगस्टमध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले होते, त्यानंतर आता पुन्हा एकदा राज्यभर पावसासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होत आहे.

हवामान तज्ञांनी सूचित केले आहे की सप्टेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात राज्यात परतीचा मान्सून सक्रिय होऊ शकतो. दरम्यान, आता पुन्हा एकदा राज्यात पावसासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होत आहे.

हवामान खात्याने दिला इशारा

हवामान खात्याच्या म्हणण्यानुसार, १६ ते १८ सप्टेंबर दरम्यान राज्यात मुसळधार ते मध्यम पावसाची शक्यता आहे. त्याचबरोबर शुक्रवारपासून वातावरणात बदल दिसून येत आहेत आणि हवेतील आर्द्रता वाढू लागली आहे. हवामान तज्ज्ञांचे म्हणणे आहे की मान्सून परतण्याची ही सुरुवातीची चिन्हे आहेत. गेल्या काही दिवसांच्या विश्रांतीनंतर, पावसाने पुन्हा जोरदार पुनरागमन केले आहे. ज्यामुळे राज्यात पुन्हा एकदा हवामान आल्हाददायक झाले आहे. पुढील आठवड्यात म्हणजेच १३ ते १८ सप्टेंबर दरम्यान राज्यातील १७ जिल्ह्यांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. ढगांमुळे गेल्या काही दिवसांत आर्द्रता आणि उष्णतेत खूप वाढ झाली होती, परंतु लवकरच परतीचा पाऊस सुरू होणार असल्यामुळे लोकांना नक्कीच त्यातून दिलासा मिळेल. तथापि, सततच्या पावसामुळे अनेक ठिकाणी पाणी साचण्याची, वाहतूक कोंडी होण्याची आणि पिकांचे नुकसान होण्याची देखील शक्यता आहे.

**या जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस**

**हवामान विभागाने मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सांगली, सातारा, अहमदनगर, लातूर, नांदेड, बीड, परभणी, हिंगोली, यवतमाळ या सर्व ठिकाणी मध्यम ते मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. यासोबतच नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नदीकाठच्या नागरिकांना विशेष खबरदारी घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे.**

# लातूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.**
**आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.**


## मुलीचे अपहरण करून अत्याचार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१३ ऑगस्ट -** गावाशेजारील एका अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिला मुंबईला भावाकडे नेऊन ठेवले, आरोपी गावाकडे आला. पोलिसांना संशय आल्याने त्याला ताब्यात घेतल्यानंतर मुलीला पळवून नेल्याचे उघडकीस आले. मुलीच्या फिर्यादीवरून आरोपीविरोधात अपहरण, अत्याचार व पोक्सो अंतर्गत एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

४ सप्टेंबर रोजी एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अज्ञाताने अपहरण केले होते. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात पीडितेच्या वडिलांच्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपीविरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपी ओंकार परमेश्वर समंदे (वय २१, रा. पाखरसांगवी, ता. लातूर) याने मुलीला फूस लावून मुंबई येथे त्याच्या भावाकडे नेऊन सोडले होते. त्यानंतर तो पाखरसांगवीला आला होता. नातेवाईकांना संशय आल्याने पोलिसांना कल्पना दिली. त्यावरून पोलिसांनी आरोपी ओंकार याला ताब्यात घेतले. अधिक चौकशी केली असता, पीडितेला त्यानेच फूस लावून पळवून नेल्याचे त्याने कबूल केले.

तिला घेऊन मुंबई येथे भावाकडे सोडल्याचेही त्याने सांगितले. पोलिसांनी ओंकार याच्या भावाला सांगून पीडित मुलीला आणून सोडण्यास सांगितले. त्यावरून पीडितेला आणण्यात आले. आरोपी ओंकार परमेश्वर समंदे याच्याविरोधात एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक भाऊसाहेब खंदारे हे करीत आहेत. आरोपी ओंकार परमेश्वर समंदे याला अटक करून न्यायालयापुढे हजर केले असता, तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली असल्याचे सहायक पोलीस निरीक्षक खंदारे यांनी सांगितले.



### संक्षिप्त वृत्त...

## मागण्यांसाठी पालिकेत ‘हलगीनाद’ आंदोलन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१३ ऑगस्ट -** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे सार्वजनिक जयंती महोत्सव समितीच्यावतीने मातंग समाजाच्या विविध मागण्यांसाठी महापालिकेवर ‘हलगीनाद’ आंदोलन करत जोरदार निदर्शने करण्यात आली. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे चौकातून निघालेल्या या आंदोलकांनी महापालिका कार्यालयासमोर ठिय्या मांडून प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले.

साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्याशेजारील अतिक्रमणमुक्त मोकळी जागा तेथील पार्किंग आरक्षण उठवून मातंग समाजाच्या समाजोपयोगी कार्यासाठी द्यावी. आद्य क्रांतीगुरु लहुजी साळवे चौकात त्यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा. पालिकेतील सेवानिवृत्त व सेवा बजावणाऱ्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या वारसांची अनुकंपा तत्वावरील भरती प्रक्रिया राबवावी. घंटागाडीवरील कामगारांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घ्यावे, या मागण्यांसाठी आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात मातंग समाजाच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता. महापालिकेच्या प्रवेशद्वारासमोर जमलेल्या आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला होता. या ‘हलगीनाद’ आंदोलनाने मातंग समाजाच्या मागण्या सरकार आणि प्रशासनापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

## रोटरी क्लबकडून शिक्षकांचा गौरव

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१३ ऑगस्ट -** शिक्षक दिनाचे औचित्य साधून रोटरी क्लब लातूरच्यावतीने उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांना शिक्षक गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. श्रीकिशन सोमाणी शाळेच्या सभागृहात हा सोहळा पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरी क्लब, लातूरचे अध्यक्ष जकीखान कायमखानी होते. मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. पूनम नाथानी, निलंगा पंचायत समितीचे विस्तार अधिकारी संतोष स्वामी, डॉ. संदीपान जगदाळे, रविशंकर हिंगणे उपस्थित होते.

यावेळी शिक्षक सुधाकर मोरे, मोतीबुवा गोसावी, जमिलाबी पटेल, गीतांजली कवडे, जालिंदर कांबळे, अ. वाजीद शेख, गौसोद्दीन शेख यांचा शिक्षक गौरव पुरस्काराने सन्मान करण्यात आला. तसेच रोटरी सॅटेलाइट क्लब ऑफ ॲस्पायरेनच्यावतीने श्रुती गोडे, डॉ. अनिता सोनवणे, तृप्ती जेऊरकर, फईमबानो सय्यद यांनाही शिक्षक गौरव पुरस्कार देण्यात आला. यावेळी रोटरी क्लबचे सचिव विश्वनाथ निगुडगे, हरिप्रसाद सोमाणी, सुरेश पेन्सलवार, मोहन परदेशी, महेंद्र जोशी, विनोद लड्डा, रेड्डी, अनिल थोरमोटे, सुशांत कुलकर्णी, पुरुषोत्तम कालिया, रामनिवास धूत, रामप्रसाद राठी, सीए सुनील कोचेटा, ॲड. सतीश दिवाण, गोपाल राठी, हर्षद राजूरकर, ब्रह्मकुमार सुवर्णकार, विश्वजीत कदम, अनिरुध्द मुचलमकर, सॅटेलाईट क्लबच्या अध्यक्षा कौशल्या सोनकवडे, सचिव वनिता लचुरिया यांच्यासह अन्य पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. सूत्रसंचालन आसिफ सय्यद यांनी केले.

## शिबिरात ४०० जणांची आरोग्य तपासणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१३ ऑगस्ट -** तालुक्यातील मुरुड येथील झुंजार गणेश मंडळाच्यावतीने मोतीबिंदू व सर्वरोग निदान शिबिर घेण्यात आले. शिबिरात ४०० नागरिकांची तपासणी करण्यात आली. उद्घाटन ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. राजाभाऊ गलांडे, उपसरपंच हनुमंत नागटिळक, महेश कणसे यांच्या हस्ते झाले.

या शिबिरात डोळ्यांची मोतीबिंदू तपासणी, रक्तदाब, मधुमेह, हाडांचे विकार, दंतरोग, हृदयरोग आदी विविध आजारांसह इतर विविध तपासण्या करण्यात आल्या. या शिबिरासाठी तज्ज्ञ डॉक्टरांनी रुग्णांचे तपशीलवार परीक्षण करून त्यांना आवश्यक ती औषधे व मार्गदर्शन दिले. मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरलेल्या ४२ रुग्णांची नोंदणी करण्यात आली. शिबिराच्या आयोजनात डॉ. गोबाडे, डॉ. पुरी, डॉ. गातेगावकर, डॉ. वाघमारे, डॉ. महाजन, डॉ. कुलकर्णी, डॉ. केंद्रे, डॉ. काळे, डॉ. अनिता राठोड तसेच स्नेहा गोंगले, राम आदनाक, प्रताप लोमटे, सोनाली बिराजदार, शुभम पांगरेकर, गडदे गजानन, स्वाती उंडारकर, शीतल लोंढे, नवगिरे यांच्यासह झुंजार गणेश मंडळाचे अध्यक्ष अमोल निपाणीकर, फुलचंद खराडे, रवी फेरे, अतुल रणदिवे, दत्ता फेरे, तेजस निंबाळकर, सलीम पठाण, राम चव्हाण, महेश घंटे, रणजित सापसोड, दिनेश कणसे, सुरेश खराडे, गोडसे आदींसह गणेश मंडळाचे पदाधिकारी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खा. चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत आज मेळावा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१३ ऑगस्ट -** भारतीय जनता पार्टी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या वतीने भाजपाचे नुतन जिल्हाध्यक्ष यांचा जाहीर सत्कार आणि मतदार संघातील कार्यकर्त्यांचा संकल्प मेळावा राज्याचे माजी मुख्यमंत्री खा. आशोकराव चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत येत्या १४ सप्टेंबर २०२५ रविवार रोजी आयोजीत करण्यात आला आहे.

भारतीय जनता पार्टीचे लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी माजी मंत्री बस्वराज पाटील मुरूमकर आणि लातूर शहर जिल्हाध्यक्षपदी अजितसिंह पाटील कव्हेकर यांची नुक्तीच प्रदेश भाजपा पक्षश्रेष्ठीच्या वतीने निवड करण्यात आली असून त्यांचा लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या वतीने खा. आशोकराव चव्हाण यांच्या शुभहस्ते जाहीर सत्कार करण्यात येणार असून लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपा कार्यकर्त्यांचा भव्य संकल्प मेळावा आयोजीत करण्यात आला आहे. संकल्प मेळावा आणि सत्कार सोहळा या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान आ. रमेश कराड हे भुषविणार आहेत. तर यावेळी पाशा पटेल,आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, औसा विधानसभेचे आ. अभिमन्यू पवार, गोपीनाथ मुंडे ऊस तोड कामगार मंडळाचे अध्यक्ष गोविंद अण्णा केंद्रे, माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर, भाजपा नेत्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, माजी जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमूख यांच्यासह इतर अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# मराठा समाजास ओबीसीतून आरक्षण दिल्यास तीव्र लढा



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१३ ऑगस्ट -** ५२ टक्क्याने असलेल्या ओबीसीला आता केवळ १७ टक्के आरक्षण शिल्लक राहिले आहे. यात पुन्हा बहुसंख्येने असलेल्या मराठा समाजास कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसी आरक्षण दिले तर मूळ ओबीसींवर मोठा अन्याय होणार आहे. मराठा समाजास ओबीसीतून आरक्षण देण्यास आमचा तीव्र विरोध आहे, आम्ही ते होऊ देणार नाही, असा इशारा ओबीसी नेते तथा राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी दिला.

हैदराबाद गॅझेटच्या निषेधार्थ मांजरा नदीपात्रात उडी मारून आत्महत्या केलेल्या रेणापूर तालुक्यातील वांगदरी येथील भरत कराड याच्या कुटुंबियांची शुक्रवारी सकाळी भेट घेऊन सांत्वन केले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे, भाजप नेते आमदार रमेश कराड यांच्यासह अन्य ओबीसी नेत्यांनीही भरत कराड याच्या कुटुंबीयांना धीर देत सांत्वन केले.

यावेळी मंत्री भुजबळ म्हणाले, महाराष्ट्रातील ओबीसींना मंडल आयोगापासून आरक्षण मिळाले आहे. तेही आता १७ टक्केच शिल्लक राहिले आहे. आमचा ओबीसी आरक्षण टिकविण्यासाठीचा लढा आहे. आमच्यावर आता अतिक्रमण करू नका, आमचे आरक्षण हिरावून घेऊ नका, अन्यथा आम्ही आमचे आरक्षण टिकविण्यासाठी तीव्र लढा देऊ. त्यासाठी ओबीसी समाजबांधवांनी आपापसातील मतभेद बाजूला सारून एकजूट करावी, ओबीसी आरक्षण टिकविण्यासाठीच्या लढ्याला साथ द्यावी. आम्ही आहे ते आरक्षण टिकवू, पण कोणीही ओबीसी आरक्षणाच्या कारणावरून आत्महत्येसारखा टोकाचा मार्ग स्विकारू नये, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी मंत्री भुजबळ यांनी भरत कराड याच्या लेकरांच्या डोक्यावरून हात फिरवत त्यांचे अश्रू पुसले. भरत कराड याचे बलिदान वाया जाऊ देणार नाही, त्याच्या लेकरांची आपण जबाबदारी घेत आहोत, असे भुजबळ यांनी सांगितले. भरत कराड यांच्या कुटुंबीयांची जबाबदारी घ्या, बाकी आम्ही ती जबाबदारी स्विकारतोच, असे भुजबळ यांनी आमदार रमेश कराड यांना म्हटले.

यावेळी ओबीसी समाज बांधवांनी ‘न्याय द्या, न्याय द्या, ओबीसींना न्याय द्या’, ‘भुजबळ साहेब आगे बढों, हम तुम्हारे साथ हैं’, ‘अमर रहे-अमर रहे भरत कराड अमर रहें’ अशा स्वरूपाच्या घोषणा दिल्या.

### ...तर इतर आरक्षण सोडणार का?

आजघडीला महाराष्ट्रात मराठा समाजाला १० टक्के आरक्षण आहे. त्याची अंमलबजावणी सुरु आहे. तसेच ईडब्ल्यूएसचे १० टक्के आरक्षण आहे. या आरक्षणात ९० टक्के लाभ मराठा समाजाला मिळत आहे. याशिवाय हे सर्व ओपनमधील लाभही घेत आहेत. असे असताना ओबीसीतून यांना आरक्षण कशासाठी हवे आहे? तुम्हाला जर ओबीसीतून आरक्षण पाहिजे तर मग तुम्ही ओपनमधील हक्क सोडणार का? मराठ्यांसाठी असलेल्या १० टक्के आरक्षणाचा हक्क सोडणार का?, ईडब्ल्यूएसमधील हक्क सोडणार का? असे प्रश्न उपस्थित करून मराठा समाज हा राजकारणात सर्वाधिक आहे. प्रत्येक ठिकाणी याच समाजाचे पदाधिकारी, प्रतिनिधी आहेत. ओबीसीतून आरक्षण मिळवून मराठा समाजाला ओबीसीचे राजकीय आरक्षण हस्तगत करायचे आहे, अशी भीती मंत्री भुजबळ यांनी व्यक्त केली.

## दहशत पसरविणारी टोळी जेरबंद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१३ ऑगस्ट -** कळंब रोडवरील रेल्वे गेटजवळ आठवडाभरापूर्वी रात्रीच्या सुमारास किरकोळ कारणावरून हातात कत्ती घेऊन गंभीर मारहाण करून दहशत पसरविणाऱ्या सातपैकी पाचजणांच्या टोळीला एमआयडीसी पोलिसांनी शुक्रवारी अटक केली असून, अन्य दोन आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत.

शहरातील कळंब रोडवरील रेल्वे गेटजवळ असलेल्या एका हॉटेलवर ५ सप्टेंबर रोजी रात्री पावणेदहा वाजण्याच्या सुमारास काही आरोपींनी यातील फिर्यादीस तू आमच्याकडे का बघतोस, असे म्हणत शिवीगाळ करून, फिर्यादीस कत्तीने व फरशीने मारहाण करून गंभीर जखमी केले होते. तसेच कत्तीचा धाक दाखवून परिसरात दहशत पसरविण्याचा प्रयत्न केला होता.

या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा सात आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यापासून आरोपी फरार होते. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी गुन्ह्यातील आरोपींना तत्काळ अटक करण्याचे आदेश दिले होते.

अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, शहर उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोपींचा शोध घेण्यासाठी पथके रवाना करण्यात आली होती. दरम्यान, गोपनिय बातमीदाराकडून पथकाला आरोपींची माहिती मिळाली. पथकाने श्याम सुरेश पवार, अभिषेक सामलिंग चिकटे (दोघेही रा. वरवंटी, ता. लातूर), शुभम प्रदीप राठोड (रा. हरगुंळ खु., ता. लातूर), प्रेम बापू जाधव (रा. आवंतीनगर, लातूर) आणि शुभम विनायक गायकवाड (रा. शासकीय कॉलनी, बार्शी रोड, लातूर) या पाच आरोपींना अटक केली असून, अन्य दोन आरोपींच्या शोधासाठी पोलीस पथके तैनात करण्यात आली आहेत. अटकेतील आरोपींना गुरुवारी न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनात एमआयडीसीचे ठाण्याचे पोलीस निरीक्षक समाधान चवरे, पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत मोरे, सहायक फौजदार भीमराव बेल्लाळे, पोलीस अंमलदार बळवंत भोसले, राजू मस्के, अक्षय डिगोळे, विश्वंभर तुरे यांनी ही कारवाई केली.

## विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांच्या एकत्रित प्रयत्नामुळे अपेक्षित यश मिळेल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१३ ऑगस्ट -** स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालयाच्यावतीने विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी अनेक प्रयत्न केले जातात. अनेक शिष्यवृत्ती परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना बसवून गुणवत्तेचा लातूर पॅटर्न जपण्याचे काम गेल्या अनेक वर्षापासून केले जात आहे. त्यामुळे यापुढील कालावधीतही विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांच्या एकत्रित प्रयत्नातून संस्थेला अपेक्षित यश मिळेल असा विश्वास स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजी सूर्यवंशी यांनी व्यक्त केला.

यावेळी ते स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालयात विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांच्या चर्चासत्रात बोलत होते. यावेळी या कार्यक्रमाला सोनाली पाटील, शितल वाडीकर, माधव गित्ते, शुभांगी बेरुळे आणि ज्योती राजूरे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना मुख्याध्यापक शिवाजी सूर्यवंशी म्हणाले की, या चर्चासत्राच्या माध्यमातून शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी कशी करून घ्यावी, परीक्षेसाठी असलेल्या गुणांची विभागणी कशी आहे, कोणत्या घटकावर अधिक लक्ष केंद्रीत करणे गरजेचे आहे, मुले घरी अभ्यास करताना पालकांशी कशी काळजी घ्यावी, त्यांना अभ्यासासाठी प्रोत्साहन व मार्गदर्शक कसे करावे. याबाबत सविस्तर माहिती देऊन या चर्चासत्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेला सक्षमपणे सामोरे जावे. असे आवाहनही मुख्याध्यापक शिवाजी सूर्यवंशी यांनी यावेळी बोलताना केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी संयोजन समितीच्यावतीने प्रमुख मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. यावेळी या कार्यक्रमाला पालक व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

जेएसपीएम संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी अनेक शैक्षणिक उपक्रम घेतले जातात असे यावेळी राजूरे म्हणाल्या.

## काँग्रेस कार्यकर्त्यांचा आ. कराड यांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१३ ऑगस्ट -** लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात होत असलेल्या विविध विकास कामांना प्रेरित होऊन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून लातूर तालुक्यातील मोजे पिंपळगाव आंबा येथील काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील गावागावात वाडीवस्तीत आ. कराड यांच्या माध्यमातून केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध विभागामार्फत सर्वांगीण विकासाच्या योजना राबवल्या जात असून वैयक्तिक लाभाच्या योजनेचा मोठ्या प्रमाणात गरजूंना लाभ मिळत आहे. एकूणच संपूर्ण मतदारसंघात विकास कामांना गती मिळाली आहे. होत असलेल्या कामांना प्रेरित होऊन लातूर तालुक्यातील मोजे पिंपळगाव आंबा येथील युवक काँग्रेसचे अध्यक्ष प्रशांत पिसाळ, राजेसाहेब देशमुख, भुजंग पिसाळ यांच्यासह इतर अनेकांनी आ. कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भारतीय जनता पार्टी जाहीर प्रवेश केला आहे.

यावेळी भैरवनाथ पिसाळ, विजय पिसाळ, बापूराव बिडवे, प्रशांत शिंदे, अच्युत पिसाळ, रावस पिसाळ, मधुकर बिडवे, गहिनीनाथ नाळापुरे, दत्तात्रय पिसाळ, पांडुरंग पिसाळ आदी उपस्थित होते.

## उजळून देतो म्हणून आठ तोळे दागिने लंपास

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१३ ऑगस्ट -** सोन्याचे दागिने उजळून देतो म्हणून येथील खोरी गल्लीतील डॉक्टर दांपत्याला दोन तरुणांनी फसवत चार लाख ८० हजार रुपयांचे आठ तोळ्याचे दागिने लंपास केले. याप्रकरणी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आल्याचे पोलिस निरीक्षक दिलीप सागर यांनी सांगितले.

येथील खोरी गल्लीत डॉ. अरुण शहा व त्यांची पत्नी सुनंदा शहा राहतात. शुक्रवारी (ता. १२) दुपारी १२.१५च्या सुमारास डॉ. शहा व त्यांची पत्नी दोघेच घरी होते. त्यावेळी एक अज्ञात व्यक्ती त्यांच्या गेटवर आला. त्याने प्रवेश करून पितळी भांडी पॉलिश करण्याचे प्रॉडक्ट आम्ही वाटप केले आहे, ते तुम्हाला मिळाले आहे का, म्हणून विचारणा केली. त्यावेळी डॉ. शहा यांनी त्याला तेथून हाकलून दिले. थोड्या वेळानंतर त्या व्यक्तीसोबत दुसरा एक व्यक्ती गेटवर आला. पितळी भांडी उजळून देण्याबद्दल माहिती सांगत ते दोघेही घरात आले. त्यापैकी एकाने एक पितळी भांडे उजळून चमकवून डॉ. शहा यांना दाखवले. शिवाय दागिने पॉलीश करतो असे सांगीतल्याने त्यांनी डॉ. शहा व त्यांच्या पत्नीचा विश्वास संपादित केला. यावेळी त्या दोघांनी हात चलाखि करीत शहा दाम्पत्याचे आठ तोळे सोने लंपास केले.

## सेवाकार्याचा ‘लातूर पॅटर्न’ निर्माण करा

### भाजपचे संघटन मंत्री संजय कौडगे यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१३ ऑगस्ट -** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनानिमित्त १७ सप्टेंबर ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीपर्यंत म्हणजेच २ ऑक्टोबर यादरम्यान देशभरात भाजपच्यावतीने सेवा पंधरवाडा आयोजित करण्यात येत आहे. या सेवा पंधरवाड्यात विविध कार्यक्रम होणार असून, यामध्ये सेवा परमो धर्म या विचारांना पुढे नेत शहर भाजपने सेवाकार्याचा ‘लातूर पॅटर्न’ निर्माण करावा, असे आवाहन मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगे यांनी केले.

सेवा पंधरवाड्यानिमित्त आयोजित शहर भाजप पदाधिकाऱ्यांच्या कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी माजी मंत्री आमदार संभाजी पाटील निलंगेकर, अभियानाच्या प्रदेश सहसंयोजिका प्रेरणा होनराव, शहराध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, भाजप नेत्या डॉ. अर्चना पाटील चाकूरकर, माजी शहराध्यक्ष देविदास काळे, शहर संयोजक अमोल गिते, सहसंयोजक संजय गिर, रविशंकर लवटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सेवा पंधरवाडा अभियान लातूर भाजपने यशस्वी करावे. या सेवा पंधरवाड्याच्या माध्यमातून जनसेवा करण्याची संधी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना उपलब्ध झाली असून, प्रत्येकाने यात आपले योगदान द्यावे, असे आवाहन आमदार निलंगेकर यांनी केले.

सेवा पंधरवाड्यानिमित्त स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, रक्तदान शिबिर, मोदी विकास मॅरेथॉन, दिव्यांग सन्मान, विकसित भारत चित्रकला स्पर्धा, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीवनावर आधारित पुस्तकांचे वितरण, प्रबुध्द संमेलन आदि उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे प्रेरणा होनराव यांनी सांगितले.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाहिलेले विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करणे ही आपल्या प्रत्येकाची जबाबदारी आहे. या माध्यमातून पालिका निवडणुकीच्या प्रचाराची एक फेरीही आपल्याला पूर्ण करता येणार आहे, असे शहराध्यक्ष कव्हेकर यांनी सांगितले.

सूत्रसंचालन महिला मोर्चा अध्यक्षा रागिणी यादव यांनी केले. कार्यशाळेत सरचिटणीस रवी सुडे, ॲड. दिग्विजय काथवटे, मीना भोसले, प्रवीण सावंत, युवा मोर्चा अध्यक्ष गणेश गोमचाळे, मंडल अध्यक्ष सुरेश जाधव, निर्मला कांबळे, राहुल भुतडा, रोहित पाटील, विशाल हावा, सचिन सुरवसे, अजय भुमकर, निखील गायकवाड, मोहसीन शेख यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी होते.

# पैठणच्या दुर्गा लॉजवर विवाहितेवर अत्याचार

पैठण दि १३:- पैठण बसस्थानक जवळील हॉटेल न्यू दुर्गा या ठिकाणी तालुक्यातील डोंगर टेकडी तांडा येथील एका विवाहित महिलेवर बलात्कार झाल्याची घटना दिनांक २० जुलै रोजी ते ११ सप्टेंबर दरम्यान घडली आहे. तालुक्यातील टेकडी तांडा येथील तीस वर्षे वयाच्या विवाहितेस 'तू मला आवडतेस मी तुझी व तुझ्या मुलीची सोय करतो तुझ्या पतीला सोडून दे' असे म्हणत दुर्गा लॉजवर मोटरसायकलवर बसून घेऊन आला व सदर महिलेवर जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याची तक्रार सदर विवाहितेने पैठण पोलीस ठाण्यात केली आहे. या प्रकरणी विविध कलमान्वये पैठण पोलीस ठाण्यात आरोपी रवी अंतीलाल राठोड राहणार डोणगाव टेकडी तांडा याच्यावर पैठण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सारंग व सहाय्यक फौजदार सुधीर ओहोळ हे करीत आहे अशी माहिती पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांनी दिली आहे.

## प्राचीन नागघाट परिसराची स्वच्छता

पैठण दि १३ :- दक्षिण काशी गोदावरी गंगेवरील संत ज्ञानेश्वर महाराज यांनी रेड्यामुखी वेद वदविलेल्या प्राचीन नागघाट परिसरासाच्या



स्वच्छतेसाठी नगर परिषद मुख्याधिकारी डॉ.पल्लवी अंभोरे यांनी स्वच्छता कर्मचारी नियुक्ती केली असून याठिकाणी स्वच्छता होत आहे.

प्राचीन महादेव मंदिर, पेशवे गणपती, मारुती मंदिर, सप्तऋषी स्थान, माता शक्ती स्थान तसेच नागमंदिर अशी धार्मिक स्थळे या नैसर्गिक परिसरात असून याठिकाणी पर्यटक तसेच भाविकांची नेहमी वर्दळ असते.मागील काळात परिसर तसेच स्मशानभूमी ठिकाणी प्रचंड अस्वच्छता झाल्याने याठिकाणी स्वच्छता कर्मचारी देण्याची मागणी करण्यात आली होती. यावर नगर परिषदेच्या वतीने मोक्ष घाटाचे कर्मचारी अतुल शरद कातकडे यांच्याकडे परिसराची स्वच्छता देण्यात आली असून याठिकाणी स्वच्छता करण्यात येत आहे.

## अभियंता दिन विशेष: दीप्ती प्रत्ती यांनी ॲमेझॉनमध्ये क्षमतांना नव्या उंचीवर नेले

पुणे : अभियंते अमूर्त संकल्पनांना मूर्त उपायांमध्ये रूपांतरित करणारे नाविन्यतेचे शिल्पकार आहेत, ज्यांचा दररोज अब्जावधी व्यक्तींच्या जीवनावर परिणाम होतो. पिढ्यानपिढ्या टिकून राहणाऱ्या पायाभूत सुविधांची रचना करणे असो किंवा आधुनिक व्यापाराला चालना देणारे अल्गोरिदम विकसित करणे असो ते तांत्रिक कौशल्य आणि सर्जनशीलता एकत्र करत गुंतागूंतीच्या समस्यांचे निराकरण करतात. अभियंता दिनानिमित्त आम्ही या बिल्डर्स, विचारवंत आणि नवप्रवर्तकांचा सन्मान करतो, जे शांतपणे आपल्या जगाला आकार देतात. ॲमेझॉनमध्ये अभियांत्रिकी उत्कृष्टता ग्राहकांच्या आवडीचा पाया आहे, तसेच ॲमेझॉनच्या नाविन्यपूर्ण उपक्रमांमागील प्रेरणास्रोत आहे. अभियंते ग्राहकांसोबत सुरूवात करून अथक मेहनत करण्याच्या, ग्राहक अनुभव सुलभ व उत्साहित करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या कंपनीच्या तत्त्वाशी संलग्न आहेत. हा उत्साह व्यक्त करणाऱ्या अशाच एक अभियंता आहेत ॲमेझॉनमधील बिझनेस इंटेलिजन्स इंजीनिअर दीप्ती प्रत्ती, ज्यांच्या प्रवासामधून सर्वसमावेशक कामाच्या ठिकाणाची स्थिरता, अनुकूलता आणि क्षमता दिसून येते.

## आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेडच्या अँथे चा १६ वर्षांचा यशस्वी प्रवास

नाशिक, १३ सप्टेंबर २०२५: मागील १६ वर्षांपासून विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना यशात रूपांतरित करत आलेल्या आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेड या देशातील अग्रगण्य टेस्ट प्रिपरेटरी संस्थेने आपल्या प्रतिष्ठित उपक्रमाची – अँथे २०२५ (आकाश नॅशनल टॅलेंट हंट एक्झाम) – घोषणा केली आहे. भारतीय शैक्षणिक क्षेत्रातील एक अत्यंत प्रतीक्षित वार्षिक परीक्षा असलेल्या अँथे २०२५ चा उद्देश इयत्ता ५वी ते १२वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने आव्हानांना सामोरे जाण्यास आणि खऱ्या अर्थाने प्रॉब्लेम सॉल्व्हर्स होण्यासाठी सक्षम करणे हा आहे.गुणवत्तापूर्ण शिक्षण सर्वांसाठी उपलब्ध व्हावे, या उद्देशाने अँथे २०२५ द्वारे विद्यार्थ्यांना २५० कोटींपर्यंतचे १००% स्कॉलरशिप्स आणि २.५ कोटींच्या रोख पारितोषिकांची संधी दिली जात आहे. ही संधी क्लासरूम, आकाश डिजिटल आणि इन्विक्टस कोर्सेससाठी उपलब्ध आहे. या परीक्षेमुळे विद्यार्थ्यांना नीट, जेईई, राज्य सीईटी, एनटीएसई आणि ऑलिंपियाड्ससारख्या स्पर्धा परीक्षांसाठी आकाशच्या अनुभवी मार्गदर्शकांकडून दर्जेदार मार्गदर्शन घेण्याचा मार्ग खुला होतो.

## पुण्याच्या समिहान कुलकर्णीची उत्तुंग झेप

पुणे : सॅम या टोपणनावाने ओळखला जाणारा आणि ई-स्पोर्ट्समध्ये एक उदयोन्मुख प्रतिभा असलेला पुण्याचा २२ वर्षीय समिहान कुलकर्णी हा अत्यंत चुरशीच्या आणि अटीतटीच्या मोबाइल इंडिया शोडाउन २०२५ या स्पर्धेमध्ये व्हिक्टोरेस सुमस संघाचे प्रतिनिधित्व करत आहे. व्हिक्टोरेस सुमस संघाचा आक्रमक खेळाडू म्हणून प्रसिध्द असलेला सॅम भारतातील सर्वात मोठ्या बीजीएमआय मंचावर ओवैस, शायान, माफिया आणि निन्झे यांच्यासारख्या अनुभवी खेळांडूसमवेत खेळताना स्वतःचे कौशल्य सिद्ध करण्यासाठी अतिशय दृढनिश्चयाने सज्ज आहे. समिहानचा बीजीएमआय सोबतचा प्रवास २०१८ मध्ये सुरू झाला. पण या खेळात त्याने स्वतःला पूर्णपणे झोकून दिल्यानंतर २०२२ मध्ये तो खऱ्या अर्थाने प्रकाशझोतात आला. मला नेहमीच मोबाईलवर एफपीएस गेम आवडत असत. माझ्या शेजाऱ्याने मला बीजीएमआय गेमबाबत माहिती दिली. मला हव्या असलेल्या सर्व गोष्टी या गेममध्ये होत्या आणि त्यामुळे मी या गेममध्ये मनापासून रमलो, या शब्दांत त्याने आपला प्रवास सांगितला. गेमिंगला फारसा पाठिंबा नसलेल्या वातावरणात वाढलेल्या समिहानला सुरुवातीला कुटुंबाकडूनही फारसा पाठिंबा मिळाला नाही. आपल्या वाटचालीबद्दल माहिती देताना तो म्हणाला, सुरुवातीला मी या खेळामध्ये सहभागी झाल्यानंतर मी काय करतोय, याची फारसा अंदाज माझ्या कुटूंबाला येत नव्हता. पण गेममधून कमाई करायला सुरुवात केल्यानंतर त्यांनी मला पूर्ण पाठिंबा दिला. एवढेच नव्हे तर त्यांनी खेळाबरोबरच शिक्षण पूर्ण करण्यासही मला प्रोत्साहनही दिले.

## दु:खद घटना आणि रहस्य तिचे विश्व उद्ध्वस्त करणार?

मुंबई, १३ सप्टेंबर २०२५: चांगला बोध देणारे कथानक आणि हृदयस्पर्शी व्यक्तिरेखा यामुळे सोनी सबवरील 'पुष्पा इम्पॉसिबल' मालिका खूप लोकप्रिय झाली आहे. पुष्पा (करुणा पांडे) वकील होण्याचे आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील आहे, पण येथेही तिच्यासमोर नवीन आव्हाने आहेत, ज्यामध्ये तिच्या दृढतेची आणि तिच्या जवळच्या नात्यांची परीक्षा होत आहे. अलीकडच्या भागांमध्ये, दीप्ती (गरिमा परिहार)ची काळजी घेण्यासाठी सोनल (भक्ती राठोड) पुष्पाच्या घरी राहायला आली आहे, पण बापोद्रा (जयेश भारभाया) शी तिचे पटत नसल्याने पुष्पा त्या दोघांच्या संघर्षात सापडली आहे.

# पंतप्रधानांच्या मातोश्रीं विषयी गलिच्छ भाषा, भाजपा महिला मोर्चा तर्फे तीव्र निदर्शने

छत्रपती संभाजीनगर –

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मातोश्रींविषयी काँग्रेस पक्षाने गलिच्छ भाषा वापरणे, शिवीगाळ करणे तसेच –ख च्या माध्यमातून अपमानास्पद चित्रफिती तयार करून मोदीजी व त्यांच्या मातोश्रींची बदनामी करण्यात आली. त्याचबरोबर बिहार निवडणुकीच्या संदर्भात जाणीवपूर्वक विष पेरून मातृशक्तीचा अपमान करण्यात आला. या निषेधार्थ भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा, छत्रपती संभाजीनगर शहराच्या वतीने आज क्रांती चौक येथे तीव्र निदर्शने करण्यात आले. महाराष्ट्र प्रदेश महिला मोर्चा अध्यक्षा सौ. चित्राताई वाघ यांच्या सुचनेनुसार व भाजपा शहर जिल्हाध्यक्ष श्री. किशोरदादा शितोळे यांच्या मार्गदर्शनाखाली हे आंदोलन आयोजित करण्यात आले होते.



या आंदोलनात राज्याचे कॅबिनेट मंत्री श्री. अतुलजी सावे, भाजपा प्रदेश महामंत्री तथा आमदार संजयजी केनेकर, शहराध्यक्ष किशोर शितोळे, रामेश्वर भादवे, ताराचंद गायकवाड, जालिंदर शेंडगे, तसेच महिला मोर्चा शहर अध्यक्षा डॉ. सौ. उज्वला दहिफळे, महिला मोर्चा ग्रामीण अध्यक्षा सौ. ऐश्वर्याताई गाडेकर, सौ. सविताताई कुलकर्णी, सौ. माधुरीताई आधवंत, सौ. मीना मिसाळ, सौ. अमृता पालोडकर, सौ. छाया खाजेकर, सौ. व्यवहारे ताई, सौ. अर्चना नीलकंठ, सौ. रेखा जैस्वाल, सौ. रुपाली वाहुळे, सौ. वैशाली आराख, सौ. अपर्णा चोबे, सौ. भारतीताई राजपूत, सौ. कविता देशमुख, सौ. सुवर्ण तुपे, सौ. नंदाताई लोखंडे, सौ. ज्योतीताई पवार, सौ. सुनिता औराधे, सौ. हर्षदा राजपूत, सौ. शिल्पाताई, सौ. धनश्री रोंगे, सौ. रितू अग्रवाल, सौ. सारिकाताई देशपांडे, सौ. मंगलाताई आस्वार, सौ. सरिताताई घोडदुरे, सौ. विजयाताई भोसले यांच्यासह सर्व मंडळ अध्यक्ष, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी राज्याचे कॅबिनेट मंत्री श्री. अतुलजी सावे म्हणाले की, मोदीजी मातृशक्तीचा एवढा आदर करतात की त्यांनी देशभर 'पेड मा के नाम' हे अभियान राबवले. मात्र काँग्रेस पक्ष वेळोवेळी मातृशक्तीचा अपमान करतो. त्याच्या निषेधार्थ महिला मोर्चातर्फे आजचे आंदोलन संपूर्ण महाराष्ट्रभर होत आहे. भाजपा शहर जिल्हाध्यक्ष श्री. किशोर शितोळे म्हणाले की, मातृशक्तीचा अपमान करणाऱ्या काँग्रेस व आरजेडीला भारतीय जनता कधीही माफ करणार नाही. दिवसेंदिवस राजकारणाचा स्तर खाली खेचण्याचे काम काँग्रेस पक्ष करत आहे. आमदार संजयजी केनेकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, राहुल गांधी हा विदेशी प्रवृत्तीचा असून त्याला भारतीय संस्कृतीचा गंधही नाही. वेळ पडली तर कपडे काढून देशांमध्ये फिरणारा हा नेता मातृशक्ती काय असते हे कधीही समजू शकत नाही. म्हणूनच काँग्रेस पक्ष सतत मातृशक्तीचा अपमान करण्याचे धाडस करतो. या आंदोलनातून काँग्रेस पक्षाच्या अशोभनीय व असभ्य कृतीचा जाहीर निषेध नोंदविण्यात आला.

## एमजीएमच्या तीन विद्यार्थ्यांची पीसीआय'च्या आंतरवासितेसाठी निवड

छत्रपती संभाजीनगर, दि.१३ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या कम्युनिकेशन, कल्चर अँड मीडिया महाविद्यालयातील तीन विद्यार्थ्यांची प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाच्या (पीसीआय) ऑटम आंतरवासिता (इंटर्नशिप) कार्यक्रम २०२५ साठी निवड झाली आहे.

प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया, दिल्लीच्या वतीने ही इंटर्नशिप देण्यात येते. यामध्ये बी.ए.आंतरराष्ट्रीय पत्रकारिता आणि इलेक्ट्रॉनिक मीडियाची विद्यार्थिनी अदिती शर्मा,



एम.ए.ब्रॉडकास्ट कम्युनिकेशनची विद्यार्थिनी तनुष्का कडू आणि अद्वैत क्रिष्ण प्रताप यांना एक महिन्याच्या कालावधीत दिल्ली येथे काम करण्याची संधी मिळाली आहे.

पीसीआय ही एक वैधानिक स्वायत्त संस्था असून वृत्तपत्र स्वातंत्र्य जपण्यासाठी समर्पित आहे. या दरम्यान विद्यार्थ्यांना 'पीसीआय'ची कार्यपद्धती समजून घेताना माध्यम क्षेत्राचा अभ्यास करता येणार आहे. पीसीआय वर्षातून दोन वेळा इंटर्नशिप कार्यक्रम आयोजित करते, ज्यामध्ये देशभरातील पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांकडून अर्ज मागवले जातात आणि केवळ गुणवत्तेवर उमेदवारांची निवड केली जाते.

# आजपासून सोयगाव ते शिरपुर बस सेवा सुरु

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१३ सप्टेंबर

सोयगाव-शिरपुर बस प्रवाश्यांच्या सेवेसाठी शिरपुर बस आगाराने चालु केली आहे.दि.११ रोजी रात्री सोयगाव बस आगारात मुक्कामी आलेली बस ही दि.१२ शुक्रवार रोजी सकाळी ६ वाजता सोयगाव बस स्थानकावरून वाहक, चालक यांचा सत्कार रवाना करण्यात आली.





यावेळी या बसचे चालक पाटील व वाहक कोळी यांचे शाल, श्रीफळ,रुमाल,टोपी देऊन सत्कार करण्यात आले. सोयगाव हुन जरंडी,हरेश्वर पिंपळगाव,पाचोरा,गिरड,उत्राण यामार्गे शिरपुर कडे रवाना होईल.

यावेळी पहिल्या प्रवाशी कोकीळाताई पाटील,जगताप सर यांचे स्वागत करण्यात आले.

प्रसंगी अनेक प्रवासी मित्र,सोयगाव शहरातील प्रतिष्ठित नागरिक,सोयगाव आगारातील कर्मचारी उपस्थित होते.वाहतूक नियंत्रक ज्ञानेश्वर गोरे यांनी सर्वांचे स्वागत व आभार व्यक्त करुन बस स्थानक वरून बस रवाना करण्यात आली.

तसेच सोयगाव शहरासह तालुक्यातील बस प्रवासी यांनी सोयगाव ते शिरपूर बस सुरू झाली असून तरी बस प्रवासी यांनी बसचा लाभ घ्यावा असे आवाहन सोयगाव बस आगाराचे आगार प्रमुख मनीष जवळेकर व आगार व्यवस्थापक सतीश अंभोरे यांनी केले आहे.

## कन्नड येथे एड्स जनजागृती शिबिर - विद्यार्थ्यांमध्ये जागरुकतेचा संदेश

तभा वृत्तसेवा

कन्नड :दि.१३ सप्टेंबर - शहरातील शिवनगर येथील संत ज्ञानेश्वर विद्या मंदिर येथे ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने एड्स जनजागृती शिबिर घेण्यात आले. एड्ससारख्या आजाराबाबत योग्य माहिती, प्रतिबंधक उपाय आणि समाजातील गैरसमज दूर करण्यासाठी हे शिबिर आयोजित करण्यात आले होते.

वैद्यकीय अधीक्षक डॉ. अनिरुद्ध गायकवाड आणि डॉ. प्रवीण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली संजय सोनवणे







यांनी विद्यार्थ्यांना एड्सची कारणे, लक्षणे, उपचार आणि प्रतिबंध याविषयी सविस्तर माहिती दिली. निरोगी जीवनशैली स्वीकारण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. तसेच एड्सबाबत असलेल्या अंधश्रद्धा आणि भीती दूर करून वैज्ञानिक दृष्टीकोन स्वीकारण्यावर भर दिला. कार्यक्रमाला रुग्णालय प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी शशिकांत गांगुर्डे, मुख्याध्यापक प्रकाश जिरेमाळी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत आपले प्रश्न विचारून शंका दूर केल्या. शिबिरामुळे एड्सबाबत जनजागृती वाढण्यास मदत झाली असून, आरोग्यदायी आणि सजग समाज निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# विघ्नहर्ता मल्टिपल निधीत ठेवीदारांची अडवणूक

पैठण दि १३ :- पैठण तालुक्यात पतसंस्था मल्टिस्टेट आणि मल्टिपल निधी बाबत ठेवीदारांची कोट्यावधी रुपयांची फसवणूक झाल्याची घटना ताजी असतांना पैठण शहरात आता गागाभट्ट चौक परिसरातील विघ्नहर्ता मल्टिपल निधी लिमिटेडने आपल्या हजारो खातेदारांची ठेवी देण्यास टाळाटाळ सुरू केली आहे.

ठेवीदारांनी आपल्या ठेवी घेण्यासाठी पतसंस्थेत गर्दी केली असता त्यांना नोटरी करून भूखंड दिल्याचा भ्रष्टाचार उघड होत आहे. याबाबत पैठण पोलिसांत तक्रार करण्यात आली आहे. मंगेश रवींद्र कुलकर्णी चेअरमन, देवेंद्र सुरेशराव लखमले सचिव असलेल्या पैठण शहरातील जुना नगर रोडवरील विघ्नहर्ता मल्टिपल निधी लिमिटेड मध्ये ठेवीदारांना ठेवी परत देण्यासाठी अडवणूक करून त्यांना हीन वागणूक दिल्याचा प्रकार समोर येत असून याबाबत वयोवृद्ध कुसुम देशमुख यांनी पैठण पोलिसात तक्रार दिली आहे. चेअरमन, कर्मचारी तसेच काही कर्मचारी ठेवी मागणाऱ्या ठेवीदारांना धमकावतात.

पुष्पाबाई बाबुराव डाफने या वयोवृद्ध महिला आपली १४ लाखांची ठेवी काढण्यासाठी आल्या असता त्यांना पैसे नसल्याचे सांगण्यात आले. तर मल्टिपल निधी कडून काही ठेवीदारांना नोटरी करून भूखंड वाटपाचा नवीन फंडा उघड होत आहे. एकंदरीत डबघाईस आलेल्या विघ्नहर्ता मल्टिपल निधीत कोट्यावधीच्या ठेवी अडकल्याने अनेक ठेवीदार भयभीत असून ज्ञानराधा नंतर पैठण मध्ये मोठा आर्थिक घोटाळा बाहेर येण्याची शक्यता असल्याची सध्या पैठण तालुक्यातील नागरिकात भीती व्यक्त होत आहे.याबाबत चेअरमन मंगेश कुलकर्णी यांच्याशी संपर्क केला असता ठेवीदारांची ठेवी सुरक्षित असल्याचे त्यांनी सांगितले.

# कालातीत गुंतवणूक सल्ल्याचे एका उत्तम रणनितीत रूपांतर

पुणे : गुंतवणुकीच्या प्रवासाची सुरुवात करताना तुम्हाला मिळालेला पहिला सल्ला आठवा. मोठ्या नावांवरच टिकून राहा. हाच तो बहुतेक सल्ला असावा. साधा, विश्वास देणारा आणि शेअर बाजारात पहिले पाऊल टाकताना सुरक्षित वाटणारा हा सल्ला त्याकाळी योग्य होता. आणि खरे सांगायचे तर, आजही त्याचे महत्त्व कायम आहे. पण या सल्ल्यासोबत दोन न बोलल्या गेलेल्या अडचणीही होत्या. प्रत्येक शेअरमध्ये किती गुंतवणूक करायची याचे मार्गदर्शन नव्हते, तसेच ओळखीच्या क्षेत्रातील काही मोठ्या कंपन्यांवरच लक्ष केंद्रित करण्याची प्रवृत्ती होती. एक असा पोर्टफोलिओ ज्यात विविधतेचा अभाव जाणवायचा, ज्यामुळे बाजारातील व्यापक संधींना गमावत असल्याचे बंधन एएमसीचे विक्री व विपणन प्रमुख गौरब परीजा यांनी सांगितले.

> **एक वेगळी व परिणामकारक रणनीती**
>
> **साधारणपणे मोठ्या बाजारपेठीय रणनीती वित्तीय क्षेत्राकडे झुकलेल्या असतात. एकूण वजनात जवळपास एक-तृतीयांश. पण रिअल इस्टेट किंवा मीडिया यांसारख्या क्षेत्रांना फारच कमी जागा मिळते. मात्र या इंडेक्सची भूमिका उलट आहे. वित्तीय क्षेत्राला १५% पेक्षा कमी वाटा देत, कमी प्रतिनिधित्व असलेल्या क्षेत्रांनाही योग्य जागा मिळवून देते. यामुळे बाजाराच्या नेतृत्वाशी सुसंगत राहून अधिक संतुलित कामगिरीची व्यावहारिक वाट मिळते.**

बदलत्या काळात आता गुंतवणुकीच्या जगात नवनवीन पर्याय उपलब्ध झाले आहे, जे आधीच्या साध्या सल्ल्यापेक्षा बरेच क्लिष्ट होते. आज असंख्य गुंतवणूक पर्याय उपलब्ध आहेत. काही क्लिष्ट तर काही खास आणि वेगळे. परंतु नवनवीनतेच्या शोधात गुंतवणूकदार बऱ्याचदा नीट समजून न घेता त्यात उडी घेतात. नवीन कल्पनांचा पाठलाग करण्याऐवजी आपण पुन्हा मूलभूत गोष्टींकडे वळलो तर? सुरुवातीच्या साध्या पण प्रभावी तत्त्वांना अपग्रेड करून आजच्या काळाला साजेशे केले तर? असे अनेक प्रश्न निर्माण होतात.

याच ठिकाणी बीएसई इंडिया सेक्टर लीडर्स इंडेक्स मदतीला येतो. बेसिक्सवर आधारित पण नीट विचारपूर्वक आखलेले एक सशक्त सोल्यूशन. यात बीएसई ५०० मधील प्रत्येक क्षेत्रातील अव्वल तीन कंपन्या निवडल्या जातात. त्यामुळे सर्व क्षेत्रांतील व्यापक सहभाग मिळतो आणि त्यामुळे फक्त आघाडीच्या, मजबूत आणि स्थापित व्यवसायांवर लक्ष केंद्रीत होते. प्रत्येक शेअरला त्याच्या फ्री-फ्लोट मार्केट कॅपिटलायझेशननुसार वजन दिले जाते. मोठ्या कंपन्यांमध्ये अति गुंतवणूक होऊ नये म्हणून ५% ची मर्यादा, तर छोट्या शेअर्सना महत्त्व मिळावे म्हणून किमान १% ची हमी दिली जाते. इंडेक्सचे प्रत्येक तिमाहीत पुनर्संतुलन होते आणि सहा महिन्यांनी त्याची पुनर्रचना केली जाते.

# गळफास घेऊन शेतकऱ्यांची आत्महत्या



तभा वृत्तसेवा : अजिंठा दि, १३सप्टेंबर

सिल्लोड: सराटी येथील एका ४१ वर्षीय शेतकऱ्याने शेतातील राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना १२ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६.५५ वाजता उघडकीस आली. या प्रकरणी अजिंठा पोलिसांनी अकस्मात मृत्यू दाखल केला आहे. अंबादास दगडुबा शेळके वय ४१ वर्ष रा.सराटी असे मरण पावलेल्या शेतकऱ्यांचे नाव आहे.त्यांच्यावर सोसायटी व विविध सावकाराचे खाजगी कर्ज होते सततची नापिकी व कर्जाबाजारी पणामुळे त्यांनी शेतातील त्यांच्या राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली होती सायंकाळी शेतातून नातेवाईक घरी आल्यावर त्यांना हा प्रकार दिसला त्यांनी तात्काळ अंबादास शेळके यांना अजिंठा ग्रामीण रुग्णालयात दाखल केले मात्र डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. त्यांच्या पच्यात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे.

## गंगापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत कापूस खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणीला सुरुवात



गंगापूर दि.१३:- गंगापूर तालुक्यातील सर्व कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. भारतीय कापूस निगम लिमिटेड तर्फे कापूस खरेदीची प्रक्रिया कृषी उत्पन्न बाजार समिती गंगापूर अंतर्गत सुरु होत असून यासाठी शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी १ सप्टेंबर २०२५ पासून (सोमवार) सुरू झाली आहे.

शेतकऱ्यांना स्वतःची नोंदणी 'कापस किसान' या मोबाईल ॲपवर करणे बंधनकारक आहे. नोंदणी करताना आधार कार्ड, शेताचा ७/१२ व ८अ उतारा, बँक पासबुक, चालू वर्षाचा पिकाचा पुरावा, शेतकऱ्याचा मोबाईल नंबर व पासपोर्ट साईझ फोटो आवश्यक राहणार आहे. नोंदणी प्रक्रियेत दिलेली सर्व माहिती शेतकऱ्यांनी नीट तपासून भरावी व फोटो अपलोड करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. कापूस खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणीची अंतिम तारीख ३० सप्टेंबर २०२५ असून शेतकऱ्यांनी वेळेत नोंदणी करावी, असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समिती गंगापूरतर्फे करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना सोयीस्कर पद्धतीने कापूस विक्री करता येणार असून पारदर्शक व सुव्यवस्थित खरेदी होणार आहे. अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती, गंगापूर येथे संपर्क साधावा, असे आवाहन समितीचे सभापती सौ. अर्चनाताई कृष्णा सुकासे, उपसभापती सचिन काकडे व सचिव मनिष गजभिये यांनी केले आहे.

## स्टार्टअप:व्यवसायातील संधी या विषयावर चर्चासत्र संपन्न

सोयगाव,दि.१३ सप्टेंबर - अजिंठा शिक्षण संस्था संचालित संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथे वाणिज्य शाखेच्या अंतर्गत वाणिज्य मंडळाच्या वतीने स्टार्टअप:व्यवसायातील नवीन संधी या विषयावर ऑनलाईन चर्चासत्र घेण्यात आले.या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून डॉ.रामदास लाड,प्रा. रामकृष्ण मोरे कॉलेज आकुर्डी पुणे हे उपस्थित होते.त्यांनी विद्यार्थ्यांना स्टार्टअप चे प्रकार,व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक कौशल्य,कोणत्या बाबींना प्राधान्य दिले जावे, व्यवसायाची तयारी,भांडवल पूर्ती,स्टार्टअप व्यवसायातील नवीन संकल्पना याबद्दल सखोल मार्गदर्शन केले.तसेच त्यांनी मोठमोठ्या उद्योगांची स्टार्टअप पासून कशी सुरुवात झाली याची उदाहरणे दिली.यावेळी डॉ.रामदास लाड यांनी व्यवसायाची संकल्पना नाविन्यपूर्ण असेल तर स्टार्टअप यशस्वी होतोच असे प्रतिपादन केले.या कार्यक्रमासाठी संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार यांची प्रमुख उपस्थिती लाभली.या कार्यक्रमासाठी वाणिज्य शाखेच्या १७२ विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शविली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.निलेश गावडे यांनी केले तर आभार प्रदर्शन वाणिज्य विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. ज्योती अधाने यांनी केले.

## एमजीएममध्ये आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन उत्साहात साजरा



छत्रपती संभाजीनगर, दि.१३ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठातील आंतरविद्याशाखेच्या शिक्षणशास्त्र विभाग व सामाजिक व मानव्यविद्या शाखेच्या इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन अँड फॉरेन लँग्वेजेस यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी डॉ. योगेंद्र पवार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

आंतरविद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ.जॉन चेल्लादुराई यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. आयआयएफएलचे संचालक डॉ.के.पी.सिंग यांनी साक्षरतेचा वैयक्तिक आणि सामाजिक विकासावर प्रभाव यावर मत मांडले. याप्रसंगी बोलताना डॉ. योगेंद्र पवार यांनी साक्षरता सद्यस्थिती तसेच डिजिटल साक्षरता व आजच्या युगात त्याची गरज व त्याचे आजच्या पिढीवर होणारे दुष्परिणाम यावर विस्तृत असे विवेचन केले.

याप्रसंगी डॉ.अमरदीप असोलकर, डॉ.प्रज्ञा कोणार्डे, डॉ.आस्वाद गौहर, डॉ.साजिद आलम, डॉ.इम्रान पठाण,डॉ.भागवत वाघ,डॉ.सुरेखा लक्कास,डॉ.शहनाज बासमेह, डॉ.संध्या खांडेकर, डॉ.जी.एस.देशमुख व श्री.निलेश बेडके तसेच विविध विभागातील विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.वैशाली मडजे यांनी केले तर आभारप्रदर्शन प्रा.अनिता फुलवाडे यांनी केले.

जा.क्र./नपंसो/नामांतर/२०२५/२०२६ कार्यालय नगर पंचायत सोयगांव
दिनांक : ११-०९-२०२५

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, **दिलीप तुकाराम कुंभार, किशोर तुकाराम बागुल, सुनिल तुकाराम बागुल** यांनी मोहल्ला **वार्ड क्र. ०२** सोयगांव स.नं. ----- मधील घर क्र. **३०४/ब** त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जानुसार जागेची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे.

**पूर्व : रस्ता** — **पश्चिम : रस्ता**
**दक्षिण : नारायण सखाराम कुंभार** — **उत्तर : पुंडलीक मानिक मुळे**

आकार : पूर्व पश्चिम ३४×१५=५१० दक्षिणोत्तर..........

वरील नामांतराबाबातच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसांचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे. मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुख्याधिकारी
नगरपंचायत सोयगाव

### जाहीर प्रगटन

**( मौजे गंगापूर नगर परिषद हददीतील नविन मिळकत क. ५२/१ वार्ड क. २ क्षेत्र ७० बाय ३० फुट सहान जागेबाबत )**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाव्दारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी संदीप सिताराम नावंदर, मधुमती कैलास नावंदर आणि आदित्य कैलास नावंदर अ.पा.क. आई नामे मधुमती कैलास नावंदर, सर्व रा. गंगापूर ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून त्यांचे वडीलोपार्जीत मालकी हिश्याची व ताबा वहीवाटीतील गंगापूर नगर परिषद हददीतील वार्ड क. २ मधील नविन मालमत्ता क. ५२/१ क्षेत्र पुर्व पश्चिम ७० फुट आणि दक्षिण उत्तर ३० फुट ज्याच्या चतुर्सिमा पुर्वेस सार्वजनिक रस्ता, पश्चिमेस बोळ, दक्षिणेस लाहोटी यांची मिळकत व उत्तरेस नावंदर यांची मिळकतया चतुर्सिमेच्या आतील मिळकत कायमस्वरुपी खरेदीने विकत घेण्याचा करार केला आहे.

तरी सदरील वर नमुद केलेल्या मिळकती संबंधी कोणत्याही व्यक्ती अथवा संस्था इत्यादीचे कसल्याही प्रकारचे हितसंबंध जसे की, खरेदी, विकी, गहाण, दान, तारण, बक्षीस, चोळी बांगडी, वारसाहक्क इत्यादी तत्सम असे कोणतेही हक्क व अधिकार प्रस्थापित अथवा बाधीत होत असेल तर त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसाच्या आत खालील दिलेल्या पत्त्यावर लेखी उजर/आक्षेप नोंदवावे.

असे की, मुदतीत कोणताही उजर/आक्षेप आले नाही तर माझे पक्षकार सदरील मिळकत ही निर्वावाद व दोषमुक्त असल्याचे समजुन ठरल्याप्रमाणे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील याची कृपया नोंद असावी करीता हे जाहीर प्रगटन

दिनांक : १३/०९/२०२५

मार्फत
ॲड. व्ही.जे.कसाने
महसुल कॉम्पलेक्स वैजापूर रोड, गंगापूर मो.नं. ९८६०३७१७९१

## अग्रलेख...

# शेवटचा घाव घालाच!

छत्तीसगडच्या गरियाबंद जिल्ह्यात गुरुवारी झालेल्या चकमकीत १० नक्षलवाद्यांचा झालेला खात्मा ही सुरक्षा दलांची मोठी उपलब्धी म्हटली पाहिजे. मारल्या गेलेल्यांमध्ये एक कोटी रुपयांचे बक्षीस असलेला मोडेम बालकृष्ण ऊर्फ बालन्ना मनोज याचाही समावेश आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी ३१ मार्च २०२६ पूर्वी देशातून नक्षलवादाचे निर्दालन करण्याची घोषणा केली आहे, त्या दिशेने टाकलेले हे एक पाऊल म्हटले पाहिजे. याआधी २१ मे रोजी छत्तीसगडमध्ये झालेल्या चकमकीत २७ नक्षलवादी ठार झाले होते. त्यात दीड कोटी रुपयांचे बक्षीस असलेला कुख्यात नक्षल कमांडर बसवा राजू याचाही समावेश होता. त्यानंतर छत्तीसगड-तेलंगणा सीमेदरम्यान करेगुट्टाच्या जंगलात झालेल्या आणखी एका मोठ्या चकमकीत सुरक्षा दलांनी ३१ नक्षलवाद्यांचे शिरकाण केले होते. नक्षलवाद ही गेल्या काही वर्षांतील देशातील सर्वांत मोठी समस्या म्हटली पाहिजे. १९८० च्या दशकात देशात विशेषत: पंजाब आणि जम्मू-काश्मीर या दोन राज्यांत दहशतवाद मोठ्या प्रमाणात फोफावला होता. या दहशतवादाने देशाच्या पंतप्रधानासह अनेक मान्यवरांचा बळी घेतला होता. पण दहशतवादाला आळा घालण्यात म्हणण्यापेक्षा दहशतवाद पूर्णपणे संपवण्यात आपल्या सुरक्षा दलांना मोठे यश आले. पण तसे यश आतापर्यंत तरी नक्षलवादाची समस्या कायमस्वरूपी संपवण्यात आले नाही, असे दुर्दैवाने म्हणावेसे वाटते. दहशतवाद आणि नक्षलवाद यात थोडा फरक आहे. दहशतवादी कारवाया घडवणाऱ्या संघटना या देशाबाहेरील असतात, तर नक्षलवादी कारवाया करणाऱ्या संघटना या आमच्या देशातील आहेत. आज नक्षलवादाच्या समस्येने कायदा आणि सुव्यवस्थेसोबत देशाची एकता आणि अखंडताही धोक्यात आणली आहे. देशातील आतापर्यंतच्या काँग्रेसी सरकारांनी नक्षलवादाचा नि:पात करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना गंभीरपणे केली नाही. त्याचे परिणाम आपल्याला आजही भोगावे लागत आहेत. नक्षलवाद या शब्दांचा उगम पश्चिम बंगालमधील नक्षलबाडी या गावातून झाला. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते चारू मुजुमदार आणि कानू सान्याल यांनी १९६७ मध्ये सरकारविरुद्ध सशस्त्र उठाव केला. या सशस्त्र क्रांतीची प्रेरणा चीनच्या माओ त्से तुंग यांच्यापासून चारू मुजुमदार यांनी घेतली होती. देशातील श्रमिक आणि शेतकरी शेतमजूर यांच्या दुर्दशेला सरकारी धोरणे जबाबदार आहेत, असा समज मुजुमदार यांनी करत याविरुद्ध सशस्त्र उठाव करण्याचा निर्णय घेतला. त्यातून नक्षल चळवळीचा जन्म झाला. भारतीय कम्युनिस्ट पक्षातून तेव्हा जहाल विचारसरणीचे लोक वेगळे झाले आणि त्यांनी राष्ट्रीय स्तरावर एक समन्वय समिती स्थापन केली. मार्क्स आणि लेनिन यांच्या विचारसरणीवर विश्वास असणाऱ्या लोकांनी भाकपा माले या पक्षाची स्थापना केली. चारू मुजुमदार आणि कानू सान्याल यांच्या नेतृत्वात बंडखोरांनी १९६९ मध्ये तत्कालीन काँग्रेस सरकारच्या भूमी अधिग्रहण कायद्याविरुद्ध आंदोलन सुरू केले. कसेल त्याची जमीन हा या आंदोलनाचा नारा होता. देशभर हे आंदोलन सुरू झाले तरी त्याची व्याप्ती पश्चिम बंगालमध्ये जास्त होती. या आंदोलनामुळे पश्चिम बंगालमधून काँग्रेसचे सरकार पदच्युत झाले. कम्युनिस्ट पक्षाचे सरकार आले आणि ज्योती बसू मुख्यमंत्री झाले. त्यानंतर पश्चिम बंगालमधून काँग्रेसचा सुपडासाफ झाला. अजूनपर्यंत त्या राज्यात काँग्रेसला सत्ता मिळवता आली नाही. नक्षल चळवळीचे प्रणेते असलेल्या चारू मुजुमदार यांचा तुरुंगात असताना मृत्यू झाला, तर कानू सान्याल यांनी नक्षल चळवळ भरकटल्यामुळे निराश होऊन आत्महत्या केली. पण भरकटलेली नक्षल चळवळ काही आपल्या मूळ पदावर आली नाही. नक्षलवाद्यांचा रोष हा राज्य सरकारवर असल्यामुळे घनदाट जंगलात लपून नक्षलवादी राज्य सरकारचे प्रतिनिधी असलेल्या सुरक्षा दलांवर हल्ले चढवतात, सुरक्षा जवानांचे बळी घेतात. २०१९ पर्यंत देशातील ११ राज्ये आणि ९० जिल्ह्यांत नक्षलवादी चळवळ पसरली होती. बिहार, ओडिशा, झारखंड, महाराष्ट्र, छत्तीसगड आणि आंध्रप्रदेश या राज्यांत नक्षल चळवळ जोरात होती. महाराष्ट्रातील गडचिरोली हा जिल्हा नक्षल जिल्हा म्हणून ओळखला जात होता. मुळात नक्षलवाद्यांच्या मागण्या काय आहेत, ते कशासाठी उठाव करत आहेत, हे आजपर्यंत स्पष्ट झाले नाही. वेगवेगळ्या राज्यांत लढणाऱ्या नक्षल संघटनांची आपसातील समन्वयासाठी केंद्रीय पातळीवरील समन्वय समिती आहे. पण नक्षलवादी हे वेगवेगळ्या राज्यांत आणि गटांत विभागले गेले आहेत. त्यामुळे कोणाशी चर्चा करावी, हा कोणत्याही राज्य सरकारला पडणारा महत्त्वाचा प्रश्न आहे.

आदिवासींना न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही लढतो, असा दावा नक्षल संघटना करत असतात. पण नक्षलवाद्यांचा लढा हा खरोखरच आदिवासींना न्याय मिळवून देण्यासाठी आहे का, हा संशोधनाचा विषय आहे. कारण आदिवासी दोन्हीकडून भरडले जातात, पोलिसांचे खबरी म्हणून काम करत असल्याचा आरोप करत नक्षलवादी आदिवासींवर अन्याय, अत्याचार करतात, तर दुसरीकडे नक्षलवाद्यांना साहाय्य करत असल्याच्या संशयावरून पोलिस आदिवासींना पकडून नेतात. नक्षलवादी हे जंगलात आणि दुर्गम भागांत लपून सुरक्षा दलाविरुद्ध कारवाया करतात. जंगलात लपलेल्या नक्षलवाद्यांजवळ अत्याधुनिक शस्त्रे आणि दारूगोळा कुठून येतो, हा मोठा विषय आहे. नक्षलवादी जंगलात लपून संघर्ष करतात, तर शहरात लपलेले त्यांचे छुपे समर्थक त्यांना आवश्यक ती मदत करतात, असे मानले जाते. शहरातील नक्षलवाद्यांचे समर्थक शहरी नक्षलवादी म्हणून ओळखले जातात. गेल्या काही वर्षांत अशा शहरी नक्षलवाद्यांविरुद्ध कारवाई सुरू झाली आहे. महाराष्ट्र सरकारने अशा शहरी नक्षलवाद्यांविरुद्ध एक कायदाही पारित केला आहे.

देशातील मोजक्या राज्यांत आणि जिल्ह्यांपुरती नक्षल चळवळ आता मर्यादित झाली आहे. २०१४ मध्ये मोदी सरकार सत्तेवर आल्यानंतर नक्षल चळवळीचे कंबरडे मोडले आहे. मागील काही महिन्यांत सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत मारल्या गेलेल्या नक्षलवाद्यांचे आकडे पाहिले तर याची खात्री पटते. नक्षलवाद्यांचा गेल्या काही वर्षांतील हिंसाचाराचा आढावा घेतला तर त्यात सुरक्षा दलांच्या जवानांचा मोठ्या प्रमाणात बळी गेला आहे. यात राज्याच्या पोलिसांसोबत निमलष्करी दलाच्या जवानांचा मोठ्या प्रमाणात समावेश आहे. नक्षलवाद्यांची कार्यपद्धती ठरलेली आहे. जंगलातील रस्त्यावर ते सुरुंग पेरून ठेवतात, सुरक्षा दलांच्या गाड्या त्यावरून जाताच त्याचा स्फोट होतो आणि सुरक्षा दलाचे जवान हुतात्मा होतात. दुसरी पद्धत म्हणजे सुरक्षा दलांचे जवान जंगलात गस्त घालत असताना लपून बसलेले नक्षलवादी त्यांच्यावर दोन्ही बाजूंनी गोळीबार करतात. त्यामुळे सुरक्षा दलाच्या जवानांना बचावाची संधीच मिळत नाही.

छत्तीसगडमध्ये सुरक्षा दलांवर नक्षली हल्ल्याच्या सर्वांत जास्त घटना घडल्या आहेत. २०११ मध्ये दंतेवाडा येथे नक्षलवाद्यांच्या भीषण हल्ल्यात निमलष्करी दलांचे ७६ जवान ठार झाले होते. त्याआधी याच राज्यातील बस्तर येथे नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात ५५ पोलिसांना आपले प्राण गमवावे लागले होते. २००९ मध्ये महाराष्ट्राच्या गडचिरोली जिल्ह्यात नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात १५ पोलिस हुतात्मा झाले होते. २०१० मध्ये नक्षलवाद्यांनी एक रेल्वेगाडीचे अपहरण करत १५० प्रवाशांना गोळ्या घातल्या होत्या. २०१३ मध्ये सुकमा जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी काँग्रेस नेत्यांच्या ताफ्यावर केलेल्या गोळीबारात २७ जणांचा बळी घेतला होता. तरीसुद्धा छत्तीसगडमधील काँग्रेसच्या नेत्यांचे डोळे उघडले नाहीत.

नक्षलवाद हा आज आमच्या देशासाठी भस्मासुर ठरत आहे. त्यामुळे लवकरात लवकर नक्षलवादाचा बीमोड करणे आवश्यक झाले आहे. नक्षलवाद्यांविरुद्ध आतापर्यंत अनेक अभियान राबवण्यात आले, त्याला काही प्रमाणात यशही आले आहे. नक्षल चळवळीची गती मंदावली असली तरी ती पूर्णपणे संपुष्टात आली नाही. नक्षल चळवळीवर निर्वाणीचा घाव घालण्याची वेळ जवळ आली आहे. त्यामुळेच ३१ मार्च २०२६ पूर्वी देशातून नक्षल चळवळीचा खात्मा करण्याचा संकल्प मोदी सरकारने सोडला असून गृहमंत्री अमित शाह यांनी तसा निर्धार जाहीर केला आहे. अमित शाह जे म्हणतात, ते करून दाखवतात. देशात आजच नक्षल चळवळ शेवटचे आचके देत आहे. त्यामुळे मार्च २०२६ पर्यंत देशातून नक्षल चळवळ संपुष्टात येईल, याबद्दल कोणाच्या मनात शंका नाही.

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# योगेश आलेकरीचे स्वप्न चोरीला!

एक धाडसी मराठी तरुण, आपल्या केटीएम ३९० एडव्हेंचर बाईकवरून १७ देशांचा प्रवास करत, दोन चाकांवर जग जिंकण्याचे स्वप्न पाहतोय. त्याचे नाव आहे योगेश आलेकरी. तिशीतला महाराष्ट्राचा सुपुत्र. त्याने १५,००० मैलांचा रोमांचक प्रवास केला आहे. पण २८ ऑगस्ट २०२५ रोजी नॉटिंगहॅम, यूकेमध्ये त्याचे स्वप्न एका क्षणात उद्ध्वस्त झाले. वोलॅटन पार्कमध्ये भरदिवसा त्याची बाईक चोरीला गेली. त्याचे सामान, पासपोर्ट, कॅमेरे आणि अनेक गोड आठवणीही त्यासोबत गेल्या.

योगेश आलेकरी हा नवी मुंबईचा रहिवासी आहे. त्याने आपल्या नवी मुंबईच्या घरातून हा प्रवास सुरू केला. आशियातील अनेक देश पादाक्रांत केले. नेपाळ, भूतान, म्यानमार, थायलंड, लाओस, व्हिएतनाम, कंबोडिया, मलेशिया, इंडोनेशिया आणि नंतर चीनच्या वुली भागातून प्रवास करत युरोपात दाखल झाला. प्रत्येक देशात तो स्थानिक संस्कृतीशी जोडला गेला. तेथील लोकांसोबत संवाद साधला आणि भारतीय मूल्यांचा प्रसार केला. त्याच्या इन्स्टाग्राम आणि यूट्यूब चॅनेलवर हजारो फॉलोअर्स आहेत. त्याने १७ देशांत प्रवास केला आहे. युरोपात रशिया, कझाकस्तान, उझबेकिस्तान, तुर्कमेनिस्तान, इराण, तुर्की, ग्रीस, अल्बेनिया, माँटेनेग्रो, बोस्निया, क्रोएशिया, स्लोव्हेनिया, इटली, फ्रान्स, स्पेन, पोर्तुगाल आणि शेवटी यूके. प्रत्येक ठिकाणी त्याने तिरंगा फडकवला आणि शांततेचा संदेश दिला.

पण नॉटिंगहॅममध्ये, चोरट्यांनी हातोड्याने लॉक फोडले आणि त्याची बाईक घेऊन पळाले. हे सगळे सीसीटीव्हीमध्ये कैद झाले. भारतामध्ये, अगदी छोट्या गावातले पोलिसही हुशार असतात. स्थानिक पोलिस गल्लीबोळात शोध घेतात, तपास करतात आणि चोराला पकडतात. पण यूकेतल्या पोलिसांनी फक्त एक क्राईम नंबर दिला आणि काहीच कारवाई नाही. जे गोरे कधी अनेक देशांवर राज्य करत होते, ते आज एका प्रवाशाचे संरक्षणही करू शकत नाहीत, एक चोर पकडू शकत नाहीत. त्यांना या प्रकरणाचे गांभीर्यही नाही.




खरे पाहता, योगेश केवळ बाईकवरून प्रवास करत नव्हता, तर तो इतिहास रचत होता. त्याची ही बाईक त्याच्या प्रवासाची सोबती होती. तो जिथे जायचा तिथल्या मातीचा आदर राखून तिरंगा फडकवत होता. एक माणूस शांतिदूत होऊन जग काबीज करायला निघाला होता, हे भारताचे वेगळेपण आहे. एक काळ असा होता की, युरोपियन लोक जग काबीज करण्याचा हेतू मनात ठेवून अनेक देशांवर चालून गेले, तिथली संस्कृती त्यांनी नष्ट केली, लूटमार करुन आपल्या देशाची तिजोरी भरली. हाच फरक आहे पाश्चात्त्य देशांमध्ये आणि भारतामध्ये. आपले साधुसंत एका जागी स्थिर बसून जगाशी एकरूप व्हायचे आणि जगाच्या कल्याणासाठी 'पसायदान' मागायचे. अनेक देशांमध्ये भारतीय संस्कृतीच्या खुणा सापडतात. योगेशचा जन्म ज्ञानेश्वरांच्या महाराष्ट्रात झाला आहे. म्हणून जग जिंकण्याची त्याची पद्धत भारताच्या व महाराष्ट्राच्या भूमीला साजेशी अशीच आहे. बाईकवरून प्रवास करत तो जगात एकतेचा, शांततेचा संदेश देत फिरतो. काही वर्षांपूर्वी राजेश खन्ना यांचा 'बावर्ची' हा चित्रपट आला होता. त्यात राजेश खन्ना बावर्ची होऊन कुटुंबात दाखल व्हायचा व त्यांची नकारात्मकता चोरून सकारात्मकता देऊन कुटुंब जोडण्याचे काम करायचा. योगेशही तेच करतो आहे. देश व संस्कृती जोडतो आहे.

लक्षात घ्या, योगेश फक्त रायडर नाही, तो जिद्दीचे प्रतीक आहे, एक मराठी मावळा आहे, जो भारताचा झेंडा अनेक देशांत अभिमानाने फडकवतोय. अनेकांना असे वाटेल की एक बाईक चोरीला गेल्याने एवढा बोभाटा का करायचा? मात्र ती एक बाईक नव्हती, तर ती सोबती होती. त्या बाईकसोबत योगेशच्या अनेक आठवणी असतील, अनेक खडतर व डोंगराळ रस्त्यांवरून याच बाईकने त्याला सांभाळून नेले असेल, त्याच्या सुख-दु:खातही सहभागी झाली असेल. चराचरात ईश्वरी तत्त्व आहे, निर्जीव वस्तूंमध्येही स्पंदनं आहेत अशी श्रद्धा असणाऱ्या मातीत योगेशचा जन्म झाला आहे. त्यामुळे बाईकबद्दलची त्याची भावना आपण समजून घेऊ शकतो. योगेशची बाईक चोरीला गेल्याची बातमी जगभरात पसरली. आंतरराष्ट्रीय व भारतीय माध्यमांनीही दखल घेतली. सोशल मीडियावर 'फाईंड योगेश बाईक' अशी मोहीम सुरू झाली. हजारो लोकांनी त्याला समर्थन दिले. आनंदाची बातमी म्हणजे, ९ सप्टेंबर २०२५ रोजी नॉटिंगहॅमशायर पोलिसांनी एका संशयिताला अटक केली. तरीही बाईक सापडली नाही, पण शोध सुरू आहे. तसेच यूकेतील बाईकर्स कम्युनिटीने पुढे येत नवीन बाईक देण्याची ऑफर दिली. १२ सप्टेंबर २०२५ रोजी, योगेशला एक नवीन मोटरबाईक भेट म्हणून देण्यात आली आहे. यावरून आपल्याला सोशल मीडियाची ताकद कळते.

आता योगेशचा प्रवास पुन्हा सुरू होऊ शकतो. पण हे प्रकरण यूकेतील पर्यटकांच्या सुरक्षेबद्दल प्रश्न उपस्थित करते. म्हणून भारत सरकारनेही याकडे लक्ष द्यायला हवे. महाराष्ट्र सरकारनेही यात हस्तक्षेप करायला हवा आणि मराठी माणसाचे हित साधण्याची ग्वाही देणाऱ्या राजकीय व सामाजिक संघटनांनीही हा मुद्दा उचलून धरायला हवा. सोशल मीडियावर जागृती होतेय. पण यूके सरकार खाडकन जागे होईल अशी मोहीम सोशल मीडियावरील धुरंदर, रील स्टार्स यांनी राबवायला हवी. जरी त्याला नवीन बाईक भेट म्हणून मिळाली असली तरी शेवटी इतकीच प्रार्थना करीन की योगेशची बाईक लवकरात लवकर सापडावी. कारण ती बाईक नाही, ती कंपेनियन आहे!

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**पुंडलिक आंबटकर**

# पावसामुळे गळाले शेतकऱ्यांचे अवसान

यंदा वेधशाळांनी सरासरीच्या १०७ टक्के पावसाची शक्यता वर्तविली होती. परंतु, मराठवाडा आणि विदर्भात पावसाने उशिरा एण्ट्री घेतली. त्यानंतर तुरळक पावसाच्या जोरावर शेतकऱ्यांनी पेरण्या उरकून घेतल्या. नंतर मात्र जुलै आणि ऑगस्ट महिन्यात पावसाने सार्वत्रिक मारा केला. जुलै महिन्यात विदर्भातील २५८ मंडळांत अतिवृष्टी झाली. ८ सप्टेंबरपर्यंत राज्यात ९७ टक्के पाऊस झाल्याचे हवामान विभागाचे म्हणणे आहे. परंतु, विदर्भात पावसाने एकूण सरासरी ओलांडल्याचे चित्र आहे. नदी-नाले तुडुंब भरले असून, शेतीत पाणी साचल्याने अतोनात नुकसान झाले आहे. ऑगस्ट महिन्यातही विदर्भात सरासरीच्या अधिक पाऊस कोसळला. आता सप्टेंबर महिन्यातही पाऊस पिच्छा सोडायला तयार नसल्याने पिके जळू लागली आहेत. सर्वाधिक नुकसान सोयाबीन पिकाचे झाले आहे. यंदा अतिवृष्टीतून ज्यांचे सोयाबीन बचावले त्यांनाही एकरी दोन-तीन क्विंटलपेक्षा अधिक उत्पादन होण्याची शक्यता नाही. पूर्व विदर्भातही अनेक ठिकाणी अतिवृष्टीची नोंद झाली आहे. सप्टेंबरच्या सुरुवातीलाच चंद्रपूर जिल्ह्यात प्रचंड वृष्टी झाली. एका रात्रीत तब्बल ११५ मिमीपेक्षा अधिक पाऊस कोसळला. हा एक विक्रमच आहे. पूर्व विदर्भात प्रामुख्याने धानशेती केली जाते. या पिकाला अधिक पाण्याची गरज पडते. परंतु, गरजेपेक्षा अधिक पाऊस झाला तर नुकसानदायकच ठरतो. अतिवृष्टीमुळे एकट्या ऑगस्ट महिन्यात विदर्भात ९ लाखांपेक्षा अधिक हेक्टरातील पिकांची नासाडी झाली. आता सप्टेंबर महिन्यातही पाऊस माघार घेत नसल्याने शेतकरी धास्तावले आहेत. सुरुवातीला विदर्भात पावसाची प्रचंड तूट होती. जुलैच्या पंधरवड्यानंतर मात्र विदर्भात पावसाने अनेक विक्रम केले.



पश्चिम विदर्भातील वर्धा, यवतमाळ, अमरावती, अकोला, वाशीम, बुलढाणा या सहा जिल्ह्यांत सोयाबीन हे मुख्य पीक आहे. सोयाबीन उत्पादन घटले तरी रबी हंगामात चणा आणि गहू उत्पादन घेता येत असल्याने शेतकरी सोयाबीनची लागवड करतात. परंतु, दरवर्षी विविध कारणांनी सोयाबीन उत्पादकांना नुकसान सहन करावे लागते. यंदा तर खूपच बिकट परिस्थिती निर्माण झाली असून, अनेक शेतकऱ्यांनी आपल्या पिकांत जनावरे सोडली आहेत! पश्चिम विदर्भात अडीच लाख हेक्टरातील सोयाबीन पीक पावसाच्या पाण्यात कुजल्याने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. दुसरीकडे या भागातील १ लाखापेक्षा अधिक क्षेत्रातील कपाशी पिकाला अतिवृष्टीचा फटका बसला आहे. गणेशोत्सव संपला, आता नवरात्रोत्सवाचे वेध लागले आहेत. परंतु, पाऊस ठाण मांडून बसल्याने ग्रामीण भागातील उत्साह ओसरला आहे.

यंदा पश्चिम विदर्भात १४ लाख ७४ हजार २८१ हेक्टरवर सोयाबीनचा पेरा झाला होता. यातील लाखो हेक्टरवरील सोयाबीनची हानी झाली आहे. कृषी प्रशासनाच्या अहवालानुसार, पश्चिम विदर्भात एकूण पावणेचार लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. परंतु, ही माहिती सदोष असल्याने शेतकऱ्यांच्या बांधांवर जाऊन पाहणी करणे गरजेचे आहे. वर्धा जिल्ह्यातील आमदार समीर कुणावार हे स्वतः शेतकऱ्यांच्या बांधांवर जाऊन नुकसानग्रस्तांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करीत आहेत. इतरही आमदार त्यांचा कित्ता गिरवत आहेत. परंतु, प्रशासकीय व्यवस्था मात्र त्यामानाने उदासीन भासत आहे. संत्री, केळी व मोसंबी बागांनाही अतिवृष्टीचा मोठा फटका बसला आहे. भाजीपाला पिकांची नासाडी झाल्याने सणासुदीत दर कडाडले आहेत. एकूणच यंदाच्या अतिवृष्टीने ग्रामीण व्यवस्था मोठ्या प्रमाणात प्रभावित झाली आहे. परंतु, पाऊस माघारी फिरण्याचे नाव घेत नाही. वातावरण आबादानी असतानाच अचानक दुपारी कडक ऊन तापते. त्यामुळे प्रचंड गर्मी होते आणि नंतर सायंकाळपासून पुन्हा आभाळ दाटून येते व पावसाचा मारा सुरू होतो. हा पाऊस सलग नसला तरी मोठ्या प्रमाणात कोसळत असल्याने निर्माणाधीन रस्त्यांची वाट लागली आहे. यंदा मोसमी पावसाच्या आगमनापूर्वी उन्हाळ्यात अवकाळी पावसाने थैमान घातले होते. ऐन कापणीच्या काळात पावसाने मारा केल्यामुळे तिळ उत्पादकांचे प्रचंड नुकसान झाले. प्रत खराब झाल्याने १२ हजार रुपये क्विंटलचा तिळ चार-दोन हजारांवर आला. आता पुन्हा पावसामुळे खरीप हंगाम धोक्यात आल्याने अल्पभूधारकांचे अवसान गळून गेले आहे.

९८८१७१६०२७

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# सारेच 'गद्दार' एका पक्षाचे!

२१ जून २०२२ रोजी एक उठाव झाला आणि उद्धव ठाकरे पक्षप्रमुख असलेल्या संयुक्त शिवसेनेचे ४० आमदार एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात पक्षाबाहेर पडले. आणि स्वतःच्या पक्षप्रमुखालाच मुख्यमंत्रिपदावरून खाली खेचले. ही घटना राज्यच नव्हे तर देशाच्या राजकीय इतिहासातली एक महत्त्वपूर्ण घटना असून, या घटनेचा दाखला पुढचे अनेक वर्षे दिला जाणार आहे. तर, राज्याच्या राजकारणात या घटनेचे दूरगामी परिणामदेखील दिसणार आहेत. या घटनेतील एक महत्त्वाची बाब म्हणजे, आपल्याच पक्षप्रमुखांविरोधात उठाव करून त्यांना पदावरून पायउतार करणारे ४० आमदार हे गद्दार होते, पन्नास खोक्यांसाठी यांनी पाठीत खंजीर खुपसला होता. त्यानंतर यांच्याच पक्षाच्या लोकांनी विधान परिषद आणि राज्यसभेच्या निवडणुकीत क्रॉस व्होटिंग केले. मविआची मते फुटली, त्यावेळी पुन्हा गद्दारी झाली. तेव्हादेखील घोडाबाजार झाला, बेईमानी झाली. यावेळीही करणारे मविआमधल्या 'त्या' एकाच पक्षाचे होते. आता पुन्हा यावेळी उपराष्ट्रपतींच्या निवडणुकीत एनडीएला १५ अधिकची मते मिळाली आणि आपण सगळे समजूच शकतो ही कोणाची असतील? मग पुन्हा घोडाबाजार, सौदेबाजी, खोके वगैरे वगैरे छाती बडवणे सुरू झाले. या सगळ्याची ''मॉरल ऑफ द स्टोरी'' गद्दारी करणारे, गद्दार किंवा विकले जाणारे, बेईमानी करणारे हे एकाच पक्षाचे निघताहेत. अर्थात त्यांचेच नेते प्रामाणिकपणे कबूल करताहेत. त्यामुळे आता हा पक्ष आहे की गद्दार निर्माण करणारी फॅक्टरी? सारेच गद्दार यांच्याच पक्षात कसे निघतात? हा देखील प्रश्नच आहे. बरं प्रलोभनं आणि आमिषांना यांचेच नेते कसे काय बळी पडतात हा संशोधनाचा विषयच आहे, बरं का...

बरं ठाकरेंच्या प्रतिष्ठेला, अस्तित्वाला धक्का लावणाऱ्या या उठावानंतर पुन्हा काही लोक ठाकरेंना जय महाराष्ट्र करून एकनाथ शिंदे यांच्याकडे जाऊ लागले. त्या त्यावेळेला जाणारे सर्व गद्दार होते. उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे आणि संजय राऊत त्यावेळला म्हणायचे, जायचा तेवढा सर्व कचरा गेला. आता आमच्याकडे प्रामाणिक लोक उरले आहेत. मग अचानक अजून उपराष्ट्रपतींच्या निवडणुकीत १५ अतिरिक्त मते रालोआ उमेदवाराला मिळाली. आणि ही सर्व मते महाराष्ट्रातून मिळाल्याचे बोलले जात आहे. मग १५ पैकी ९ मते ही एकाच गद्दारांच्या फॅक्टरीतून आलीत की काय? बरं ती असेल नसेल पण अकांडतांडव त्यांचाच चालला आहे.



एक गोष्ट या ठिकाणी अधोरेखित केली पाहिजे. जिथे कुठे भंडारा वाटप होत असेल तेथे रांगेत सर्वांत समोर ठाकरेंचेच शिलेदार असतात. खोके घेणारे, घोडाबाजारात बोली लागणारे, सौदेबाजीत पुढे असणारे, असे सगळेच गद्दार यांच्याचकडे निघतात. अन्य पक्षांत असे कमी आहेत. मग यांच्या पक्षातील लोकच का अशी निघतात? याचे आत्मपरीक्षण करण्याची उद्धव ठाकरेंना गरज आहे. निव्वळ भाजपावर आरोप करून आणि सोडून गेलेल्यांवर तोंडसुख घेऊन ही समस्या सुटणारी नाही.

**खरंच हास्यास्पद**

उपराष्ट्रपतिपद हे घटनात्मक पद आहे. त्यांनी निष्पक्षपणे काम केले पाहिजे. सी. पी. राधाकृष्णन् यांच्यावर निष्पक्ष काम करण्याची, लोकशाही व संविधानाचा सन्मान राखण्याची जबाबदारी आहे. ती त्यांनी चोख बजावली पाहिजे अशी अपेक्षा उबाठा गटाकडून राऊत व्यक्त करत आहेत. संवैधानिक पदांचा मानसन्मान राखला पाहिजे ही केवळ त्या पदावर बसलेल्यांची जबाबदारी नाही. त्या पदांचा मान राखणे हा देशातील प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. मग ते राष्ट्रपती, पंतप्रधान, राज्यपाल, मुख्यमंत्री यासारखी पदे असोत किंवा मग संवैधानिक कुठल्याही संस्था असोत, त्याचा सन्मान राखणे हे आपले प्रत्येकाचे कर्तव्य आहे. आता संवैधानिक पदाचा सन्मान राखण्याचा सल्ला देणारे कोण आहेत बघा... ज्यांनी सातत्याने राज्यपालांना भाज्यपाल म्हणून हिणवलं, ज्यांनी पंतप्रधानांबद्दल खालच्या पातळीवर टिप्पणी केली, ज्यांनी न्यायालये, निवडणूक आयोगांसारख्या संवैधानिक संस्थांबद्दल आक्षेपार्ह विधाने केली. संवैधानिक संस्था असलेल्या विधान मंडळाला चोर मंडळ म्हटलं, मुख्यमंत्रिपदावर बसून अनेक घटनाबाह्य कामे केलीत. अदखलपात्र गुन्ह्यांमध्ये अनेकांना तुरुंगात डांबले, संवैधानिक पदाचा वापर करून लोकांची घरे पाडली, संवैधानिक पदाचा वापर करून आपल्या प्रतिस्पर्ध्यांना गंभीर गुन्ह्यांमध्ये फसविण्याचा कट, षडयंत्र रचले, १२ आमदारांना १ वर्षांसाठी निलंबित करण्याच्या घेतलेल्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशात घटनाबाह्य काम केल्याचं म्हटलं आहे. त्यामुळे घटनात्मक पदांचा मान कसा राखायचा, हे यांनी शिकविणे म्हणजे अत्यंत हास्यास्पद प्रकार म्हणावा लागेल.

**माझं कुंकू मीच पुसलं**

उबाठा गटाचे 'माझं कुंकू माझा देश' हे अभियान म्हणजे निव्वळ ढोंग आहे. त्यांचे हे देशप्रेम बेगडी आहे. लोकसभा निवडणुकांवेळी त्यांच्या मिरवणुकांमध्ये पाकिस्तानचे झेंडे फडकले, हिरवा गुलाल उधळला गेला, मुंबई बॉम्बस्फोटात दोषी ठरलेले लोक उबाठा गटाच्या प्रचार रॅलीत मतं मागताना दिसले, तेव्हा राऊत यांना देश आठवला नाही. आज मात्र, क्रिकेट सामन्यावरून अचानक देशप्रेम उफाळून आलेले दिसत आहे. पाकिस्तानसोबत सामना खेळू नका असा दावा करणाऱ्या राऊतांनी जावेद मियाँदादला मातोश्रीवर बिर्याणी खाऊ घातली तेव्हा देशाभिमान कुठं गेला होता, याचं स्पष्टीकरण आधी दिलं पाहिजे. 'माझं कुंकू माझा देश' अभियान चालविणाऱ्या संजय राऊतांनी माझं कुंकू मीच पुसलं अशी परिस्थिती आपल्या मालकावर आणून ठेवली आहे. त्यातून सावरण्यासाठी एक माझा पक्ष बचाव अभियान राबविण्याची गरज आता आहे, त्यावर उबाठा गटाने विचार करावा.

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### अशोक स्तंभाची तोडफोड, राष्ट्रविरोधी मानसिकतेचे प्रतिबिंब

राष्ट्रीय मानचिन्ह अशोक स्तंभ हा भारताची संस्कृती, परंपरा, एकात्मता आणि सार्वभौमतेचे प्रतीक आहे. भारत सरकारचे अधिकृत प्रतीक म्हणून शासकीय कामकाजात त्याचा वापर केला जातो. नोटा, नाणी यापासून ते संसद भवन, राष्ट्रपती भवन, मंत्रालये तसेच विविध शासकीय विभागांच्या इमारतींवर हे चिन्ह असते. असे असताना श्रीनगर येथील हजरतबल दर्ग्याच्या नूतनीकरणाच्या उद्घाटनाच्या वेळी तेथे जो शिलापट कोरण्यात आला आहे, त्यावर अशोक स्तंभ असल्यामुळे वाद निर्माण झाला. दर्ग्यात जमलेल्या मुसलमानांनी दगडांनी या अशोक स्तंभाच्या आकृतीवर प्रहार करून त्याला तोडण्याचा प्रयत्न केला. या घटनेमुळे प्रश्न निर्माण होतो की, या दर्ग्याचे नूतनीकरण सरकारी खर्चाने झालेले आहे म्हणजेच नागरिकांनी दिलेल्या करातून झालेले आहे. या पैशांद्वारे मशिदी, मदरसे चालतात, मुसलमानांना सवलती, सुविधा देखील याद्वारे मिळतात. असे असताना देशाच्या सार्वभौमतेचे प्रतीक असलेले केवळ एक चिन्ह त्यांना चालत नाही, त्यासाठी शिलापट तोडफोड करण्यापर्यंत त्यांची मजल जाते. ही अत्यंत गंभीर घटना आहे आणि यातून भारतविरोधी मानसिकता स्पष्टपणे दिसून येते. ही राष्ट्रविरोधी मानसिकता ठेचण्यासाठी सरकारने कठोर कारवाई करून राष्ट्रभावना जपावी, अशी सर्वसामान्य नागरिकांची अपेक्षा आहे.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

●● ●●

### श्राद्धाची प्रथा पुराणकालीन



ज्यावेळी महाभारताच्या युद्धात कर्णाचा मृत्यू झाला व त्याच्या आयुष्यभरातील पुण्यकृत्यामुळे तो स्वर्गवासाला पात्र ठरला. परंतु स्वर्गाच्या द्वारापाशी त्याला अडवले गेले. तू आयुष्यात सोने, चांदी, हिरे, माणके, एवढेच नव्हे तर स्वतःची कवचकुंडलेही दान केलीस. परंतु या दानाचा स्वर्गात प्रवेश मिळविण्यासाठी उपयोग होणार नाही. कारण तू तुझ्या आयुष्यात कधीही कोणत्याही स्वधपात अन्नदान केलेले नाही तसेच पितरांना श्राद्धविधीच्या रूपाने अन्नदान केलेले नाही. त्यामुळे तुला स्वर्गात प्रवेश मिळणार नाही. त्यावर कर्णाने यमराजांना सांगितले की, मला याची माहिती नव्हती. त्यामुळे माझ्याकडून हा प्रमाद नकळत झाला आहे. यावर मला उपाय सांगा. तेव्हा यमराजांनी आणि चित्रगुप्तांनी कर्णाला पुन्हा १५ दिवस पृथ्वीवर पाठविले आणि या काळात कर्णाने अन्नदान केले तसेच आपल्या पूर्वजांच्या स्मृत्यर्थ श्राद्धविधी केले. त्यानंतर कर्णाला स्वर्गात प्रवेश मिळाला. स्वतः कर्ण सूर्यपुत्र होता. यमराजही सूर्यपुत्र होते. तरीही त्यांच्यातले हे नाते या नियमावर मात करू शकले नाहीत. एवढा हा नियम कठोर आहे. कर्ण ज्या काळात म्हणजे पंधरवड्यात पुन्हा पृथ्वीवर आला होता तो काळ पितृपक्ष म्हणून ओळखला जाऊ लागला.

**दीपाली गिते**/नागपूर

### जीवनातील चढ-उतारांनी जीवन त्यागू नका

या भूतलावरील प्रत्येक व्यक्तीचे जीवन अमूल्य आहे. ज्यांना जीवन मिळाले ते सर्व नशीबवान आहेत. अशा या सुंदर, अमूल्य, जीवनाच्या जगण्याचा आनंद प्रत्येकांन घ्यावा अशी अपेक्षा असताना छोट्या व क्षुल्लक कारणासाठी व्यक्तीने आपल्या जीवनाची यात्रा वेळेआधी संपविणे यापेक्षा दुसरे दुर्दैव नाही. जीवन एक आव्हान आहे आणि हे जीवनाचे आव्हान स्वीकारणे प्रत्येकाचे आद्य कर्तव्य होय. हिंदीमध्ये असे म्हटले आहे की 'जो डर गया वह मर गया' या विरुद्ध 'डरो नहीं क्यूँ के डर के आगे जित होती है.' जीवनात चढ व उतार येणारच. या चढ- उतारांची भीती बाळगणे म्हणजे जीवनाची हार किंवा पराभव समजू नका, तर ज्यामुळे ही वेळ आली त्याचा शोध घ्या, कुठे कमी पडलो हे शोधा व पुन्हा नव्या दमाने, नव्या उत्साहाने त्या उणिवांना दूर करण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करा. निश्चितपणे यश मिळते. जीवन संघर्ष आहे आणि त्या संघर्षाशी सामना करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य होय. अपयश, निराशा, समस्या, कठीण प्रसंग, अडथळे मार्गात येणारच. परंतु त्याची भीती न बाळगता त्यांना सामोरे जा. त्यात यश मिळतेच. स्वतःला कमी कधीच लेखू नये व स्वतःची हार किंवा अपयश याला कदापिही गांभीर्याने घेऊ नका. स्वत:च्या व इतरांच्याही जीवनाचे बरे-वाईट कदापिही करू नका. त्यावर मार्ग शोधा, उपाय शोधा. सातत्य राखल्यो एक दिवस यश मिळेलच. जीवन जगणे एक संघर्ष आहे आणि अशा संघर्षमयी जीवनाशी सामना करीत असताना अपयश आले म्हणून जीवरूपी मैदान सोडून कदापिही कायमचे निघून जाऊ नका, एक दिवस असा येईल की, त्या संघर्षावर तुम्ही मात कराल. जगात विशेष ध्येयाने पेटलेल्या व्यक्तींनी समस्यांशी सामना करीत असताना कधीही जीवन जगण्याचे मैदान सोडलेले नाही, त्यांचे उदाहरण डोळ्यासमोर ठेवून मार्गक्रमण करा, जिद्द, चिकाटी व प्रयत्नांची पराकाष्ठा करीत राहिल्याने यश निश्चितच मिळेल.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

●● ●●

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# अमळनेर-बीड विभागातील DEMU सेवा लवकरच सुरू होणार; स्पीड ट्रायल रनचे वेळापत्रक

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ सप्टेंबर**

पुणे विभाग, मध्य रेल्वे जनतेला कळवत आहे की अमळनेर-बीड रेल्वे विभागावरील बहुप्रतिक्षित DEMU (डिझेल इलेक्ट्रिक मल्टिपल युनिट) सेवा लवकरच सुरू होणार आहे. दरम्यान, १४, १५ आणि १६ सप्टेंबर २०२५ रोजी या विभागात सतत स्पीड ट्रायल रनचे वेळापत्रक आहे.



या ट्रायल रन नियमित प्रवासी सेवा सुरू करण्यापूर्वी ट्रॅकची अखंडता, सिग्नल सिस्टम आणि एकूण सुरक्षा मानके पडताळण्यास मदत करतील.

सार्वजनिक सूचना:

अमळनेर-बीड विभागातील रेल्वे ट्रॅकजवळ राहणाऱ्या रहिवाशांना आणि जनतेला या ट्रायल रनच्या दिवसांमध्ये सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तुमच्या सुरक्षिततेसाठी:

मार्गावर कुठेही ट्रॅकजवळ बसू नका.

रेल्वे मालमत्तेवर किंवा ट्रॅकवर अतिक्रमण करू नका.

अधिकृत लेव्हल क्रॉसिंग किंवा ओव्हरब्रिज वगळता रुळांवरून चालणे किंवा ओलांडणे टाळा.

शेतकऱ्यांना गुरेढोरे किंवा इतर पशुधन रुळाजवळ किंवा पलीकडे सोडू नका असा सल्ला देण्यात येत आहे.

पालकांना विनंती आहे की त्यांनी मुलांना रेल्वे रुळांपासून दूर राहण्यास मार्गदर्शन करावे.

पुणे विभाग सर्व नागरिकांकडून या विभागाचा चाचणी टप्पा सुरळीत आणि सुरक्षितपणे पार पडावा यासाठी सहकार्य करण्याची विनंती करतो.

दिनांक: १३ सप्टेंबर, २०२५
पीआर क्रमांक २०२५/०९/
जारीकर्ता: जनसंपर्क विभाग, पुणे विभाग, मध्य रेल्वे

## बीड जिल्हास्तरीय युवा महोत्सवात; सात स्पर्धांमध्ये सात बक्षिसे

# तुलसी महाविद्यालयाची विजयी कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ सप्टेंबर**

विद्यार्थ्यांनी आपल्या आवडत्या क्षेत्रात करिअर साधण्यासाठी धैर्य, प्रामाणिक मेहनत आणि पाय जमिनीवर ठेवणे आवश्यक आहे. यश आणि अपयश क्षणभंगुर असतात, परंतु सातत्यपूर्ण प्रयत्न आणि मेहनत हाच यश मिळवण्याचा मार्ग आहे, असे प्रतिपादन देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर आणि र. भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई यांच्या संयुक्त विद्यमाने ११ व १२ सप्टेंबर रोजी पार पडलेल्या बीड जिल्हास्तरीय युवा महोत्सवात तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीडच्या संघाने नाट्यकला, संगीत, नृत्य, वाद्यप्रस्तुती, वक्तृत्व, चित्रकला आणि आत्मकथन अशा सात प्रमुख स्पर्धांमध्ये आपले वर्चस्व प्राप्त केले.

या यशस्वी कामगिरीसाठी शनिवारी महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. प्रमुख वक्ते म्हणून प्रा. प्रदीप रोडे उपस्थित होते, तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. विजयकुमार बांदल, डॉ. सुनील जोंधळे, प्राचार्य डी. डी. राऊत, प्रा. नितीन काळे, मा. अशोक तावरे, तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डी. जी. निकाळजे आदी उपस्थित होते.



एकांकिकेच्या स्पर्धेत आदित्य ठोंबरे यांनी प्रथम पारितोषिक मिळवले, तर ऋतुजा वाघमारे हिने बेस्ट ॲक्ट्रेसचा मान प्राप्त केला, तर रोहित गव्हाणे यांनी बेस्ट ॲक्टिंग, उत्कृष्ट दिग्दर्शन आणि सर्वोत्तम संघगौरवाचे बक्षिस मिळवले. याशिवाय, रोहित गव्हाणे यांच्या टीमने मिमिक्री स्पर्धेत तिसरे स्थान मिळवले, तर शैला माने यांच्या टीमने रांगोळी स्पर्धेत तिसरे बक्षिस पटकावले.

प्राचार्य प्रा. डी. जी. निकाळजे यांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले, त्यांच्या अथक परिश्रमाचे कौतुक केले आणि भविष्यातही अशा सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सतत सक्रिय राहण्याचे आवाहन केले. डॉ.गजानन खेत्री, प्रा.पाठक प्राची यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी अथक मेहनत व तयारी करून या यशाची प्राप्ती केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. योगिता लांडगे यांनी केले, तर आभार प्रा. पल्लवी जगताप यांनी मानले.

## सेन्टेन्स सोशल सेंटरच्या पुढाकाराने आयोजित बीज महोत्सव उत्साहात

# महिलांनी आत्मविश्वासाने पुढे आले पाहिजे-जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ सप्टेंबर**

सेन्टेन्स सोशल सेंटरच्या पुढाकाराने आयोजित बीज महोत्सव उत्साह पार पडला.या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे जिल्हाधिकारी श्री.विवेक जॉन्सन यांनी मार्गदर्शन केले.



जिल्हाधिकारी जॉन्सन सरांनी महिलांच्या सामर्थ्याचे आणि त्यांच्या योगदानाचे प्रशंसा करताना सांगितले की, महिला सक्षम झाली तर ती केवळ आपले घरच नव्हे तर संपूर्ण देशाच्या विकासात मोलाची भूमिका बजावू शकते. तिने हाती घेतलेले प्रत्येक काम पूर्णत्वास नेत असते. त्यामुळे महिलेचे योगदान हे अमूल्य आहे असेही ते म्हणाले. शेतकरी महिला आपल्या मेहनतीमुळे केवळ शेत नव्हे तर संपूर्ण कुटुंबाला उभारी देते.

शेतकरी महिलांना आवश्यक त्यावेळी शासनामार्फत योग्य ती मदत दिली जाईल असे त्यांनी सांगितले. तसेच महिलांच्या सक्षमीकरणाबद्दल बोलताना, महिलांनी आत्मविश्वासाने पुढे आले पाहिजे. लघुउद्योग शेतीपूरक व्यवसाय शिक्षण आणि समाजकार्य या सर्व क्षेत्रात महिलांची उपस्थिती महत्त्वाची आहे. सरकार व प्रशासन अशा प्रयत्नशील महिलांच्या पाठीशी सदैव उभे राहील या कार्यक्रमात उपस्थित सर्व महिलांनी जिल्हाधिकारी जॉन्सन सरांचे मार्गदर्शन प्रेरणादायी असल्याचे सांगितले. विशेषता शेतकरी महिलांसाठी दिलेले मार्गदर्शन त्यांना आत्मविश्वास देणारे ठरले. या कार्यक्रमासाठी बहिरवाडी गावचे सरपंच, मंडळ अधिकारी, ग्रामसेवक उपस्थित होते. शेवटी सिस्टरनी आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांचे कामाचे कौतुक जिल्हाधिकाऱ्यांनी केले.

# कलाकार-रसिकांची 'रेंज' जुळली; अनिलदादांनी बीड रंगभूमीवर उभारला ऐतिहासिक नाट्य सोहळा!

**रेंज पाहिजे नाट्य प्रयोगासाठी बीडकरांची तौबा गर्दी; रसिक प्रेक्षकांच्या डोळ्यात तरवळले आनंदाश्रू!**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ सप्टेंबर**

अनिल दादा जगताप फाउंडेशन आणि शिवसेना प्रस्तुत 'रेंज पाहिजे' या नाटकाच्या माध्यमातून अनेक वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडानंतर बीड रंगभूमीवर नाट्यदिप प्रज्वलीत झाला असून कलाकार आणि रसिक प्रेक्षकांमध्ये नवचैतन्य संचारले. काल रोजी बीडच्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे भरगच्च रसिक प्रेक्षकांच्या उपस्थितीत शहरातील सत्तर कलाकारांचा सहभाग असलेले सोनल नहार लिखित आणि लक्ष्मीकांत दोडके दिग्दर्शीत रेंज पाहिजे या नाटकाचा पाहिला प्रयोग सादर झाला. बीड हा कलाकारांचाच बालेकिल्ला आहे. फक्त कुणीतरी पुढाकार घेण्याची आवश्यकता होती आणि हा पुढाकार चला, बीडच्या नाट्यपरंपरेला सुवर्णयुगाकडे नेऊ या म्हणत शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी घेतल्याने बीडमध्ये खंडित पडलेल्या नाट्य परंपरेला पुन्हा नव्याने जोरदार प्रारंभ झाला असून संपूर्ण शहराच्या सांस्कृतिक चेतनेला नवजीवन लाभले आहे. सोनल नहार यांच्या समर्थ लेखणीतील संवाद, लक्ष्मीकांत दोडके यांच्या दिग्दर्शनातील ठाशीव छाप आणि तब्बल सत्तर कलाकारांचा एकत्रित सहभाग या त्रिवेणीने बीडच्या रंगभूमीवर एक अद्भुत असा सोहळा घडवून आणला.



दोन महिन्यांच्या कष्टसाध्य तालमीमधून घडवलेली ही कलाकृती प्रेक्षकांच्या मनावर खोल ठसा उमटवून गेली. नाटकातील प्रत्येक पात्राने स्वतःची छाप सोडली. काहींनी हसवले, काहींनी रडवले, काहींनी विचार करायला लावले पण अखेरीस सर्वांनी अंतर्मनाला भिडणारा ठसा उमटविला. रसिकांच्या डोळ्यांत आलेले आनंदाश्रू हेच या नाटकाचे खरे यश ठरले. नाटकाचे सहाय्यक दिग्दर्शक रोहित पुराणिक आणि निर्मिती सूत्रधार प्रतीक कांबळे यांनी या कलाकृतीला भक्कम पाया दिला. संगीत, प्रकाशयोजना आणि कलाकारांच्या प्रामाणिक मेहनतीमुळे हे नाटक केवळ प्रयोग न राहता रसिकांच्या मनाचा सोहळा ठरले. एकंदरित रेंज पाहिजे हे नाटक बीडच्या रंगभूमीच्या नव्या पर्वाची जोरदार सुरूवात ठरले आहे. रेंज पाहिजे या नाट्यप्रयोगाचे उदघाटन जेष्ठ कलावंत भरत अण्णा लोळगे, दै. पार्श्वभूमीचे संपादक गंमतभाऊ भंडारी, दै दिव्य लोकप्रभाचे संपादक संतोषजी मानूरकर, जेष्ठ रंगकर्मी डॉ उज्वला वनवे, शिक्षक प्रेरक वैद्य सर, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन भैय्या मुळूक आणि हेवन व्हेज रेस्टोरंटचे संचालक तनय शेळके यांनी रंगमंचाचे विधिवत पूजन करून केले व कलाकारांना शुभेच्छा दिल्या.

कलाकारांची स्वप्ने रंगवण्यासाठी शिवसेना कायम सज्ज- अनिलदादा जगताप

शिवसेनेच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे महाकरंडक या स्पर्धेपासून बीडमध्ये खऱ्या अर्थाने कलाकारांना घडण्यासाठी पोषक असे सांस्कृतिक वातावरण निर्माण झाले आहे. आज या ठिकाणी मला आत्यानंद होतो आहे की, या चंपावती महोत्सवात तयार झालेले कलाकारच बीडमध्ये खंड पडलेल्या नाट्यपरंपरेला संजीवनी देण्याचे काम करत आहेत अशा परिस्थितीत आमच्या सारख्या बाळासाहेबांच्या शिवसैनिकांनी त्यांच्या पाठीशी उभा राहणे गरजेचे आहे. कलाकारांनी स्वतःचे स्वप्न साकारण्याकरिता मेहनत करावी, पुढे येत राहावे आपल्या बीडचे नाव राज्याच्या आणि देशाच्या रंगभूमीवर गाजवावे, शिवसेना खंबीरपणे कलाकारांच्या पाठीशी सदैव उभी आहे, अशी प्रांजळ भावना शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी नाटकाच्या उदघाटना प्रसंगी व्यक्त केली.

# अंबाजोगाई येथे सी.एम.आर.सी.ची १५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा व महिला मेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ सप्टेंबर**

दि. ११ सप्टेंबर २०२५ रोजी स्व. विलासरावजी देशमुख सांस्कृतिक सभागृह, अंबाजोगाई येथे महिला व बाल विकास विभागांतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळ नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्योग विकास प्रकल्प अंतर्गत अंबाजोगाई लोकसंचलित साधन केंद्राची १५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा व महिला मेळावा सी.एम.आर.सी.च्या सचिव रहिमुन्निसा बहादूरखा पठाण यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.

कार्यक्रमास महिला आर्थिक विकास महामंडळाचे विभागीय सल्लागार संदीप मराठे, विभागीय व्यवसाय विकास सल्लागार उत्कर्ष भोळे, महिला व बाल विकास विभागातील सखी वन स्टॉप सेंटरच्या श्रीमती खांडेकर, ICICI चे संतोष पाटील व नारायण बंडे HDFC बँकेचे प्रतिनिधी, तसेच माविम जिल्हा कार्यालयाचे जिल्हा समन्वय अधिकारी विलास जगताप, लेखा अधिकारी गजानन ढोणे, जिल्हा प्रकल्प सल्लागार सागर इंदुरकर, चखड सल्लागार नरेश कुरापाटी, सी.एम.आर.सी. सचिव, लेखापाल, उपजीविका सल्लागार, सहयोगिनी व कार्यकारीनी सदस्य मंडळ उपस्थित होते.

या प्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक संदिप मराठे व मंचावरील उपस्थित मान्यवरांनी राजमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि माता रमाई यांच्या प्रतिमेचे पुजन व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. स्वागत व प्रस्तावना उचठउ व्यवस्थापक मिना कांबळे यांनी केली. वार्षिक अहवाल व लेखा परीक्षण अहवाल लेखापाल स्वप्रील वाघमारे यांनी सादर केले.

या प्रसंगी कार्यक्रमाचे उद्धाटक संदीप मराठे यांनी शासकीय योजनांची माहिती दिली तर उत्कर्ष भोळे यांनी कृषि व पशुपालनाशी संबंधित योजनांची माहिती दिली, श्रीमती खांडेकर यांनी महिला व बालविकास विभागाच्या योजनांवर मार्गदर्शन केले. जिल्हा समन्वय अधिकारी विलास जगताप यांनी ऋद्धच् कार्यक्रमांतर्गत विविध शासकीय योजनांचे प्रस्तावना व सादरीकरण केले.

सभेत लाभार्थी महिलांशी गटचर्चा घेऊन ऋशशवलरलज्ञ फॉर्म भरून घेण्यात आले. उत्कृष्ट उद्योजिका, माविम मित्र यांचा जेन्डर चॅम्पियन म्हणून सत्कार व उत्कृष्ट महिला बचत गटांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. महिलांच्या बचत उत्पादित वस्तूंचे स्टॉल लावण्यात आले. शेवटी आभार प्रदर्शन उचठउ उपजीविका सल्लागार शार्दुल वाघमारे यांनी केले

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अनिता जोगदंड, अनुराधा नरवडे, राधा काशीद, विशाखा घाडगे, सुचिता सरवदे, मंदाकिनी सिरसाट, ज्योती वाघाळकर, पूजा वाघमारे, तसेच व्यवस्थापक मिना कांबळे, लेखापाल स्वप्नील वाघमारे व उपजीविका सल्लागार शार्दुल वाघमारे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# शिक्षक तांत्रिकदृष्ट्या सक्षम झाला पाहिजे -मधुकर सुवर्णकार

## रोटरी क्लबची शिक्षकांसाठी ए.आय.कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१३ सप्टेंबर**

शिक्षक तांत्रिकदृष्ट्या सक्षम झाले तरच ते ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोंचते.यासाठी शिक्षक तांत्रिकदृष्ट्या सक्षम झाला पाहिजे.असे प्रतिपादन गटशिक्षण अधिकारी मधुकर सुवर्णकार यांनी केले.




रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या वतीने शनिवारी खोलेश्वर महाविद्यालयाच्या गोपीनाथराव मुंडे सभागृहात तालुक्यातील शिक्षकांसाठी ए.आय.कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन गटशिक्षण अधिकारी मधुकर सुवर्णकार यांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खोलेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ दिपक फुलारी होते.तर मंचावर एम.के.सी.एल.चे विठ्ठल पांचाळ,प्रशिक्षक प्रा.संतोष मोहिते, रोटरीच्या अध्यक्षा प्रा.रोहिणी पाठक,सचिव मंजुषा जोशी,राजेंद्र घोडके,कल्याण काळे,रुपेश रामावत यांची उपस्थिती होती. या वेळी आपल्या अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य फुलारी म्हणाले की शैक्षणिक गुणवत्ता व दर्जा सुधारण्यासाठी शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर झाला पाहिजे. तंत्रज्ञानाचा वापर चांगल्या कामासाठी कसा होईल हे शिक्षकांनी इतराना सांगितले पाहिजे.

दिपप्रज्वलनाने कार्यशाळेचे उद्घाटन झाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रोटरी क्लबच्या अध्यक्षा रोहिणी पाठक यांनी केले.संचलन रुपेश रामावत यांनी केले. उद्घाटन सत्रा नंतर प्रा.संतोष मोहिते यांनी शिक्षकांना ए.आय. तंत्रज्ञानाचा वापर कसा करावा? याचे सविस्तर मार्गदर्शन उपस्थित शिक्षकांना केले. या कार्यशाळेस तालुक्यातील १५० शिक्षकांनी सहभाग नोंदवला.

# स्वामी विवेकानंद विद्यालयाच्या रूपेश कांबळेची जिल्हास्तरावर निवड

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१३ सप्टेंबर**

महाराष्ट्र शासन संभाजीनगर विभागाअंतर्गत तालुका क्रिडा स्पर्धेत येथील स्वामी विवेकानंद माध्यमिक विद्यालयाने घवघवीत यश संपादन केले असून या विद्यालयाचा विद्यार्थी रूपेश कच्छिंद्र कांबळे याची सतरा वर्षे वयोगटातून लांबउडी या प्रकारात जिल्हास्तरावर निवड झाली आहे.



रूपेश कांबळे याच्या यशाबद्दल विद्यालयात त्याचा सत्कार करण्यात आला तर संस्था अध्यक्ष मोहन जगताप, सचिव राहुल जगताप, मुख्याध्यापक लक्ष्मण जगताप, सुधाकर करांडे, एकनाथ चव्हाण, क्रिडा शिक्षक बालाजी तिडके, प्रशांत खडके, अरूण माने, श्रीकृष्ण थेटे, संदेश फुके, विनायक चौरे, दिलीप घाटुळ, शिवदास बनसोडे, वैभव सोळंके, शरद जावळे, संतोष ढेरे, श्रीमती लक्ष्मी अहंकारे, श्रीमती हेमलता भोसले, श्रीमती मोहिनी जाधव, प्रल्हाद चाळक, पांडुरंग कवडे, विठ्ठल भिसे, व्यंकटेश रकटे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मराठा आरक्षणाविरोधात याचिका ; पालकांचा टि.सी.साठी सामुहिक अर्ज

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १३ सप्टेबर-**

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे यासाठी हैदराबाद गॅजेट लागू करण्यात शासनाने निर्णय रद्द करावा, यासाठी नांदेडमधून प्राध्यापक मनोहर धोंडे यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. याचिका दाखल केल्याने मराठा समाजातील पालकांनी आता प्राध्यापक मनोहर धोंडे यांच्या मॉ. मीनाताई ठाकरे आश्रम शाळेतील आपल्या पाल्यांचा टीसी काढण्याचा निर्णय घेतला आहे. प्रा मनोहर धोंडे हे मॉ . मीनाताई ठाकरे आश्रम शाळेचे सचिव आहेत.



ओबीसीतून आरक्षण मिळावे, यासाठी हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा शासन निर्णय रद्द करावा, या मागणीसाठी अखिल भारतीय वीरशैव शिवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मनोहर धोंडे यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. धोंडे यांनी मराठा आरक्षणाला विरोध दर्शवल्यामुळे त्यांच्या संस्थेत शिक्षण घेणाऱ्या मराठा विद्यार्थ्यांच्या पालकांनी टीसी काढण्यासाठी सामूहिक अर्ज केला आहे. त्यामुळे मराठा-ओबीसी वाद पेटण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत.

मुंबई येथील आझाद मैदानावरील मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणानंतर राज्य सरकारने हैदराबाद गॅझेट लागू करण्यासह सहा मागण्या मान्य केल्या आहेत. त्यानंतर ओबीसींचे आरक्षण धोक्यात आल्याचा आरोप करत अनेक ओबीसी नेत्यांनी सरकारवर टीका केली. तसेच वेगवेगळ्या पद्धतीने आंदोलन करत या निर्णयाचा निषेध नोंदवला. दरम्यान, नांदेड जिल्ह्यातून मराठा आरक्षण विरोधात संघटनेच्या माध्यमातून मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. या संघटनेचे अध्यक्ष असलेल्या प्रा. मनोहर धोंडे यांचा मराठा आरक्षणाला विरोध आहे. त्यामुळे त्यांच्या संस्थेतील शाळांमध्ये आमच्या पाल्यांना शिक्षण द्यायचे नाही, असा पवित्रा लोहा तालुक्यातील मराठा पालकांनी घेतला आहे. जवळपास २१ पालकांनी एकत्र येत मनोहर धोंडे हे सचिव असलेल्या रिसनगाव येथील मॉ. मीनाताई ठाकरे आश्रम शाळेतून आपल्या पाल्यांची टीसी द्यावी, असा अर्ज केला आहे.

दरम्यान, याचिकेवरील सुनावणी पूर्ण होईपर्यंत कुणालाही कुणबी प्रमाणपत्र देऊ नये आणि संबंधित जीआर तत्काळ रद्द करावा, अशी मागणी प्रा. मनोहर धोंडे यांनी केली आहे. हैदराबाद गॅझेटियरच्या आधारे प्रमाणपत्र देणे म्हणजे संविधानाचा भंग असल्याचेही याचिकेत नमूद केले आहे. धोंडे यांनी मराठा समाजाला मिळणाऱ्या आरक्षणाविरोधात घेतलेल्या भूमिकेचा मराठा पालकांनी विरोध केला आहे. त्यातूनच टीसी काढण्याचा निर्णय घेतल्याचे अर्जदार पालकांनी सांगितले

**२१ पालकांचा अर्ज**

मीनाताई ठाकरे आश्रम शाळेचे सचिव प्रा. मनोहर धोंडे यांनी मराठा आरक्षण विरोधात याचिका दाखल केल्यामुळे २१ पालकांनी सामूहिकपणे आपल्या पाल्यांचा टीसी काढण्यासाठी अर्ज केला असल्याची माहिती मुख्याध्यपक लक्ष्मण पिंडगे यांनी दिली.

# धोकादायक शाळा ! रोशनगाव येथील जिल्हा परिषद शाळेची इमारत पडण्याच्या स्थितीत

**तभा वृतसेवा**
**धर्माबाद, दि. १३ सप्टेबर-**

तालुक्यातील रोशनगाव येथील जिल्हा परिषद शाळेची इमारत अत्यंत धोकादायक स्थितीत असून, ती कोणत्याही क्षणी कोसळू शकते. तरीदेखील या इमारतीत दररोज विद्यार्थी , विद्यार्थीनी शिक्षण घेत आहेत. ही बाब विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अतिशय गंभीर असून, पालक वर्ग व स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. शाळेची इमारत सुमारे ५० वर्षांपूर्वी बांधली गेली होती या कालावधीत इमारतीची कोणतीही मोठी दुरुस्ती किंवा नुतनीकरण करण्यात आलेले नाही त्यामुळे सध्या भिंतींना मोठमोठ्या भेगा पडल्या असून, छताच्या लोखंडी सळ्या बाहेर पडल्या आहेत. पावसाळ्याच्या दिवसात छत गळते, वर्गात पाणी साचते आणि विद्युत साहित्यही धोकादायक अवस्थेत आहे. पावसाळ्यात पाणी गळतीमुळे वर्गामध्ये शिकणे अशक्य होते काही भागांत छताचे लाकूड व लोखंडाचे सळईही गंजून गळण्याच्या स्थितीत आहेत. विद्यार्थ्यांवर जीव मुठीत घेऊन शिक्षणाची वेळ विद्यार्थ्यांना दररोज अशा मोडकळीस आलेल्या इमारतीत बसवले जाते वर्ग खोल्यांतील छत कधीही कोसळू शकते, असा धोका असून, यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे. काही पालकांनी आपली मुले शाळेत पाठवणे थांबवले असून, अनेक जण भीतीच्या छायेखाली आहेत.



**तातडीने कारवाईची मागणी**

स्थानिक नागरिक, शिक्षक संघटना, तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी जिल्हा प्रशासनाकडे तातडीने हस्तक्षेप करून नवीन इमारतीसाठी निधी मंजूर करण्याची मागणी केली आहे अन्यथा पालक व नागरिकांनी मोठ्या आंदोलनाचा नियोजनात असल्याचे सरपंच प्रतिनिधी शिवराज पाटील भंडगे, युवा नेते साईनाथ पाटील जाधव यांनी सांगितले आहे.

शाळा म्हणजे शिक्षणाचं मंदिर असतं, पण आमच्या मुलांसाठी ते मृत्यूचं दार ठरतंय. प्रशासन काही हालचाल करत नाही, ही फार दुःखद बाब आहे. एका विद्यार्थ्याच्या पालकाचे दुःखद शब्द

**प्रशासनाकडे वारंवार निवेदने; पण दुर्लक्षच**

शाळेचे मुख्याध्यापक देशपांडे सर , शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती आणि पालकांनी मिळून अनेक वेळा गटशिक्षणाधिकारी , गट साधन केंद्र,व जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांकडे निवेदने दिली आहेत पण अद्याप कुठलीही ठोस कारवाई झाली नाही केवळ पाहणी आणि आश्वासने एवढ्यावरच गोष्ट थांबते..

## संक्षिप्त वृत्त

### बंजारा समाजाला अनु. जमातीमधून आरक्षण दयावे :आ. हेमंत पाटील



**नांदेड** -मराठवाडयातील बंजारा (लमाण) समाजाला हैद्राबाद स्टेट गॅझेटियर (१९२०) नुसार अनुसूचित जमाती प्रवर्ग आरक्षणाचा दर्जा देण्याची मागणी मा.बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष तथा आमदार हेमंत पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. आमदार हेमंत पाटील यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, मराठवाडा हा प्रदेश सन १९४८ पर्यंत निजाम शासित हैद्राबाद राज्याचा भाग होता. त्या काळातील हैद्राबाद स्टेट गॅझेटिअर (१९२०) नूसार लांबडा/बंजारा (सुगळी) समाजाचा स्पष्ट उल्लेख अनुसूचित जमाती म्हणून केला आहे. बंजारा (लमाण) समाज मराठवाडा विभागामध्ये मोठया प्रमाणावर गॅझेटमधील उतारा (१९२०) मध्ये नमूद पुराव्यानूसार बंजारा समाज हा ऐतिहासिकदृष्टया व प्रशासकीय नोंदीनूसार आदिवासी समाजामध्ये आहे. तथापि मराठवाडा महाराष्ट्रात सामिल झाल्यावर सन १९५६ नंतर समाजाला ओबीसी/एनटी-सी प्रवर्गात समाविष्ट करण्यात आले. परंतू तेलंगाणा आणि आंध्र प्रदेशात याच गॅझेटचा आधार घेऊन बंजारा अनुसूचित जमातीचा दर्जा देण्यात आला आहे. मराठा समाजाच्या आंदोलनानंतर शासनाने मराठा समाज बांधवांना दि.२ सप्टेंबर २०२५ च्या शासन निर्णयानूसार हैद्राबाद गॅझिटियर लागू केले. शासन स्तरावर हैद्राबाद गॅझेटियर अधिकृतपणे स्विकारले व अंमलात आले असल्यामूळे त्याचा आधार घेऊन मराठवाडयातील बंजारा (लमाण) समाजाला हैद्राबाद स्टेट गॅझेटियर (१९२०) नूसार अनुसूचित जमाती प्रवर्ग (एस.टी.) मध्ये सामील करुन त्यांना या प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ देण्याची योग्य कार्यवाही करावी अशी विनंती आमदार हेमंत पाटील यांनी केली आहे.

# पाणंद रस्ता मोकळा करण्यासाठी उमरा येथील शेतकऱ्यांचा टाहो

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. १३ सप्टेबर-**



माहूर तालुक्यातील मौजे उमरा येथील गट क्र. ८३ मध्ये ये-जा करण्याकरिता असलेला आसोली शिव रस्ता अतिक्रमणमुक्त करून किंवा इतर पर्यायी बैलगाडी रस्ता उपलब्ध करून द्यावा, यासाठी उमरा येथील शेतकरी गेल्या वर्षभरापासून माहूर तहसील कार्यालयात पायपीट करीत असून, महसूल सप्ताह राबविण्यात जिल्ह्यात एक नंबरवर असलेले तहसीलदार अभिजीत जगताप यांनी सदर प्रकरणी तातडीने लक्ष घालावे, अशी मागणी निवेदनाद्वारे उमरा येथील शेतकऱ्यांनी केली आहे.

सदर शेतालगत मौजे आसोली ता.माहूरची शिव असून, त्या शिव रस्त्याने आम्ही आजपर्यंत आमच्या शेतात बैलगाडीने ये-जा करीत होतो. परंतु, सदर शिव रस्त्यालगतच्या काही शेतकऱ्यांनी संपूर्ण शिव रस्ता अनधिकृतपणे अतिक्रमण करून ताब्यात घेतला आहे. ज्यामुळे आमच्या उपरोक्त मालमत्तेत बैलगाडीने ये-जा करण्याचा आमचा रस्ता बंद झाल्याने आम्हाला आमच्या मालकी ताब्यातील क्षेत्राची वहीती करण्यास प्रचंड अडचण येत आहे. याप्रकरणी उमरा येथील सरपंचांनी ही अनेक वेळा शेतकऱ्यांना पानंद रस्ता मोकळा करण्याविषयी विनंती केलेली आहे.

शेतात बैलगाडीने ये-जा करण्यासाठी इतर कोणताही रस्ता उपलब्ध नसल्याने रस्त्याअभावी आमच्या मालकी व ताब्यातील क्षेत्र पडीत ठेवण्याची पाळी आली आहे. आमच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह सदरील शेतातील उत्पन्नातून चालत असून ,रस्त्याअभावी आमच्या कुटुंबीयांचा उदरनिर्वाहाचा मोठा प्रश्न निर्माण होईल,असे निवेदनात नमूद करून शेतकऱ्यांनी आनंद रस्ता मोकळा करून देण्याची मागणी तहसीलदार अभिजीत जगताप यांच्याकडे केली आहे.

निवेदनावर दिगांबर धोत्रे, सुदाम राठोड, बाबाराव राठोड, शोभाबाई राऊत, राम राठोड यांचेसह अनेक शेतकऱ्यांचे स्वाक्षऱ्या आहेत.

# आ. आनंदराव बोंढारकर यांनी दक्षिण मधील पूरग्रस्तांना तातडीने मदत पुरवण्याच्ये दिले आदेश

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १३ सप्टेबर-**

नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघात झालेल्या पूर परिस्थितीचा आणि नुकसानीचा आढावा आ. आनंदराव बोंढारकर यांनी आज शासकीय विश्रामगृह येथे घेतला. नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील लोहा तालुक्यातील अनेक गावातील विकास कामांचा आढावाही त्यांनी यावेळी घेतला. अतिवृष्टीने बाधित झालेल्या शेतकरी व ग्रामस्थांना तातडीने आर्थिक मदत पुरवा अशा सूचनाही त्यांनी तालुका व जिल्हा प्रशासनाला यावेळी दिल्या.




यावेळी लोहा तहसीलदार विठ्ठल परळीकर, गट विकास अधिकारी एम. एम. कुलकर्णी,शिवसेना तालुकाप्रमुख अशोक मोरे,उद्धव पाटील शिंदे,गट शिक्षणाधिकारी सतीश व्यवहारे,उपअभियंता (बांध) जि.प.उप विभाग लोहा शिवाजी राठोड,तालुका आरोग्य अधिकारी लोहा जगदीश कांबळे,पशुसंवर्धन अधिकारी लोहा आर.एम. पुरी,महिला व बाल विकास प्रकल्प अधिकारी लोहा माने,उप अभियंता पाणी पुरवठा बनसोडे यांच्यासह लोहा तहसील विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

आयोजित करण्यात आलेल्या आढावा बैठकीत बोलताना आ. आनंदराव बोंढारकर यांनी नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघात ज्या ज्या गावाना पूर परिस्थितीचा फटका बसला अशा गावांचा विशेष आढावा घेतला आहे . या भागातील शेतकरी आणि नागरिकांना तातडीने मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्या अशा सूचनाही त्यांनी यावेळी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत . लोहा तालुक्यातील परंतु नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील अनेक गावांमध्ये पूराच्या पाण्यामुळे नागरिकांच्या जनजीवनावर परिणाम झाला आहे. शेतकऱ्यांनाही मोठी अडचण निर्माण झाले आहे. अशा परिस्थितीत लोहा तालुका प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात आणि मदत पुरवावी असे निर्देशही त्यांनी दिले. महावितरण कंपनीने ही आपल्या कर्मचारी व अधिकाऱ्यांना सूचना देऊन या भागातील वीज पुरवठा सुरळीत करावा. शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही त्याची दक्षता घ्यावी असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. या बैठकीत मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे अनुषंगानेही त्यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत.

# मुदखेड पोलीस स्टेशन येथील गणरायाला ढोल ताशाच्या गजरात निरोप दिला

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १३ सप्टेबर-**

मुदखेड पोलीस स्टेशन येथे गेल्या ११ दिवसापासून गणपतीचे मनोभावे पूजा अर्चा करून दि. ०८ सप्टेंबर रोजी गणरायाचे मोठ्या थाटात विसर्जन करण्यात आले.



मुदखेड तहसीलचे तहसीलदार आनंद देऊळगावकर, पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण नायब तहसीलदार मारोतराव जगताप, यांच्या हस्ते गणपती पूजन व महाआरती करण्यात आली,आरतीनंतर लगेचच पोलिस ठाणेच्या वतीने महाप्रसाद कार्यक्रम ठेवण्यात आला होता.

मुदखेड शहर व तालुक्यातील गणपती विसर्जन झाल्यानंतर पोलिसांनी आपले गणपती विसर्जन केले. विसर्जन मिरवणुकीमध्ये पोलिसांनी पारंपारिक वेशभूषा करून गणरायाला ढोल ताशाच्या गजरात निरोप दिला.

यावेळी तहसीलदार आनंद देऊळगावकर,पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण,नायब तहसीलदार मारोतराव जगताप, सहाय्यक पोलीस निरीक्षक बी. आर. कांबळे, श्रीकृष्ण पाटील, पोलीस उपनिरीक्षक शिवाजी शिंदे, आकाश सरोदे, तलाठी गोपाल माने, केंद्रीय विद्यालयाचे प्राचार्य अजय चौकीकर, डीएसबीचे किशोर पाटील, बीट जमादार चंद्रशेखर मुंडे, बलवीरसिंग ठाकूर, रघुवंशी, अरविंद शिंगारपुतळे, नगर परिषदेचे दिलीप पवार, रमेश सावंत, सचिन चुंचे, सामाजिक कार्यकर्ते प्रकाश बल्फेवाड, गिरीष कोत्तावार, सचिन मगरे, चांदू बोकेफोड, सचिन चंद्रे, आधुनिक शेतकरी विजय पचलिंग, संपादक शेख अजगर हुसेन, ईश्वर पिनलवार, संतोष गाढे, सिद्धार्थ चौदंते, रुखमाजी शिंदे, दिनेश शर्मा, धम्मा कांबळे, अब्दुल रजाक, संतोष सावंत, हाफिज कुरेशी, साहेबराव गागलवाड, प्रल्हाद मस्के यांची उपस्थिती होती.

# आ. कोहळीकर यांच्या हस्ते रक्तदान शिबिराचे उद्घाटन

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. १३ सप्टेबर-**

सौ. राजश्रीताई हेमंत पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत हदगावातील हनुमान मंदिर परिसर मारुती नगर प्रभाग क्रमांक १ येथे बालासाहेब वसंतराव माळोदे यांनी या शिबिराचे आयोजन केले होते त्याचे उद्घाटन हदगाव-हिमायतनगर चे आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्या हस्ते संपन्न झाले तरी या रक्तदान शिबिरात एकूण ५५ रक्तदात्यांनी रक्तदान केल्याची माहिती आयोजकांकडून मिळाली.

सौ. राजश्रीताई हेमंत पाटील यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने हदगाव शहरातील सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब माळोदे यांनी रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन आमदार कोहळीकर यांच्या हस्ते करण्यात आले. रक्त संकलनाकरिता डॉ. प्रसाद बोराळकर, दिलीप सोनटक्के, परविन जीडे, महेंद्र चिजगावकर, राष्ट्रपाल जोडते, अपर्णा तिडके, प्रतिज्ञा चव्हाण, आकांक्षा मोरे यांचे सहकार्य लाभले तर यावेळी जिल्हाप्रमुख विवेक देशमुख, युवा सेना प्रमुख संदेश पाटील, शहर प्रमुख बबनराव माळोदे, बाबुराव कदम, राजू तावडे यांच्यासह इतर कार्यकर्ते यांची उपस्थिती होती तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिव पोगरे , शुभम शिंदे , वैभव , राहुल बिरदाळे , भारती बाळा देशमुख ,साई गायकवाड ,आशीर्वाद माळोदे, पवन माळोदे यांनी परिश्रम घेतले.

# दुधड येथील महिलेच्या खूनातील आरोपीला पोलिसांकडून साहा तासात अटक


**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. १३ सप्टेबर-**

तालुक्यातील दुधड येथे एका महिलेचा तिच्या रहात्या घरात गळा आवळून खून केल्याची घटना दि. ८ सप्टेंबरच्या रात्री घडली होती.

हिमायतनगर पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपींविरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारावर अवघ्या सहा तासात आरोपीच्या मुसक्या आवळल्या. या गंभीर गुन्ह्याची कबुली आरोपींने पोलिस तपासात दिली आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार दुधड येथील एका ५० वर्षीय महिलेचे गावातील एका तरूणासोबत गेल्या एक वर्षापासून अनैतिक संबंध होते. दि. ८ च्या रात्री आरोपी सुनिल भारत हातमोडे (वय ३० वर्ष धंदा मजूरी रा. दुधड) हा महिलेच्या घरी तिला भेटण्यासाठी गेला असता, सदरील महिलेने त्यास आपण गाव सोडून दुसऱ्या गावी एकांतात राहायला जावू, असा तगादा लावला. आरोपीस त्या महिलेसोबत बाहेरगावी जावयाचे नसल्याने तो विरोध करू लागला. रागाच्या भरात त्याने त्या महिलेचा गळा आवळून खून केला तेथून तो पसार झाला.ही घटना दि. ९ रोजी सकाळी उघडकीस आली. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून प्रेत हिमायतनगर येथील ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यासाठी दांखल शवविच्छेदन अहवालानंतर प्रेत नातेवाईकांच्या ताब्यात दिले. या प्रकरणी मोतीराम धोंडींबा शिंदे यांच्या फिर्यादीवरून हिमायतनगर पोलिस ठाण्यात खूनाचा गुन्हा नोंदविण्यात आला. घटनास्थळी पोलीस निरीक्षकासह अनेक जण उपस्थित होते.

**मुदखेड- मुस्लिम धर्मियांचे प्रेषित तथा संस्थापक मोहम्मद पैगंबर यांच्या १५०० व्या जयंतीनिमित्त मुदखेड शहरातील न्याहाळी रोडवरुन ईद मिलादुन्नबीची मिरवणूक काढून मुस्लिम बांधवांनी उत्साहात साजरा केला. इस्लामपुरा येथील रजा मज्जिदचे धर्मगुरू हाफिझ महंमद इमरान रजा आणि मिल्लत नगर येथील हजरत गरीब नवाज मशिदीचे धर्मगुरू हाफीझ झहीर यांनी फतेहा करत मिरवणुकीची सांगता करण्यात आली.**



**जाहिर प्रगटन**

नोंदीचा प्रकारःखरेदी
माहिती मिळलेचा दिनांकः१०/०९/२५
फेरफाराचा दि.११/०९/२५

लिहून देणारःबापूराव पोतन्ना रा.भोकर(खाता क्र.४६९)गटक्र./सर्व्हेक्र.२७२लागवडी क्षेत्र०.९८३४हे.आर.चौ.मी.पैकी लागवडी योग्य क्षेत्र०.००६९हे.आर.चौ.मी.आणि पोटखराब क्षेत्र ०.००००हे.आर.चौ.मी.त्यांनी संमती देणारे खातेदारःवन्सलाबाई सायलू नवाडे(खाता क्र.०)दस्त क्रमांक ५४९/१९९५दि.०३/०४/१९९५(२)दत्तात्रय गोविंदराव तेलंगे (खाता क्रमांकः०)दस्त क्रमांक ११७४/१९९६दि.०९/०९/१९९६

लिहून घेणारःविठ्ठल गंगाधर बूडकेवार(खाता क्र.१०८८७)गट/सर्व्हे क्र.२७२लागवडी योग्य क्षेत्र ०.००६९हे.आर.चौ.मी.आणि पोटखराब क्षेत्र ०.००००हे. आर.चौ.मी.यांना दूय्यम निबंधक भोकर जिल्हा नांदेड यांचेकडील खरेदी दस्त क्र.७५३दि.०९/०५/१९९७प्रमाणे रक्कम रुपये १८०००घेवून खरेदी दिली.सबब खरेदी घेणाऱ्यांचे नाव गाव नमूना नं.७/१२वर दाखल केले.ज्या अर्थी तूमचा उक्त फेरफारात हितसंबध आहे असे अधिकार अभिलेखावरुन फेरफार नोंदवहीवरुन मला वाटते ज्या अर्थी उक्त फेरफारात तूमचा हितसंबध आहे असे मानण्यास संयूक्तिक कारण आहे. उक्त फेरफाराच्या नोंदी संबधी तूम्हास सूचना मिळाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत उक्त नोंदीसंबधी तूमची हरकत कोणतीही असल्यास ती तोंडी किंवा लेखी पाठविण्यास फर्मावित आहे.ग्राम महसूल अधिकारी भोकर यांचेकडे पंधरा दिवसाच्या मूदतीत कोणतीही हरकत त्यांचेकडे न मिळाल्यास उक्त नोंदीस तूमची संमती आहे असे ग्रहित धरले जाईल याची नोंद घ्यावी.

ग्राम महसूल अधिकारी
तलाठी साझा भोकर

# फुलवळच्या टोलनाक्यावर तांदूळ भरलेला ट्रॅक झाला पलटी

**तभा वृतसेवा**
**फुलवळ, दि. १३ सप्टेबर-**

कंधार तालुक्यातील फुलवळ येथील टोलनाक्यावर आजपर्यंत अनेक अपघात झाले त्यात अनेकांनी जीव ही गमावला. तेंव्हा कोणत्या ना कोणत्या कारणाने येथील टोलनाका हा चर्चेचा विषय ठरलेलाच असतो. ता. १२ सप्टेंबर रोज शुक्रवारी पहाटेच्या सुमारास ट्रॅक गाडी क्रमांक (पी.बी.०४ ए.एफ.८४४८ ) मध्ये प्रति ५० किलो वजनाचे ६२० पोते साध्यपद्धतीने बारदान्यात बांधलेले तांदूळ भरून कर्नाटक वरून नांदेड मार्गे गोंदिया कडे जात असताना चालकाच्या अनवधानाने येथील टोलनाक्यावर पलटी झाला. सुदैवाने कसलीच जीवित हानी झाली नसून ट्रॅक चालक नामे रामेश्वर उर्फ परमेश्वर बालबाल बचावला , गाडी पलटी होताच चालक घटना स्थळावरून पसार झाल्याचे कळले.




अधिकची माहिती अशी की , घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार तांदूळ भरून सदर ट्रॅक बीदर वरून नांदेड ला जात होता असे सांगण्यात येत असले तरी दबक्या आवाजातली चर्चा मात्र काहीशी वेगळीच असून एका बड्या हस्तीचा हा माल असून अनधिकृत पद्धतीने पळवला जात होता अशी चर्चा ऐकायला मिळत आहे. कारण गाडी पलटी होताच चालक पसार होणे , गाडीत वाहतूक करत असलेल्या मालाचे कुठलेच कागदोपत्री पुरावे नसणे , ना कोणती खरेदी - विक्री ची पावती ना वे बिल त्यामुळे शंका कुशंकेला वाव मिळत आहे. एवढेच नाही तर गाडी वाहतुकीच्या मार्गाबद्दल ही वेगळीच चर्चा होत आहे. जर खरच सदरचा ट्रॅक बीदर वरून निघालेला असेल तर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५० वर ज्या ज्या ठिकाणी टोलनाके आहेत तेथील सीसीटीव्ही चे फुटेज घेतले तर नक्कीच सत्यता समोर येईल असेही बोलले जात आहे.

घटनास्थळी कंधार महसूल विभागाने विभागाने भेट देऊन पंचनामा केला असल्याचे संबंधित अधिकाऱ्याने सांगितले पण पंचनामा प्रत देण्यास मात्र टाळाटाळ केली. तसेच कंधार पोलिस ठाण्यातील कर्मचाऱ्यांनीही घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. सदर घटनेचे वृत्त लिहेपर्यंत कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे कळले.

सदर प्रकरणाची सत्याच्या मार्गाने चौकशी होईल का..? आणि खरच दोषींवर योग्य ती कार्यवाही होईल का..? असे अनेक प्रश्न जनमाणसातून उपस्थित केले जात असून सत्यता समोर येईल का सदर प्रकरण जागेच्या जागी दाबले जाईल असेही बोलले जात आहे.

**जाहिर प्रगटन**

नोंदिचा प्रकारःखरेदी
माहिती मिळालेचा दि.१०/०९/२५
फेरफाराचा दि.११/०९/२५

लिहून देणारःबापूराव पोतन्ना रा.भोकर (खाता क्र.४६९)यांचे गट/सर्व्हे क्रमांक २७२लागवडी योग्य क्षेत्र ०.९८३४हे.आर.चौ.मी पैकी लागवडी योग्य क्षेत्र ०.०१८५हे. आर.चौ.मी.आणि पोटखराब क्षेत्र ०.००००हे.आर.चौ.मी.हे त्यांनी

गट क्र.२७२ मध्ये प्लॉटिंग असून दि.०९/०९/२५ रोजी ग्राम महसूल अधिकारी यांनी जायमोक्यावर जावून पंचासमक्ष पंचनामा केला करिता नोंद घेण्यात आली.

संमती देणारे खातेदारःव्यंकटराव दिगंबरराव पवार लिहून घेणारःनारायण दत्तराम करडपल्ले(खाता क्रमांक १०८८६) गट/सर्व्हे क्रमांक२७२ लागवडीयोग्य क्षेत्र ०.०१८५हे. आर.चौ.मी.आणि पोटखराब क्षेत्र ०.००००हे.आर.चौ.मी.यांना दूय्यम निबंधक भोकर जिल्हा नांदेड यांचेकडील खरेदी दस्त क्रमांक ११०९ दि.२४/०७/१९९७ प्रमाणे रक्कम रुपये ४५००० घेवून खरेदी दिली.सबब खरेदी घेणाऱ्याचे नाव गाव नमूना नं ७/१२वर दाखल केले.फेरफारात हितसंबध आहे असे अधिकार अभिलेखावरुन फेरफाराच्या नोंदवहिवरुन मला वाटते उक्त फेरफारात तूमचा हितसंबध आहे असे मानण्यास संयूक्तिक कारण आहे.उपरोक्त जमिन आहे त्या गावचा ग्राम महसूल अधिकारी याद्वारे सूचना देत आहे हि सूचना मिळाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत नोंदिसंबधी तूमची हरकत कोणतीही असल्यास ती तोंडी अथवा लेखी पाठविण्या फर्मावित आहे पंधरा दिवसाच्या आत कोणतीही हरकत त्यांचेकडे न मिळाल्यास उक्त नोंदीस तूमची संमती आहे असे गृहित धरले जाईल याची नोंद घ्यावी.

**ग्राम महसूल अधिकारी**
**तलाठी साझा भोकर**

# साहित्य-संस्कृती



## निसर्गभान



# काटेरी लावण्य

**क**विवर्य बा. भ. बोरकर म्हणालेत,

**प्रति एक झाडामाडा**
**त्याची त्याची रूपकळा**
**प्रति एक पाना फुला**
**त्याचा त्याचा तोंडवळा**

खरं आहे ना? झाडांचा आकार, त्यांची पाने, फुले, बिया सारे काही वेगवेगळे आणि तरीही किती मनमोहक! प्रत्येक झाडाची आपली सौंदर्यस्थळे असतात. मागच्या आठवड्यात सकाळी फिरताना सोनपिवळी फुलं रस्त्याच्या बाजूला झळकली. तेव्हा लक्षात आलं की, इथं बाभळीचं झाड आहे! आजपर्यंत कधी लक्षातही न आलेलं हे काटेरी झाड आता लक्ष वेधून घेत होतं.

**रिमझिम सरींनी भिजवले**
**घुमारे अंगाखांद्यावर फुटले.**
**रुक्ष तू, खुलविती तव रूपे**
**पीत-गुलाबी मोहक झुमके.**

माळरानावर उभं असलेलं बाभळीचं काटेरी झाड दूरून एखाद्या दुर्लक्षित छत्रीसारखं दिसतं. पण, या छत्रीला वर बरीच छिद्र असतात आणि त्यातून आकाशाचं दर्शन होतं. माणसाचं लक्ष वेधून घेणारा रुबाब वा सौंदर्य त्या झाडात नाही. पण, आषाढातले घनगर्द मेघ जलधारांचा वर्षाव करतात. वसुंधरेवरचा तहानलेला प्रत्येक जीव तृप्त होतो, तेव्हा अंगावर काटे जोपासणारी रूक्ष बाभूळ मेघ वर्षावाने अंतर्बाह्य सुखावते आणि श्रावणात बारीक हिरवी पानं तिच्या प्रत्येक फांदीवर बाळसं धरू लागतात आणि बाभळीचं झाडं ही हिरवी माया जपतं. महिन्याभरात बघता-बघता,

बाभळीच्या अंगावर त्या हिरव्या पानांच्या मधून हळदीच्या पिवळ्या रंगाचे कंचांसारख्या गोल फुलांचे घोस लटकू लागतात आणि जिच्याकडे एक नजरही फिरकत नव्हती, ती बाभूळ सौंदर्यवती होते. हिवाळ्यात शेंगा धरतात, त्या उन्हाळ्यापर्यंत झाडावर दिसतात. शेंग पांढरट, पिवळसर व माळेसारखी असून, तिच्यात दहा-बारा अगदी लहान व चपट्या बिया असतात. बाभळीच्या शेंगा म्हणजे आपल्या शरीरातील जीन्सच्या आकृत्यांसारख्या दिसतात. इंदिरा संत यांनी या शेंगांना वेलांटीची वळणे म्हटलंय.

**लवलव हिरवीगार पालवी-काट्यांची**
**वर मोहक जाळी**
**घमघम करती लोलक पिवळे-फांदी**
**तर काळोखी काळी**
**झिरमिळ करती शेंगा नाजूक-वेलांटीची**
**वळणे वळणे,**
**या साऱ्यातुनि झिरमिर झरती-रंग नभाचे**
**लोभसवाणे**

बाभळीच्या खोडाला छेद केल्यास त्यातून डिंक स्रवतो. हा पौष्टिक असल्याने त्यापासून बनवलेले लाडू बाळंतिणीला खायला घालतात. घरांना-शेतांना वेड्या बाभळीच्या काटेरी झुडपांचे कुंपण घालतात. कवयित्री इंदिरा संत यांनी बाभळीच्या सौंदर्याचे त्यांच्या कवितेतून समर्पक वर्णन केले आहे. 'बाभूळ' या कवितेत त्या पुढे म्हणतात की,

**कुसर कलाकृति अशी**
**बाभळी-तिला न ठावी नागर रीती**
**दूर कुठेतरी बांधावरती-झुकून**
**जराशी उभी एकटी**
**अंगावरती खेळवी राघू,**

● वृंदा जोगळेकर
९४२२११३९४१

**लागट शेळ्या पायाजवळी**
**बाळ गुराखी होऊनीया,**
**मन रमते तेथे सांज सकाळी**
**येथे येऊन नवेच होऊन,**
**लेऊन हिरवे नाजूक लेणे**
**अंगावरती माखूनी अवघ्या,**
**धुंद सुवासिक पिवळे उटणे**

बाभळीच्या साली व शेंगापासूनही लेदर उद्योगात वापरतात ते टॅनीन मिळते. कातडी कमावण्यास हे फार उपयोगात आहे. शेंगेतील टॅनीनमुळे कातडे मऊ होते व त्याला चांगला रंग येतो; परंतु सालीतील टॅनीनमुळे कातडे कडक पण टिकाऊ होते व त्याला गडद रंग येतो. सालीचा उपयोग काळा रंग आणि शाई बनविण्यासाठीसुद्धा होतो. बारीक फांद्यांपासून निघणाऱ्या धाग्यापासून साधारण प्रकारच्या दोऱ्या बनवितात; कोवळ्या फांद्या दात घासण्यास वापरतात. त्यामुळे हिरड्यांना व दातांना बळकटी येते. या वृक्षाचे लाकूड खूप कठीण आणि टिकाऊ असते. त्यापासून अवजारांच्या मुठी व नावेच्या वल्ही तयार करतात. जळाऊ लाकूड म्हणून ते उपयुक्त असते. छत्रपती संभाजी महाराजांनी बाभळीच्या झाडांचे उंबरे घरांना बनवतात म्हणून बाभळीला महत्त्व दिले आहे.

बाभळीचा पाला बकऱ्या, मेंढ्या व उंट यांचे आवडते खाद्य आहे. खोडाची साल गडद तपकिरी किंवा जवळपास काळी, जाड व टणक असून, कमी-अधिक भेगाळलेली असते. भेगाळलेल्या सालीखाली अळ्या, किडे असतात. ते खाण्यासाठी झाडावर पक्ष्यांचा वावर असतो. बाभळीवर काटे असल्याने साप व इतर सरपटणारे प्राणी बहुतेक चढत नसावे म्हणून की काय कोण जाणे, पण साळुंक्या, बगळे, होले, कावळे वगैरे कितीतरी पक्षी या झाडावर रात्री वस्तीला असतात. झाडावर कोळ्याची जाळी लागतात. ती रात्री वाऱ्याने हलली की कोणीतरी हातपाय हलवतंय असं वाटून लहान मुलं घाबरतात. त्यामुळे बाभळीच्या झाडावर भूतं राहतात, असा समज आहे.

बाभूळ ही भारतातील सर्वांत महत्त्वाच्या व उपयुक्त वनस्पतींपैकी एक आहे. तिचे अनेक उपयोग बघता, फारशा आकर्षक न दिसणाऱ्या बाभळीला निसर्गाने किती समृद्ध जीवन दिले आहे, हे जाणवते.

**प्रत्येक फुल-पान, प्रत्येक दाणा**
**पाण्याच्या थेंबाचेही मोल जाणा**
**रेशमी, सुती धाग्यांचा ताना-बाना**
**निसर्ग सुंदर वस्त्र विणतो, पहा ना!**



# हातावरची भाकर

## गावगाडा

**ग्रा**मीण संस्कृती डोळ्यासमोर आली की तेथील खाद्यसंस्कृतीसुद्धा डोळ्यासमोर येते. 'सारे काही वीतभर पोटासाठी' ही म्हण आजच्या शहरी संस्कृतीत हरवल्यासारखी वाटते. कारण आता आम्ही पोटासाठी कमी आणि भौतिक सुखासाठी जास्त राबतो. शहरीकरण, आधुनिकीकरणामुळे तसेच बदलत्या जीवनशैलीने आमच्या खाण्या-पिण्याच्या सवयीसुद्धा पार बदलून टाकल्या. पूर्वी ग्रामीण भागात घरोघरी सकाळ-संध्याकाळी चुलीवरच्या भाकरीचा दरवळ सर्वत्र यायचा. विशेषतः हातावरची भाकर घरोघरी असायची. सोयरीक जुळवतानाच्या प्रश्नातसुद्धा मुलीला हातावरची भाकर करता येते का, हा एक कॉमन प्रश्न असायचा.

● अखिल देशपांडे
९७६७१५१८३०

हाताने थापलेली आणि चुलीवर खरपूस भाजलेली भाकर दुधात चुरून खातानाचे मिळणारे समाधान आजच्या पिझ्झा, बर्गरमध्येही नाही. सकाळच्या वेळी कोरभर भाकर आणि ओंजळभर हिरव्या मिरचीचा झणझणीत ठेचा हाच ब्रेकफास्ट होता.

पूर्वी ग्रामीण भागात एकत्र कुटुंबपद्धती असायची. त्यामुळे घरच्या स्त्रीला मोठ्या प्रमाणात भाकऱ्या कराव्या लागायच्या. पण ती लक्ष्मी कधीच दमायची नाही. येणाऱ्या-जाणाऱ्यांचाही ओघ मोठा होता. आदरातिथ्य केवळ चहापुरते मर्यादित नव्हते, तर जेवल्याशिवाय पाहुणा घराची पायरीसुद्धा उतरत नव्हता. बरं या हातावरच्या भाकरीचे वैशिष्ट्य म्हणजे, त्या भाकरीचा नकाशा झालेला आम्ही कधीच पाहिला नाही. एवढे जबरदस्त कौशल्य असायचे. मायेनं थापलेल्या हातावरच्या त्या भाकरीची चव आता फक्त कल्पनेनेच अनुभवावी लागते. आज काळ बदललाय, धकाधकीच्या आजच्या काळात भाकरी तर सोडा आम्ही स्वयंपाक करणेच विसरलो, मेट्रो शहरात तर हीच संस्कृती आलीय. हल्ली वीकएंडला तर हॉटेल्स गर्दीने फुल्ल भरलेली असतात. शहरी भागात नवरा-बायको दोघेही नोकरी करतात. त्यामुळे सगळे वेळापत्रकच बदलले आहे. त्यामुळे आज घरोघरी पोळ्यावाली मावशी येते. रोजच्या आहारात थोडासा बदल म्हणून मग कधीतरी भाकरीचा बेत होतो. पण त्या सुद्धा लाटलेल्या, हातावरच्या नाही...

## काव्यरसानुभूती

# हिर्व्या पानांत पानांत...रानातली रासलीला

**हिर्व्या पानांत पानांत काही चावळ चालते**
**भर ज्वानीतली ज्वार अंग मोडीत बोलते**
**शेत गव्हाचे पिवळे जरा नशेत झुलते**
**आणि साळीचे उगाच अंग शहारून येते**
**पोटऱ्यांतल्या गव्हाचे हसू ओंब्यांत दाटते**
**केळ कातीव रूपाची छाया पाण्यात शोधते**
**हिर्व्या पानांत पानांत काही चावळ चालते**
**कशी बोलता बोलता अवेळीच सांज होते.**

'**रा**नातल्या कविता' या संग्रहातील सर्व कविता शीर्षकविहीन आहेत. त्यातील अनेक कविता मिळून एक दीर्घ मालिकाकविता तयार होते, असे लक्षणीय साम्य यातील आशयसूत्रांमध्ये आहे! 'हिर्व्या पानांत पानांत...' ही त्यापैकीच एक कविता.

महानोरांच्या अनेक कवितांप्रमाणे याही कवितेत निसर्ग कविमनासाठी प्रतीकरूप बनून आलेला दिसून येतो. निसर्गाच्या निकट सान्निध्यात वावरताना, निसर्गातील विविध घटकांत स्वतःचे आणि इतरांचे रूप शोधताना कविमनात काही गोष्टी पक्क्या ठसलेल्या दिसतात. हा विशिष्ट प्रतिकांचा प्रवास 'रानातल्या कविता', 'वहीं', 'पावसाळी कविता', 'अजिंठा' इथवर ठळकपणे कायम असलेला दिसतो. कवीच्या एकाकीपणाला तारुण्यातील स्त्री-आकर्षणाच्या अस्वस्थतेने अधिक गहिरे, गूढ आणि गडद केलेले आहे. कविमनाची अस्वस्थता वाढविली आहे. या अस्वस्थ आणि चंचल मनाचा आधार झाला आहे निसर्ग! एकटा निसर्ग! या कवितेत कविमन आहे, जिच्या आकर्षणाने कविमन व्याप्त आहे, ती स्त्रीरूपे आहेत आणि ज्याच्या सान्निध्यात जिवाची काहिली शांत करण्याचे सामर्थ्य आहे, तो निसर्ग! रानातील 'कविता' ही या त्रिकुटाची कविता आहे. या त्रिकुटाच्या अखंड, अस्वस्थ, चपळ, धुंद, मस्त संवादाची ही कविता आहे. हीसुद्धा एक अस्सल रानकविता म्हणजे शेतातल्या, रानातल्या निसर्गात घडलेली एक जिवंत घटना आहे! म्हणूनच ही निसर्गकविता अधिक अस्सल आहे. कारण ही कविता प्रत्यक्ष खेड्यात वा कुटुंबात, कुटुंबाच्या समस्यांत, खेड्यातील चौकाचौकांत, माणसांच्या गर्दीत घडतच नाही, तिची घडण यापासून दूर जाऊन होते शेतरानात!

कवीचे मन धुंद होऊन हिरव्याकंच शेतरानात गुंगून केले आहे. हिरव्या पानांच्या सळसळीत त्याला एक चावळ, चलनवलन, चैतन्य जाणवते! त्या शेतातल्या प्रत्येक घटकात त्याला भासमान होते, त्याच्या मनात धिंगाणा घालणारे स्त्रीविश्व!



भर ज्वानीतली ज्वार अंग मोडीत बोलते/ शेत गव्हाचे पिवळे जरा नशेत झुलते आणि साळीचे उगाच अंग शहारून येते/ पोटऱ्यांतल्या गव्हाचे हसू ओंब्यात दाटते/ केळ कातीव रूपाची छाया पाण्यात शोधते (कविता क्र. १६, रानातल्या कविता)

या उदाहरणांत अशा सगळ्याच घटकांचा समावेश केलेला आहे. यातील प्रत्येक घटकाचा वापर विविध भावभावनांच्या अभिव्यक्तीसाठी केलेला दिसतो. ज्वारीची भराला आलेली पिके या कवितेत तारुण्य भराला आलेल्या तरुणीची जागा घेतात. कवितेत केवळ ज्वारीचे नव्हे तर, गहू, साळी आणि केळी याही झाडांतून स्त्री तारुण्याचा उत्सव कवी टिपू पाहतो. इथे एक गोष्ट लक्षात घेणे महत्त्वाचे आहे, ती म्हणजे या पिकांकडे वा झाडांकडे बघून कवीला त्यात तरुण स्त्रीचे उन्मादक सौंदर्य प्रतीत होते.

● राजेंद्र नाईकवाडे
९८५०३५१०२५

'रानातल्या कविता' या संग्रहातील अनेक कवितांप्रमाणे याही कवितेत अष्टाक्षरी ओवी छंद वापरलेला आहे. एका चरणात आठ-आठ अक्षरांचे दोन गट, अशी एकूण १६ अक्षरे आहेत. शेवट करताना दोन चरणातून आशयाचे पुनरावर्तन केलेले आढळते. कवितेची पहिली ओळ आणि शेवटच्या द्विपदीची पहिली ओळ सारखी असून, त्याला जोडलेला दुसरा चरण कवितेच्या आशयकेंद्राकडे अंगुलीनिर्देश करतो. अष्टाक्षरी छंदात बहुधा अक्षरांचे गट २+२+२+२ किंवा ४+४ अशा पद्धतीनेच पडण्याची शक्यता असते. त्यातही २+३+३ अशा रचनेचे प्राबल्य आढळते. (ओवी छंदात) महानोरांच्या या कवितेतही असे अक्षरगट प्राबल्याने दिसतात. विशिष्ट अक्षरसंख्येने तयार होणाऱ्या शब्दांच्या आवर्तनामुळे लय आणि गेयता उत्पन्न होण्यास मदत होते किंवा विशिष्ट अशा लयींच्या मागणीमुळेच असे अक्षरगट निर्माण होत जातात. त्यांची आवर्तने लयीचा रचनेवरील प्रभाव दाखविणारी असतात. संपूर्ण कवितेत एकच एक लय सांभाळलेली असते. त्यासाठी अक्षरछंदात रचना करणे सहज आणि सोपे जाते. हा साधेपणा, सहजपणा आणि सोपेपणा (रचनेतील) लोकवाड्याच्या संस्कारांचाच एक भाग असल्याचे लक्षात येते.

कविमनातील पुरुष अबोधपणे सृष्टीशी मुक्त संभोगात रत झालेला असला, तरी त्याच्या भावनांना चाळवण्याचे वा खतपाणी घालण्याचे काम वास्तवातील स्त्रीरूपेच करीत असतील, हे विसरता येणार नाही. त्यामुळे महानोरांच्या काव्यातील स्त्रिया वा निसर्ग ही तत्त्वे जशी एकप्रकारे स्थलकालातीत अशी आहेत, तशीच ती दुसऱ्या बाजूला स्थलकालनिबद्धदेखील आहेत. जाणीव आणि नेणीव यांची इथे सरमिसळ झालेली दिसते. वास्तवात घटणाऱ्या अनेक घटनांची प्रतिबिंबे तीव्रपणे महानोरांच्या काव्यातून उमटताना दिसतात. कविमन केवळ काल्पनिक पातळीवरच नव्हे, तर वास्तव-लौकिक पातळीवरही विविध प्रकारचे शृंगारप्रधान व प्रणयप्रधान अनुभव घेत असते. या वास्तवातूनच 'कल्पनांचा' जन्म होतो.

'हिर्व्या पानांत पानांत...' या कवितेत शेतातील विविध पिकांची सुंदर रूपे कवीला खुणावतात आणि त्या पिकांच्या, झाडा-झुडपांच्या चैतन्यमय चलनवलनातून त्याला स्त्रीचे विविध विभ्रम भासमान होतात. शेतात सर्वत्र त्याला यौवनाने मुसमुसलेल्या तरुणीचे विभ्रम भासमान होतात. 'जळी-स्थळी-काष्ठी-पाषाणी' त्याला तरुण स्त्री आणि तिचे उन्मादक देहसौंदर्य दिसते. पिकांची प्रतिमा 'स्त्री' सौंदर्यवर्णनासाठी येते, शृंगारासक्त पुरुषमनासाठी 'झाडाची' प्रतिमा येते. अनेकदा कविमन 'झाडावर' बसून आणि 'झाडात' सामावून स्त्रीसौंदर्याचा आस्वाद घेताना दिसून येते. काही अपवादात्मक उदाहरणात अनावृत स्त्रीसौंदर्यासाठी झाडाचा वापर होतो. महानोरांच्या कवितेत रूढ अर्थाने वा साचेबद्ध पद्धतीने झाडादी निसर्गघटकांचा वापर नसतो. कवीची प्रतितीच एक विलक्षण रूप धारण करते. निसर्गघटक आणि कविमन यांच्यात तारुण्यसुलभशृंगारभावना यांची विलक्षण सरमिसळ या अभिव्यक्तीत असते. दिवसभर या शेतातल्या बहरलेल्या पिकांशी आणि विविध झाडाझुडपांशी समरस होत, त्यांच्याशी जिव्हाळ्याचा संवाद करीत, धुंदीत वावरणाऱ्या कविमनाला संध्याकाळ कशी झाली हेही कळत नाही, म्हणून ते म्हणते- अशी बोलत बोलता अवेळीच सांज होते!

## मन्याच्या काड्या

# ती पाहताच 'बार' बाला

**दु**पारची वेळ होती. मस्त जेवणखावण आटोपलं होतं. हातात पेपर व टीव्हीवर रशिया-युक्रेनचे युद्ध बघत बसलो होतो. तितक्यात दारावरची बेल वाजली. नेहमी बेल वाजली की ''अहो, जरा बघता का दारात कोण आलं ते'' हेच वाक्य ऐकायची सवय होती मला. पण, आज ठरवलं की लक्षच द्यायचं नाही. त्यामुळे पुन्हा बेल वाजल्यावर बरोबर आतून आवाज आला ''अहो, जरा बघता कां दारात कोण आलं ते'' मी उत्तरच नाही दिलं. दारावर बेल वाजतच होती. शेवटी कंटाळून कपडे धुता धुता हीच उठली आणि माझ्याकडे बघत तोंडातल्या तोंडात काहीतरी बडबडत दार उघडती झाली. मी आपला आनंदात मस्त पेपर वाचण्यात गुंग आहो, असे दर्शवत होतो. ''नही चाहीए हमको... हमारे घर बहोत पडे है... पंधरा पंधरा दिन एक टिकता है... नही चाहीए, नही चाहीए...'' असं म्हणून सौ. ने दार बंद करून टाकलं व पुन्हा कपडे धुवायला निघून गेली. आज ''कसं हरवलं हिला'' याचाच आनंद वाटला. तिकडे टीव्हीवर युद्धाच्या बातम्या मस्त सुरू होत्या. मी त्या दोन देशांना उगाचच आम्हा दोघामंध्ये वाटून दिले. म्हणजे बलाढ्य रशिया मी झालो आणि वारंवार सासुरवाडी तक्रार करणारी युक्रेन सौ. ला ठरवलं आणि युद्धात कोण जिंकते-हारते हे मी बघत बसलो. काहीवेळा नंतर पुन्हा दारावर बेल वाजली. ''अहो बघता का कोण आलं... नभा आली असेल, आपली मोलकरीन... उघडा दार नाहीतर चालली जाईल तारेकडे...'' मग मात्र मी घाईघाईत उठलो. दार उघडलो. बघतो तर काय! एक सुंदर युवती... तिचे ते कुरळे बाल... गोरा रंग...नाजुकशी...दारावर उभी. ''सर, मघाशी मॅडमने हाकलून लावलं हो मला...बसं एवढेच साबणं उरले आहेत... नको म्हणाल्या त्या... साहेब प्लीज... प्लीज.'' अच्छा... म्हणजे मघाशी खाडकन दार बंद केलं याचं कारण कळलं मला. आतून आवाज आला ''अहो, आली ना नभा...'' ''अगं नभा... नभा नाही पण माझं भान... भान हरवणारी आली दिसते...'' (हे वाक्य मी मनाशीच म्हटलं) भानावर येऊन मी म्हणालो, ''नाही आली नभा... या सेल्सगर्ल आहेत.'' सौ. पुन्हा साबणाच्या फेसाने भरलेले हात घेऊन बाहेर आल्या. ''ताई हमको नही पाहीजे साबण... जादा ठेवके क्या करू... दोन दोन दिवस हे आंघोळ करीत नाही... नही चाहीए...'' सौ. ने मी दोन दिवस आंघोळ करीत नाही, हे सांगून माझी पार वाट लावली. ''अगं... दोन दिवस आजारी होतो हे सांग ना... आंघोळ करीत नाही का मी...'' मी जरा चिडूनच म्हटले. ती सेल्सगर्ल पुन्हा विनंती करू लागली, ''काकू... फक्त इतक्याच वड्या शिल्लक आहे. शिवाय चांगली ऑफर पण आहे... माल संपवायचा आहे... प्लीज.'' कां कुणास ठावुक पण या वयातही मला ती झटक्यात आवडलीच होती. ''अगं... घेऊन टाक ना त्या वड्या... लागतातच ना'' तिच्याबद्दल मी दाखवलेली सहानुभूती हिला बिलकुल आवडली नसावी. ''बघा तुम्हीच काय घ्यायचं ते...'' एवढे बोलून सौ. कपडे धुवायला निघून गेली. ''किती आहेत वड्या तुमच्याजवळ...'' अत्यंत आपुलकीने मी विचारले. ''काका...'' (काका म्हटल्यावर मी जरा सावध झालो... मागे गेलेले केस मुद्यामुन कपाळावर आणले... ''आमचा बार चमको बार आहे. एका धुण्यात कपडे चंद्रासारखे शुभ्र होतात. शिवाय दहा साबणं घेतले की हे कुपन कापायचं, त्यात जे निघेल ते तुम्हाला मिळणार.'' मग मी दहा साबणं विकत घेतले. कधी कधी मुद्यामुन तिच्याकडे बघून हसलो पण. मग कुपन फाडून पाहिले तर 'छोटा कुकर' निघाला होता. मला आनंद झाला. ''अगं ऐकलं का... अगं कुकर लागला आपल्याला...'' मी ओरडून सांगितलं. सौ. येईपर्यंत मी तिला नाव, गाव, शिक्षण वगैरे विचारूनच टाकलं. वारंवार वाटत होतं म्हणावं की तुम्ही सुंदर दिसता वगैरे... तितक्यात सौ. आल्या. ''अय्या, कुकर निघाला... फक्त दहा साबण वडींवर... म्हणून मी म्हणत होते की तुम्हीच दार उघडा म्हणून...'' ''अगं मला काय माहीत साळी उभी आहे दारात म्हणून...'' सौ.ने खाडकन माझ्याकडे बघितलं. ''बाळी...ग...बाळी...तू का साळी ऐकलं का...? खो-खो, खो-खो मी हसत सुटलो, नकली नकली. मग दहा साबणाचे पैसे तिला दिले आणि तिने कुकर उद्या आणून देते, असे आश्वासन दिले व निघून गेली. ''अग दार मीच बंद करतो, जा तू कपडे धू...'' असे मी म्हणून शेवटपर्यंत तिला बघत बसलो. ती गेल्याचे दुःख उगाच झाले, पण उद्या पुन्हा येणार कुकर द्यायला, या कल्पनेनं अंगावर अक्षरशः शहारे आले. केव्हा 'उद्या' येते याची आतुरतेने वाट बघत बसलो. दुसऱ्या दिवशी सकाळी सकाळी महेशच्या कटींग दुकानात जाऊन केसांना ठिक करून घेतलं. चेहरा मशीनने स्वच्छ करून घेतला. आरशात उगाच चारदा बघून घेतलं. त्या उमेश सारखी टक्कल दिसणार नाही, याची पुरेपूर खबरदारी घेतली आणि दारावरची बेल केव्हा वाजते, याची वाट बघत बसलो. सौ. पुन्हा नियमित कार्यक्रमानुसार कपडे धुवायला बसली. तितक्यात दारवरची बेल वाजली. ''अगं तू उठू नकोस... मी उघडतो दार...'' आणि मी दार उघडले. आता खरचं 'नभा' होती. मी नाक तोंड मुरडलं व दार बंद केलं. पुन्हा टीव्हीवरील युद्ध बघत बसलो. पुन्हा काही वेळाने बेल वाजली. ''अगं तू उठू नकोस... मी उघडतो दार...'' यावेळी शेजारची उर्मिला होती. वारंवार काहीना काही मागत असते ही बया. माझ्याकडे हसत म्हणाली, ''काकूंना जरा साखर मागायला आली...'' मी पण रागात म्हटलं, ''हो हो...जा ना...बारामतीच्याच काकू त्या... साखर कारखानेवाल्या...'' इकडे मात्र मी उतावीळ झालो होतो. बेल न वाजताच दार उघडून बघत होतो. नभा भांडे घासायला बसली, उर्मिला पातेलेभर साखर घेऊन गेली. हिचे कपडे धुणे आटोपले व सौ. पण हॉलमध्ये आल्या. ''कसची मेली चमको साबण... उगाळता उगाळत नाही... तोंडाला फेस येते पण या साबणाला नाही... येऊ दे बयेला... फेकूनच मारते साबण...'' सौ. चा हा रागअवतार बघितल्यावर मी म्हटले, ''अगं एखादी वडी निघाली असेल तशी... उद्या दुसरी वापरून बघ... ती तिच्या घरी बनवते का साबण... बिच्चारी विकते फक्त... आज येणार होती आली कशी नाही बुवा...'' मी येरझारे घालत होतो. ''हु... तुम्हाला जरा जास्तच कळवळा आला दिसतो त्या बार बयेचा... आज दार कसे पटापट उघडले... ती येतच नाही आता बघा आणि आलीच तर माझ्याशी पहिली गाठ आहे... हं...'' ''अगं... असं काय करतेस...काही अडचण आली असेल... येईलच ती बघ...'' ''बाप्पा... लोकाइच्या वाटा पंढरीकडे लागते अन तुमची त्या पांढरीकडे... हं... केसं गिसं काळे करून आले दिसते... चेहरा पण जरा चोपडा दिसून राहिला... अहो प्रेमात गिमात पडले का या वयात...'' या बायकांना कसे कळते हे लक्षात येत नाही. मी आपलं काहीबाही बोलून वेळ मारून नेली व वाटच बघत बसलो...हो...हो...वाटच बघत बसलो. पण, सायंकाळपर्यंत ती 'बार बाला' काही आलीच नाही. कुकरच्या शिट्या केव्हाच वाजल्या होत्या. आपल्या घरात युद्ध नको म्हणून मी टीव्हीवरील रशिया-युक्रेन युद्ध बंद करून टाकले. चुकल्याचुकल्या सारखे रात्री जेवण केले. कुठेतरी हिरमोड झाला, ही भावना मनात आली. रात्री झोपताना सौ. म्हणाली, ''आता इतक्या साबणवड्या काय करायच्या... हळदीकुंकू पण नाही इतक्यात...अहो...काय करायच्या...अहो...अहो...'' एव्हाना मी झोपून गेलो होतो. पण स्वप्नात सासूबाई त्या दहा वड्या घेऊन गेल्या आणि ती 'बार बाला' पुन्हा दारात आली, इतकं स्वप्न मात्र मी बघितलं...हो...हो...खरचं... 'ती पाहताच बार बाला, कलेजा खलास झाला.'



● मनोज वैद्य
९८२२९४९२६०

## आईचा गोंधळ

नवरात्रीचा उत्सव आईचा
गजर उदो उदो भवानीचा
गोंधळ मांडला जगदंबेचा
देवी रेणूका माय माऊलीचा।
संबळ वाजतो राऊळात
कुंकवाचा मळवट भरवत
दिवटी तेलाची पेटवत
उदो उदो गजर भक्तीचा।
अधर्माचा घडा भरला
मोगलांचा उन्माद चढला
त्रस्त झाली जनता सारी
गजर केला दिवटी ज्वालेचा।
भवानी आई पावली गं
आई जगदंबा धावली गं
सप्तशृंगी माता सावली गं
करवीर अंबाबाई जागली गं।
शिवबाचा अवतार प्रगटला
देव, देश, धर्मासाठी झुंजला
धर्माचा स्वाभिमान जिंकला
गडावर भगवा ध्वज विजयाचा।
आजही असुरी वृत्ती लपली गं
दहशतीची साद पाडली गं
शक्ती दे सिंदूर भक्तीचा गं
नाश करूया दानव असुरांचा गं।
असुरी वृत्तींचा नाश होऊ दे
सत्य, न्यायाची ज्योत पेटू दे
तुझ्या शक्तीनेच सारे होईल
गोंधळी तुझ्या चरणी मागणे।

● अमोल तपासे
९९६०६७३७८९

## स्पंदन

# सुखी अवस्था

**मा**झ्या सुखी अवस्थेचे सगळ्यात मोठे रहस्य म्हणजे मी स्वतःविषयी कमीतकमी विचार करायला लागलो... असे रसेल म्हणून गेला. हा कोण रसेल? हा तोच रसेल ज्याच्याबद्दल सदानंद रेगे लिहून गेले, '...लक्षात ठेव, प्रत्येक लेखकाची काही एक पुण्याई असते. आशय संपन्न लेखन करून ती त्याने याच जन्मात कमावली असते. रसेलची म्हणून काही पुण्याई आहे. अंकात त्याचे लेखन कुठे पण प्रकाशित करोत, जगातले सगळे जाणते वाचक रसेल हे नाव ज्या पानावर दिसेल, त्या पानापासून वाचायला सुरुवात करणार, ही काळ्या दगडावरची रेघ'...



असो हे विषयांतर झाले. तर मुद्दा आहे स्वतःबद्दल कमीतकमी विचार करण्याचा.

**'... कौन रोता है किसी और कि खातीर ए दोस्त**
**सबको अपनी ही किसी बात पे रोना आया...'**

● आशिष देव
७७४१८१८४१८

असे साहीर लिहून गेलेत, जे समर्पकच आहे. प्रत्येक जण सर्वप्रथम स्वतःबद्दलच विचार करीत असतो. जरा काळजीपूर्वक निरीक्षण केले तर असे निदर्शनास येत असते की, प्रत्येकाच्या बोलण्यात, 'मी' प्रबळ असतो. मी हा असा, मी ही अशी, माझे असे, माझे तसे, मी हे केले, मी ते केले.. असा सारा 'मी' चा बाजार गरम असतो. या मी च्या भाऊगर्दीत, 'तू'ला स्थान नसते. इतरांना काहीही मिळो, मला मात्र सुखच मिळाले पाहिजे, हा विचार इतका प्रबळ असतो की, 'तू' कुणाच्या खिजगणित पण राहत नाही. कायम स्वतःबद्दल विचार करणारा मनुष्य स्वार्थी असतो. या स्वार्थापोटी इतरांचा विचार पण त्याच्या मनाला शिवून जात नाही.

'भूक लागलेली असताना खाणे ही झाली प्रकृती... पोट भरलेले असतानाही खातच जाणे किंवा संग्रह करणे ही झाली विकृती... भूक लागलेली आहे, समोर ताट वाढलेले आहे आणि एखादा याचक आला तर त्याला ते ताट देऊन टाकणे ही झाली संस्कृती'... असे आचरण म्हणजे स्वतःच्या सुखाचा विचार न करणे. सारे काही आपल्या म्हणजे स्वतःच्या इच्छेने व्हावे असे वाटणे म्हणजे स्वार्थ... इतरांच्या इच्छेला प्राधान्य देणे म्हणजे परमार्थ... आणि स्वार्थ परमार्थ काहीच नसणे म्हणजे ईश्वरेच्छेने वागणे. स्वतःबद्दल कमीतकमी विचार करणे हे वाटते तितके सोपे नसते. भक्कम वैचारिक बैठक असल्याशिवाय ते शक्यच नसते. मला काय मिळेल? याचा विचार करण्यापेक्षा मी इतरांना काय देऊ शकतो? याचे चिंतन असणे आवश्यक असते.

जीवनातून 'मी' हद्दपार करून 'तू' चे जो स्वागत करू शकत असतो, तो रसेलच्या शब्दात बोलायचे झाले तर सुखी अवस्था निर्माण करून जात असतो...



## गैरसमज

गैरसमज एकदा झाले की
चांगले संबंध तुटून जातात
ऐकावे कोणाचे अन् कोणाचे नाही
असे अनेक प्रश्न पडत असतात
एकमेकात नका लावू भांडण
त्याने काहीच फायदा होत नाही
माणुसकी ठेवा, माणसे जोडा
इथे आपले काहीच नाही
गैरसमज एकदा झाले की
चिंता सतावत असते
आपले काहीच चुकले नसताना
दोन अश्रू रडावे लागते
अशा गैरसमजमुळे
अनेक अडचणी जन्म घेतात
वेळही वाया जाते उगीचच
मनात अनेक विचार येतात
गैरसमजतीमुळे नाते तुटतात
वैरता तेवढीच वाढत जाते
माणूस असूनही माणसाला फसवतो
अन् चांगल्यापणाचे ढोंग करत फिरतो

● संगीता ठलाल
७८२१८१६४८५

● संयोजक ● संजय रामगिरवार, ९८८१७१७८३२

# राष्ट्रीय लोक अदालतीत मोटार अपघाताची ११८ प्रकरणे निकाली

## ॲड. सुरेश गडदे यांचा पुढाकार, ८.३५ कोटी रक्कम मंजूर



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ सप्टेंबर**

सर्वोच्च न्यायालयाच्यावतीने संपूर्ण भारतात शनिवारी दि १३ सप्टेंबर रोजी महा लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यानुसार हिंगोली येथील जिल्हा व सत्र न्यायालयात लोक अदालतीमध्ये विविध प्रकरणे निकाली निघाले आहेत त्यामध्ये अनुभवी वकील असलेले ॲड. सुरेश गडदे यांनी मोटार वाहन अपघाताचे ११८ प्रकरणे निकाली काढले आहेत.

यामध्ये जयश्री गीते यांचा ७० लाखाचा दावा विमा कंपनीचे अजय व्यास व एचडीएफसी इन्शुरन्स कंपनीचे अधिकारी धर्मेंद्र शर्मा, सागर गांगुर्डे, राजवेंद्र रघुवंशी यांच्या सहकार्याने निकाली निघाला. गीता बांगर यांचा रॉयल इन्शुरन्स कंपनीमार्फत ५७ लाख रुपयांच्या दावा निकाली काढण्यात आला. रॉयल इन्शुरन्स कंपनीचे ॲड अजय व्यास व त्यांचे अधिकारी सतीश गिरीपुंजे, अमित चावलकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

आयसीआयसीआय लोम्बार्ड कंपनीचे एकूण १० प्रकरण निकाली निघाले आहेत ही प्रकरणे निकाली काढण्याकरिता विमा कंपनीचे अजय व्यास व अधिकारी भारत केदारे,कृष्णकांत संतांनी,सतपाल सिंह राजपूत यांनी सहकार्य केले. लिबर्टी जनरल इन्शुरन्स कंपनीने अवघ्या दोन महिन्यांमध्ये मयताच्या नातेवाईकांना विम्याचा लाभ मिळवून दिला लिबर्टी जनरल इन्शुरन्स कंपनीच्या अधिकारी श्रद्धा किनारे मॅडम यांनी मोलाचे सहकार्य केले. टाटा एआयजी इन्शुरन्स कंपनीने एकूण १८ प्रकरणी निकाली काढले आहेत यासाठी आदिनाथ कदम सर व रुपेश चव्हाण सर यांनी मोलाचे सहकार्य केले. चोलामंडल इन्शुरन्स कंपनीचे एकूण १७ प्रकरणे निकाली निघाले आहेत यासाठी योगेश धसे यांनीही मोलाचे सहकार्य केले. रिलायन्स इन्शुरन्स कंपनीने एकूण १६ प्रकरणे निकाली निघाले आहेत या कंपनीमार्फत सुभाषचंद चव्हाण सर यांनी मोलाचे सहकार्य केले.

न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनीने एकूण १० प्रकरणे निकाली काढले आहेत कंपनीचे ड. सुभाष वाघमारे व विमा कंपनीचे येरेकर साहेब यांनी मोलाचे सहकार्य केले.

नॅशनल इन्शुरन्स कंपनीचे एकूण २५ प्रकरणे निका लि निघाले आहेत कंपनीचे अधिकारी धीरेंद्र कुमार मिश्रा यांनीही मोलाचे सहकार्य केले,तसेच गो डिजिट,श्रीराम जनरल, मॅग्मा व युनायटेड इंडिया इन्शुरन्स या विमा कंपन्यांनी खूप सहकार्य केले. ॲड.सुरेश गडदे यांना ॲड. मुद्दशिर, ॲड. अर्धापूरकर, ॲड. कानबाराव मस्के, ॲड लेकुळे, ॲड लोंढे, ॲड.बालाजी जगताप, गुनाराव पोले, कानिफनाथ दिंडे, भगवान गडदे, देवराव कंठाळे, अरविंद गडदे, कृष्णा नरोटे, ओम राऊत, बाबुराव हराळे यांनी सहकार्य केले.

# हिंगोली जिल्ह्याच्या विकासासाठी जास्तीत जास्त उद्योग स्थापन करा– राहुल गुप्ता




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ सप्टेंबर**

शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, स्मार्ट प्रकल्प यासह विविध योजनांचा लाभ घेऊन जास्तीत जास्त उद्योग स्थापन करावेत आणि हिंगोली जिल्ह्याच्या विकास साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी यावेळी केले.

भारतीय रिझर्व बँक व हिंगोली जिल्ह्यातील बँकर्सच्या वतीने री–केवायसी आणि आर्थिक समावेशन योजनांची पूर्ण अंमलबजावणीसाठी मोहीम आज हिंगोली येथे राबवण्यात आली. या मोहिमेत जिल्हाधिकारी राहुल गुप्ता मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी यावेळी विविध बँकांचे व्यवस्थापक उपस्थित होते. त्यामध्ये अविनाश कपूर, नागेश्वर राव, व्यंकटेश कुरुंदकर, कावेरी, सुजीत झोडगे यांचा समावेश होता.

योजनाचा लाभ घेण्यासाठी नागरिकांना, बचतगटांना कर्ज घेण्यासाठी बँकेत जाऊन री–केवायसी करावी लागत असत. बँकेने आयोजित केलेल्या अभियांनाच्या माध्यमातून त्यांच्यापर्यंत जाऊन री–केवायसी करण्यात येत आहे. री–केवायसी प्रमाणे कर्ज मेळावा घेऊन जास्तीत जास्त अर्ज एकाच दिवशी स्वीकारुन ते तात्काळ निकाली काढावेत. यापूर्वी इतर जिल्ह्यात २० कोटी रुपयाचे कर्ज एका दिवसात रिलीज केल्याचे त्यांनी सांगितले. हिंगोली जिल्ह्याचा विकास करण्यासाठी उद्योग वाढविले पाहिजेत. त्यामुळे शासनाच्या विविध योजनेचे निकष संबंधित संकेतस्थळावर दिलेले आहेत त्याची माहिती घेऊन प्रस्ताव सादर करावेत. ग्राम पंचायतीमध्ये योजनेची माहिती पोहोचविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. कोणतीही अडचण असल्यास नागरिकांनी जिल्हाधिकारी कार्यालयात संपर्क साधावा, असे सांगून या कार्यक्रमात सहभागाबद्दल नागरिकांचे आभार मानले.

यावेळी रिझर्व बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बँक ग्राहकांना मार्गदर्शन केले. यावेळी अविनाश कपूर यांनी जिल्हा उद्योग केंद्राचे उद्दिष्ट पूर्ण केल्यामुळे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता व सुजीत झोडगे यांचा गौरव केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुजीत झोडगे यांनी केले तर कानेकर यांनी आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा अग्रणी बँक व सर्व बँकर्सनी परिश्रम घेतले. यावेळी विविध बँकेचे ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वसमत तालुक्यात ढगफुटी सदृश्य पाऊस, पिकांचे आतोनात नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १३ सप्टेंबर**



तालुक्यात अचानक झालेल्या मुसळधार व ढगफुटी सदृश्य पावसाने भीषण परिस्थिती निर्माण झाली. अल्पावधीत झालेल्या या पावसामुळे ओढे–नाले तुडुंब भरून वाहू लागले असून अनेक ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली आहे. गावोगावी रस्त्यांवर पाणी साचल्याने वाहतुकीवर परिणाम झाला आहे.

काही ठिकाणी घरांमध्येही पाणी शिरल्याने नागरिकांच्या अडचणींमध्ये भर पडली आहे. जनजीवन विस्कळीत झाले आहे.

या पावसामुळे सर्वात मोठा फटका शेतकऱ्यांना बसला आहे. शेतातील उभी पिके पाण्याखाली गेल्याने सोयाबीन, मूग, उडीद, कापूस व तुरीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. काही शेतजमिनींमध्ये तर पिकांसह मातीही वाहून गेल्याने शेतकरी हतबल झाले आहेत. तालुक्यातील अनेक शेतकरी संकटात सापडले असून पुढील खरीप हंगाम धोक्यात आल्याची भीती व्यक्त केली जात आहे. दरम्यान, शेतकऱ्यांनी प्रशासनाने तातडीने नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून पंचनामे करावेत व शेतकऱ्यांना तात्काळ मदत मिळावी, अशी मागणी केली आहे. ग्रामीण भागात अजूनही पाणी ओसरत नसल्याने लोकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. तालुक्यातील काही भागात अजूनही पावसाची रिपरिप सुरूच आहे.

# मुंबई उच्च न्यायालयातील न्यायमूर्तींचा सत्कार सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ सप्टेंबर**

येथील जिल्हा व सत्र न्यायालयाच्या नवीन इमारतीमध्ये मुंबई येथील उच्च न्यायालयातील सत्कार सोहळ्याचे आयोजन दि १४ सप्टेबर रोजी सकाळी १० वाजता करण्यात आले आहे. यावेळी न्यायमूर्तींचे मार्गदर्शनही लाभणार आहे.

सत्कार सोहळ्याचे उद्घाटन उच्च न्यायालयाचे प्रशासकीय न्यायमूर्ती, खंडपीठ नागपूर न्यायमूर्ती अनिल एस किलोर यांचेहस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती आर एम जोशी यांची उपस्थिती असणार आहे तर सत्कारमूर्तीमध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय जे मंत्री, न्यायमूर्ती सचिन एस देशमुख, न्यायमूर्ती महेंद्र एम नेरलीकर यांची उपस्थिती असणार आहे. यावेळी जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायधीश तुफानसिंग अकाली, वकील परिषद महाराष्ट्र व गोवाचे अध्यक्ष ॲड अमोल सावंत, वकील परिषदेचे सदस्य ॲड सतीश देशमुख यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

सत्कारानंतर दुपारी न्यायमूर्तींचे मार्गदर्शनही लाभणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन अध्यक्ष ॲड सुनीलकुमार भुक्तर, सचिव ॲड अखील अहेमद यांनी केले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### राष्ट्रमाता जिजाऊमध्ये पालक मेळावा



हिंगोली– येथील राष्ट्रमाता जिजाऊ विद्यानिकेतन मध्ये पालक मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या मेळाव्यात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर आणि शाळेच्या विविध उपक्रमावर चर्चा करण्यात आली. मेळाव्याचे प्रमुख अतिथी म्हणून माजी मुख्याध्यापक सुर्यवाड, अध्यक्षस्थानी मेटकर, सचिवपंडित शिरसाट, मुख्याध्यापक बल्लाळ यांची प्रमुख उपस्थिती होती. पर्यवेक्षक कान्हेड आणि शिक्षक वृंद यांनी पालकांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी शाळेत विविध स्पर्धा सांस्कृतिक कार्यक्रम आणि क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले तसेच विद्यार्थ्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी योगा आणि ध्यानधारणा वर्ग नियमितपणे घेतले जातात यांची माहिती देण्यात आली. मेळाव्यामध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर आणि शाळेच्या विविध उपक्रमावर चर्चा करण्यात आली पालकांनी शाळेच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत अधिक सुधारणा व्हावी यासाठी मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी नरवाडे, इमरान यांनी परिश्रम घेतले.

### डॉ. वर्षा अग्रवाल यांचे निधन



हिंगोली– येथील चंपालालजी आग्रवाल यांची मुलगी डॉ. वर्षा श्यामसुंदर आग्रवाल रा. (पाँडिचेरी निवासी) यांचे दिनांक १२ सप्टेंबर रोजी दुखद निधन झाले. असून १३ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता शहरातील कयाधू नदीजवळील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने नातेवाईक, व्यापारीमंडळी, प्रतिष्ठित नागरिक यांची उपस्थिती होती. डॉ. वर्षा शामकुमार अग्रवाल या दिपक निमोदिया व महेंद्र निमोनिया यांच्या भगिनी होत.

### ५५ वाहन चालकांविरूध्द पोलिसांची कारवाई

हिंगोली– अवैध वाहतुक करणाऱ्या तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ५५ वाहन चालकांवर पोलिसांनी कारवाई करीत त्यांच्याकडून ५७ हजार ९७० रूपयांचा दंड वसुल केला आहे. तसेच ५ ठिकाणी जुगार अड्ड्यावर धाडी टाकून ९८७० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# नुकसानग्रस्त भागाची आ. राजु नवघरेंकडून पाहणी, सांत्वन



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १३ सप्टेंबर**

तालुक्यात शुक्रवार दि १२ सप्टेंबर रोजी झालेल्या मुसळधार पावसाने शेतकरी व गावकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नाल्या–ओढ्यांना पूर आल्यामुळे गावागावात पिकांचे नुकसान, जनावरे वाहून जाण्याच्या घटना घडल्या आहेत या भागाची पाहणी आ. राजू नवघरे यांनी शनिवारी केली तसेच गुंडा येथील दोन महिला पुराच्या पाण्यात वाहून गेल्या. त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेत सात्वन केले.

शुक्रवारी झालेल्या पावसामुळे तालुक्यातील पिकांचे नुकसान तसेच अनेक जनावरे वाहून गेली. नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. आ. नवघरे यांनी पावसाने हानीग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांची व गावकऱ्यांची भेट घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. गुंडा गावात दोन महिला पुराच्या पाण्यात वाहून गेल्याची दुर्दैवी घटना घडली. आ नवघरे यांनी या ठिकाणी जाऊन गावकऱ्यांची भेट घेतली व पीडित कुटुंबीयांचे सांत्वन केले. सोन्ना गावातील मेंढीपालन करणारे शेतकरी गोविंद वैद्य यांच्या १५० मेंढ्यांपैकी तब्बल ७० मेंढ्या पुराच्या पाण्यात वाहून गेल्या आहेत. त्याशिवाय त्यांच्या शेतातील पिकांचेही प्रचंड नुकसान झाले आहे. पाऊस अद्याप सुरूच आज सकाळपासूनही जवळा बाजार ते तेलगाव या परिसरात मुसळधार पावसाचा जोर कायम असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. आ नवघरे यांनी प्रशासनाने तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना योग्य ती मदत व नुकसान भरपाई मिळावी यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आश्वासन दिले.

# हिंगोली दामिनी पथकाची टवाळखोरांवर कारवाई, गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ सप्टेंबर**



शहरातील शाळा व महाविद्यालयीन परिसरात अनेक दिवसांपासून मुलींच्या पाठलाग, शिवीगाळ व हुज्जत घालणाऱ्या टवाळखोरांची दहशत पसरली होती. या पार्श्वभूमीवर हिंगोली पोलिसांच्या दामिनी पथकाने शनिवारी धडक कारवाई करून अशा सर्व टवाळखोरांचे कंबरडे मोडले. काही जणांवर गुन्हादेखील दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे व शहर पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संदीप मोदे यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आलेल्या या मोहिमेत दामिनी पथकाने कॉलेज गेट, शाळा परिसर, बस स्टॉप, कट्टे, हॉटेलसमोर वर्दळीच्या ठिकाणी टवाळखोरांवर नजर ठेवून अनेक जणांना रंगेहाथ पकडले. त्यांना सरळ पोलिस ठाण्यात आणून चौकशी करण्यात आली. काहींवर गुन्हे दाखल करण्यात आले, तर काहींना भविष्यात पुन्हा अशा प्रकारात आढळल्यास थेट तुरुंगाची हवा दाखवण्याचा कडक इशारा देण्यात आला.

पोलिस प्रशासनाने स्पष्ट शब्दांत सांगितले की, विद्यार्थिनींना छेडणारे, पाठलाग करणारे, हुज्जत घालणारे, अशा कुणालाही आता सोडले जाणार नाही. शाळा–कॉलेज परिसरात शांतता भंग करणाऱ्यांना कठोर शिक्षा होईल. दामिनी पथक नेहमीच सज्ज आहे. ही कारवाई झाल्यानंतर परिसरात विद्यार्थिनींनी आणि पालकांनी सुटकेचा नि:श्वास टाकला. पालकांनी पोलिसांचे कौतुक करताना म्हटले की, मुलींच्या सुरक्षिततेसाठी दामिनी पथक देवदूतासारखे ठरले आहे. अशा मोहिम कायमस्वरूपी सुरू राहायला हव्यात.

# राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे मोफत आरोग्य शिबीर २०० रूग्णांनी घेतला आरोग्य शिबीराचा लाभ

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ सप्टेंबर**



शहरातील बावन खोली परिसरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सदभावना हॉल येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने प्रभाग क्रमांक १५ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अतीखूर रहमान यांच्यावतीने ईद मिलादून्नबी निमित्ताचे औचित्य साधून व सामाजिक कार्यकर्ते शेख सत्तार तांबोळी व डॉ आसिफ पठाण यांच्या संकल्पनेतून भव्य मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन शनिवारी १३ सप्टेंबर रोजी सकाळी ११:०० वाजता करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख उद्घाटक म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बि.डी बांगर व प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादीचे प्रदेश चिटणीस प्रकाशराव थोरात व रवींद्रभाऊ वाढे यांची उपस्थिती होती.

या आरोग्य शिबिरात तब्बल २०० रुग्णाची बीपी, शुगर, दमा, नेत्र रोग तपासणी, महिला आरोग्य तपासणी करण्यात आली. आरोग्य विषयक सल्ला देखील देण्यात आला. या आरोग्य शिबिरात बावनखोली, भारत नगर आदर्श नगर, मस्तानशहा नगर, स्वातंत्र्य सैनिक कॉलनी इत्यादी भागातील नागरिकांनी आरोग्य शिबिराचा लाभ घेतला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष हिंगोली पंकज बांगर, तालुकाध्यक्ष रवी डोरले शेख हनीफ, महिला शहरअध्यक्षा अन्नपूर्णा चौधरी सागर चौधरी, शाकीर पठाण यांची उपस्थिती होती.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते सतार तांबोळी डॉ आसिफ पठाण, आल्ताब पठाण, खाजा तांबोळी, प्रल्हाद धाबे, दिपक केळे, सुशील कसबे, सुमित शिंदे, शेख सलीम, महेश उगले गंगाधर लोखंडे, विश्वनाथ धुमाळ, शेख समीर शेख रहीम यांनी परिश्रम घेतले.

# रस्त्यावर कचरा टाकणाऱ्यांना आवाहन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ सप्टेंबर**

शहरातील औंढा रोड तसेच मस्तानशहा नगरात रस्त्यावरच कचरा टाकत असल्याचे नगर पालिकेच्या निदर्शनास आल्यानंतर मुख्याधिकारी अरविंद मुंढे, अभियंता प्रतीक नाईक, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर यांनी या परिसरात भेट दिली तसेच येथील रहीवाशांशी संवाद साधला तसेच रस्त्यावर कचरा टाकल्यामुळे आरोग्यास धोका निर्माण होतो. त्यामुळे नागरिकांनी घंटागाडीतच कचरा टाकण्याचे आवाहन मुख्याधिकारी मुंढे यांनी नागरिकांना केले.